Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक १६२ * * नागपूर *

शनिवार, दिनांक २१ सप्टेंबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## राज्य सहकारी बँक कर्मचाऱ्यांना आजीवन पेन्शन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २०:**

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या कर्मचाऱ्यांसाठी आजीवन पेन्शन योजना जाहीर करण्यात आली आहे. इतिहासामध्ये पहिल्यांदाच अशा प्रकारची योजना जाहीर करण्यात आली असून सध्या कार्यरत असलेल्या ५०७ कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतर दरमहा दहा हजार रुपये इतकी रक्कम त्यांच्या उदरनिर्वाहाकरता आजीवन मिळणार आहेत.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये हा निर्णय घेण्यात आला आहे. विशेष म्हणजे या योजनेसाठी लागणारी सर्व गुंतवणूक बँकेने आधीच पूर्ण केली आहे. या योजनेला बँक कर्मचारी संघटनेचे निवृत्त संघटक सचिव धर्मराज मुंडे यांचे नाव देण्यात आले आहे. बँक कर्मचाऱ्यांसाठी ही अत्यंत आनंदाची बातमी मानली जात आहे.

# विश्वकर्मा योजनेतून कौशल्याला नवीन ऊर्जा



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची ग्वाही ■ विश्वकर्मा योजनेचा वर्षपुर्ती सोहळा

### अमरावती येथील पीएम मित्रा टेक्सटाईल पार्कचे भूमिपूजन

### १ हजार आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचे उद्घाटन

### पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजनेचा शुभारंभ







■ **महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. २०:**

पीएम विश्वकर्मा योजनेच्या माध्यमातून पारंपरिकता आणि कौशल्याला नवीन ऊर्जा प्रदान करण्याचा संकल्प आम्ही केला आहे. या कौशल्यामध्ये सर्वाधिक भागीदारी अनु. जाती-जमाती आणि इतर मागासवर्गीय समुहाची आहे. या समुहातील कारागिर उद्योजक व्हावेत असा आमचा प्रयत्न असून त्यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेत मोठे योगदान देण्यासोबतच सप्लाय चेनसारख्या व्यवस्थेचा भाग व्हावे, अशी अपेक्षा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली.

पीएम विश्वकर्मा योजनेचा वर्षपूर्ती सोहळा वर्धा येथील स्वावलंबी मैदानात आज पार पडला. यावेळी मोदी बोलत होते.

या कार्यक्रमाला राज्यपाल डॉ. सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री जीतन राम मांझी, केंद्रीय राज्यमंत्री जयंत चौधरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, मंत्री सुधीर मुनगंटीवार, चंद्रकांत पाटील, उदय सामंत, कौशल्य मंगलप्रभात लोढा उपस्थित होते.

अमरावती येथील पीएम मित्रा पार्कचे ई-भूमिपूजन आणि आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र योजना व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजना या राज्य शासनाच्या दोन योजनांचा शुभारंभही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाला.

आजच्याच दिवशी १९३२ मध्ये महात्मा गांधी यांनी अस्पृश्यता निर्मूलनसाठी सुरू केलेल्या अभियानाची आठवण करुन देतानांच वर्ध्यातून विकसित भारताची निर्मिती करण्याच्या आमच्या संकल्पास ऊर्जा मिळते, असे प्रधानमंत्री म्हणाले .

कारागिरांच्या पारंपरिक कौशल्याचा सन्मान, सामर्थ्य आणि या समाजसमूहाची समृध्दी ही या योजनेमागची मूळ भूमिका असल्याचे स्पष्ट करुन मोदी म्हणाले, दहा लाखांहून अधिक लोक या योजनेशी जोडले गेले असून आठ लाख शिल्पकारांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण दिले गेले आहे.

▸▸ पान ८ वर

अग्रग्रलेख **खरीखरी...**

# दुधारी तलवार

सध्या वन नेशन, वन इलेक्शन बद्दल जोरदार चर्चा सुरू आहे. भूतपूर्व राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली एक राष्ट्र आणि एक निवडणुकीची कल्पना साकार होणे शक्य आहे किंवा नाही. याबाबत निर्णय घेण्यासाठी पूर्व राष्ट्रपतींना पाचारण करण्यात आले होते. आता जेव्हा त्यांना ते काम दिले. तेव्हा जिकडे तिकडे चोहीकडे, 'मोदी मोदी मोदीच गडे' अशी परिस्थिती होती. यापूर्वीही मोदीजींनी दिल्ली सरकारचे सर्व अधिकार तेथील उप राज्यपालांना देण्याचा कायदा संमत केला होता. निवडणूक आयुक्तांच्या निवडीचा जो आदेश काढण्यात आला. तो सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाला झुगारूनच काढण्यात आला. आता हे नवे अपत्य जन्माला घालताना केंद्रीय मंत्रिमंडळाच्या दवाखान्यात त्याचे बाळंतपण झाले. पण मुळात हे बाळ इतके आजारी आहे की, त्याला स्वस्थ करण्यासाठी अनेक औषधांची गरज आहे. सर्वप्रथम अल्पमतातील मोदी सरकारला हे विधेयक मंजूर करण्यासाठी संविधान संशोधनाची गरज पडणार आहे. त्यासाठी विरोधी पक्षांनाही सोबत घ्यावे लागणार आहे. आम्ही परवा याच स्तंभात सत्ताधाऱ्यांनी विरोधी पक्षां सोबत संवाद साधला पाहिजे, अशी वेडी आशा व्यक्त केली होती. पण इथे तर विरोधी पक्ष नेत्यांची जीभ छाटणे, त्यांची गत त्यांच्या आजीसारखी करणे किंवा जिभेवर चटके देणे अथवा क्रमांक एकचा आतंकवादी घोषित करणे. याचे कर्तरी, कर्मणी आणि भावे प्रयोग सुरू आहेत. हे विधेयक पारित करण्यासाठी 67% म्हणजेच दोन तृतीयांश खासदारांची सहमती आवश्यक आहे. हे प्रमाण आणखी सोपे करून सांगायचे झाल्यास तीन पैकी दोन खासदारांची सहमती यासाठी आवश्यक आहे. आता स्थिती अशी आहे की, मंत्रिमंडळांने हे विधेयक पारित केल्याबरोबर विरोधकांनी या विधेयकाच्या विरोधात घनघोर आक्रमण सुरू केले आहे. आताच्या एनडीएतील सदस्यांनी विरोध केलेला दिसत नाही. मात्र यापूर्वीच्या दोन-तीन विधेयकांना भाजप शिवाय एनडीएतील अनेक पक्षांनी विरोध केला होता. त्यामुळे सरकारला पलटी मारावी लागली होती. तिकडे या प्रस्तावाला विरोध करण्यासाठी बलाढ्य विरोधी पक्ष असलेल्या इंडियाने कंबर कसलेली आहे. म्हणजे आता एनडीए आणि इंडिया या विधेयका बाबतीत दोन ध्रुवांवर आहेत. राज्यसभेतही एनडीएला स्पष्ट बहुमत नाही. आपल्या देशात 1971 ची मुदतपूर्व निवडणूक होईपर्यंत, म्हणजे 1967 च्या निवडणुकीपर्यंत देशातील लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका एकाच वेळी घेण्यात आल्या होत्या. त्यानंतर विभिन्न कारणांनी या निवडणुका एकसाथ घेणे शक्य झालेले नाही. कारण पुढे अनेक राज्यातील सरकारे आपसातील फुटीमुळे बरखास्त झाली आणि मग त्यासाठी वेगळी निवडणूक घ्यावी लागली. मधल्या काही काळात केंद्रातील सरकारेही अनेक पक्षांच्या कुबड्या घेऊन चालत होती. त्यावेळी चंद्रशेखर, इंद्रकुमार गुजराल, व्हीपी सिंग, एचडी देवेगौडा वगैरे पंतप्रधान अल्पजीवीच ठरले. खुद्द भारतीय जनता पक्षाचे सरकार अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वात स्थानापन्न झाले होते. त्यांनाही आपला कार्यकाळ पूर्ण करता आला नव्हता. हा सर्व इतिहास सांगण्याचे कारण असे की, या समितीने खर्च वाचवण्यासाठी जी शिफारस केली आहे. त्यात एक महत्त्वाचा मुद्दा असाही आहे की, केंद्रात पंतप्रधान पदावर मोदीजींचा चेहरा असला म्हणजे दिल्लीपासून ग्रामपंचायतीपर्यंत सर्व ठिकाणी आपण विजय मिळवू शकू. म्हणजे समिती स्थापन झाली तेव्हा तशी स्थिती होती आणि आता शिफारस आली. तेव्हा भारतीय जनता पक्षाला केंद्रात स्वबळावर बहुमत नाही. इतर राज्यातही येत्या काळात ज्या निवडणुका होणार आहेत. त्यात भाजपाला पूर्वीसारखे बहुमत मिळेलच याची खात्री नाही. एक वेळी निवडणूक घेतल्याने खर्चात बचत होईल. आचारसंहिता वारंवार लागू करावी लागणार नाही. हे फायदे देशाला लाभदायक असले. तरी या निवडणुकीसाठी जो अफाट खर्च होतो. तो कमी होईल असे अजिबात वाटत नाही. आपल्या देशातील एकूण परिस्थिती पाहता या सर्व सुधारणा दुधारी तलवारी सारख्या आहेत, असे वाटते. कल्पना करा केंद्रात भारतीय जनता पक्षाचे सरकार नाही. पण दिल्लीत भारतीय जनता पक्षाचे सरकार आहे. मग ज्याप्रमाणे आता उपराज्यपाल दिल्ली सरकारशी वागतात. तसाच प्रकार पुढेही कशावरून होणार नाही. त्यामुळे एक साथ निवडणुकांचा द्राविडी प्राणायाम करण्यापेक्षा इतर काही सुधारणा करता येतील काय? खर्चावर कायदेशीर बंधनापेक्षा इतर काही मार्गाने बंधने लावता येतील काय? याचा विचार करण्याची वेळ आता आलेली आहे. एकत्र निवडणुका म्हणजे नाकापेक्षा मोती जड होणार आहे हे तुम्ही लिहून ठेवा. आमच्या सांगण्याने फार काही बदल होईल या भ्रमात आम्हीही अजिबात नाही, हेही लिहून ठेवा. बस्स आगे आगे देखिये होता है क्या!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## ओव्हरटेकच्या नादात आयशर ट्रक बसवर आदळला

# भीषण अपघातात ८ ठार : १६ जखमी




■ **वृत्तसंस्था, जालना, दि. २०:**

जिल्ह्यातील वडीगोद्री रोडवरील शहागडजवळ बस आणि ट्रकचा भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये ८ जण जागीच ठार झालेत. मृतांमध्ये बसमधील ६ तर ट्रकमधील दोघांचा समावेश आहे. १६ जण जखमी झालेत. जखमींपैकी ४ जणांची प्रकृती गंभीर आहे.

अपघात इतका भीषण होता की, त्यात दोन्ही वाहनांचा चेंदामेंदा झाला. अंबाजोगाई आगाराची बस जालन्याच्या दिशेने जात होती. अंबडपासून १० किमीवर ती आयशर ट्रकला धडकली. त्यात ८ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला.

अपघातग्रस्त ट्रकमधून मोसंबी वाहतूक केली जात होती. अपघातानंतर तातडीने स्थानिक त्यांच्या मदतीला धावले. स्थानिकांनी मदत कार्य सुरू करीत पोलिसांना पाचारण केले. जखमींना उपचारासाठी लगतच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

प्रत्यक्षदर्शीच्या माहिती नुसार भरधाव वेगाने येणाऱ्या आयशर ट्रक दुसऱ्या वाहनाला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात बसवर जाऊन आदळल्याने हा अपघात झाला. बसमध्ये एकूण २४ प्रवाशी होते यातील किरकोळ जखमींना अंबड येथील प्राथमिक आरोग्यकेंद्रात उपचारासाठी हलवण्यात आले आहे.




## ....तर माझ्याऐवजी प्रकाश आंबेडकरांना मंत्री करा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २०:**

आठवलेंचे वक्तव्य




रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष रामदास आठवले हे गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रीय लोकशाही आघाडीत (एनडीए) आहेत. तसेच ते गेल्या आठ वर्षांपासून केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री देखील आहेत.

दरम्यान, आठवले यांनी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकरांना एनडीएत सहभागी होण्याचं आवाहन केलं आहे. विशेष म्हणजे प्रकाश आंबेडकरांसाठी आठवले यांनी केंद्रीय मंत्रिपद सोडण्याची तयारी देखील दर्शवली आहे.

रामदास आठवले म्हणाले, वंचित बहुजन आघाडीने थोडा सकारात्मक विचार करणं आवश्यक आहे. वंचितने महायुतीत (एनडीए) येणं आवश्यक आहे, त्यांना माझं निमंत्रण आहे. ते महायुतीत आले तर त्यांना सत्तेचा फायदा होईल. ते आले तर मला मंत्री नाही केलं तरी चालेल, प्रकाश आंबेडकर यांना मंत्री करा अशी मागणी मी स्वतः करेन.

महायुतीतील काही नेते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शरद पवार गटात जाणार असल्याची चर्चा चालू आहे. त्यावर आठवले म्हणाले, ज्यांना विधानसभा निवडणुकीचं तिकीट मिळेल याची खात्री नाही ते शरद पवार यांच्याकडे जात आहेत. आम्ही याचा अभ्यास करत आहोत.







| गांव | वेळ | गांव | वेळ | गांव | वेळ | गांव | वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्धमनेरी | १०.०० | बोदड | १.०० | रसुलाबाद | ३.१५ | आजनगांव | ५.०० |
| टाकरखेडा | १०.३० | रोहणा | १.३० | एकबुर्जी | ३.३० | उमरी (सुकळी) | ५.३० |
| पारगोठाण | ११.०० | वाई | २.०० | पाचोड (प.) | ३.४५ | बोथली (कि.) | ६.०० |
| सावंगी पोळ | ११.३० | सालफळ | २.३० | पाचोड | ४.०० | तरोडा | ६.३० |
| वडगांव पांडे | १२.०० | सोरटा | २.४५ | जांभुळदरा | ४.१५ | पिंपळखुटा | ६.४५ |
| दिघी | १२.३० | सोरटा | ३.०० | आजनगांव | ४.३० | | |

विनीतः भारतीय जनता पार्टी, आर्वी तालुका

# गणेशोत्सव संपताच मासळी खरेदीसाठी गर्दी



उरण, दि. २० : प्रतिनिधी

गणेशोत्सवात उपवासाचे दिवस संपताच उरणच्या मासळी बाजारात खरेदीसाठी बुधवारी खवय्यांची गर्दी झाली होती. ७ सप्टेंबरपासून गणपती उत्सव असल्याने व त्यापूर्वी श्रावण महिना सुरू होता. त्यामुळे अनेकांचे उपवासाचे दिवस सुरू होते. मात्र हे उपवास अनंत चतुर्दशीला संपले आहेत. त्यानंतर बुधवार हा पहिलाच दिवस आल्याने खवय्यांची मासळी खरेदीसाठी उरणच्या मासळी बाजारात गर्दी झाली होती.

उरण तालुक्यातील किनारपट्टीवरील करंजा, मोरा, दिघोडे, आवरे परिसरात मोठ्या प्रमाणात खोल समुद्रातील मासेमारी करण्यात येत आहे. यामध्ये, सुमारे ७०० पेक्षा अधिक मासेमारी बोटी असून मासळीची खरेदी- विक्री करण्यासाठी त्यांना मुंबईतील ससून डॉक आणि भाऊचा धक्का येथे जावे लागत होते.

दरम्यान, राज्य आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून ६०० मीटर लांबीचे 'फिशिंग- डॉक' करंजा येथे उभारण्यात आले आहे. यामध्ये, मासेमारी बोटीतील मासळी बंदरात उतरवून त्याच्या खरेदी-विक्रीला सुरुवात करण्यात आली आहे. यामुळे नव्याने सुरू झालेल्या 'करंजा – द्रोणागिरी मत्स्य व्यवसाय बंदर' येथे अनेक व्यापारी आणि स्थानिक रहिवासी हे घाऊक आणि दैनंदिन गरजेसाठी आवश्यक मासळी खरेदी करण्यासाठी गर्दी करू लागले आहेत. यामध्ये, सायंकाळच्या सुमारास भरणाऱ्या बाजारामध्ये छोट्या करंदीपासून कोलंबी, पापलेट, सुरमई, रावस, कलेट, हलवा, कुपा, बोंबील अशा सुमारे ३० ते ४० प्रकारचे अनेक मासे विक्रीसाठी दिसून येत आहेत. तर करंजा येथील या बंदरात १०० रुपयांपासून १२०० रुपये किलोच्या दराने मासळी विक्री करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

करंजा बाजारात बला, वाम, पाला, माखली, मांदेली, ढोमी, पाकट, शिंगाला, चिंबोरी असे मासेदेखील विक्रीसाठी असल्याचे दिसून आले आहे. तर, या मासळी बाजारात सुरमई, कोलंबी, कुपा, पापलेट यांना अधिक मागणी आहे.

**ताज्या मासळीची मागणी**

खोल समुद्रातील मासळीबरोबरच खाडी आणि तळ्यात पाळण्यात येणाऱ्या ताज्या मासळीचीही अधिकची मागणी वाढली आहे. यात मासे, कोळंबी, खेकडे आदी ताजी मासळी बाजारात येऊ लागली आहे.

# पुण्यातील नर्सरीमध्ये काम करणाऱ्या मजुराची हत्या करणाऱ्यांना कल्याणमधून अटक

कल्याण, दि. २० : प्रतिनिधी



पुण्यातील हिंजवाडी पोलीस ठाणे हद्दीतील एका नर्सरीमध्ये (फूल झाडांची रोपे) काम करणाऱ्या एका मजुराची दोन जणांनी हत्या केली होती. हे आरोपी बिहारमधील होते. ते कल्याण रेल्वे स्थानकातून बिहारला पळणार असल्याची माहिती पुण्याचे साहाय्यक पोलीस आयुक्त सुनील कुराडे यांना मिळताच, त्यांनी डोंबिवलीतील मानपाडा पोलिसांना कल्याण रेल्वे स्थानक भागात सापळा लावण्यास सांगितले. मानपाडा पोलिसांनी मोठ्या कौशल्याने दोन्ही आरोपींना कल्याण पूर्व रेल्वे परिसरातून मंगळवारी अटक केली.

प्रवीण महातो असे खून झालेल्या मजुराचे नाव आहे. राजु कुमार नथुनी प्रसाद सिंग (३३, शिक्षक, रा. मछनी, ता. सकरा, जि. मुजफ्फरपूर, बिहार), धीरज कुमार रमोद सिंग (२०, रा. सकरा) अशी अटक आरोपींची नावे आहेत. साहाय्यक पोलीस आयुक्त कुराडे यांच्या आदेशावरून मानपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने, पोलीस निरीक्षक राम चोपडे, साहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत आंधळे यांच्या पथकाने ही अटकेची कारवाई केली.

पोलिसांनी सांगितले, मयत प्रवीण महातो याचे अटक आरोपी शिक्षक राजु सिंग याच्या पत्नी बरोबर अनैतिक संबंध होते. त्याचा राग राजुला होता. तो प्रवीणचा काटा काढण्यासाठी टपून होता. प्रवीण पुण्यातील हिंजवाडी भागातील एका नर्सरीत काम करत होता. तेथे धीरज सिंग प्रवीणवर पाळत आणि त्याचा काटा काढण्यासाठी बिहारहून आला होता. धीरजने राजूला बिहारहून बोलावून घेतले. गेल्या आठवड्यात दोघांनी मिळून प्रवीणची नर्सरीमध्ये हत्या केली होती.

हिंजवाडी पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. हिंजवाडी पोलिसांची पथके या प्रकरणाचा तपास करत होती. साहाय्यक आयुक्त कुराडे यांना प्रवीणचा खून करून आरोपी बिहार येथे पळून जाणार असल्याची गुप्त माहिती मिळाली. यासाठी ते कल्याण रेल्वे स्थानकातून प्रवास करणार असल्याचे समजले. ही माहिती कुराडे यांनी तात्काळ मानपाडा पोलिसांना दिली. मानपाडा पोलिसांची पथके पोलीस निरीक्षक राम चोपडे, प्रशांत आंधळे यांच्या नेतृत्वाखाली तात्काळ कल्याण रेल्वे स्थानक परिसरात मंगळवारी सकाळी सहा वाजता पोहचली. त्यांनी तेथे सापळे लावले.

पोलिसांजवळ आरोपींच्या प्रतीमा होत्या. या प्रतीमांच्या आधारे पथकाने कल्याण रेल्वे स्थानक, परिसरात आरोपींचा शोध सुरू केला. कल्याण रेल्वे स्थानकाबाहेर पिशव्या घेऊन एका औषध विक्री दुकानासमोर दोन जण उभे होते. पोलिसांनी त्यांना ओळखले. हेच ते बिहारला पळणारे फरार आरोपी असल्याची खात्री पटल्यावर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. त्यांचा ताबा हिंजवाडी पोलिसांना दिला. वीस मिनिटाच्या अवधीत पोलिसांनी ही धरपकड केली.

# पनवेल जवळील कोन येथे ऑर्केस्ट्रा बारवर कारवाई, बारा जणांवर गुन्हा दाखल

पनवेल, दि. २० : प्रतिनिधी

पनवेल जवळील कोन येथील साई पॅलेस, बिंदास बार अँड ऑर्केस्ट्रावर पनवेल तालुका पोलिसांनी कारवाई करत मालक, मॅनेजर, पुरुष वेटर, महिला सिंगर अशा बारा जणांवर गुन्हा दाखल केला. 15 सप्टेंबर रोजी रात्री पावणे एकच्या सुमारास साई पॅलेस बिंदास बार अँड ऑर्केस्ट्रा कोन गाव येथे सात महिला सिंगर ह्या भडक वेशभूषा करून ऑर्केस्ट्रा बार मध्ये सुरू असलेल्या म्युझिकच्या तालावर गिऱ्हाईकांची लगट साधून अंगविक्षेप करून भिभत्स वर्तन करताना मिळून आल्या. शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे उल्लंघन केले. त्यामुळे बारचे मालक बाबुराव तुकाराम म्हात्रे, मॅनेजर मोहन केंगे गौडा व पुरुष वेटर यांनी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी त्यांना तशी परवानगी, उत्तेजन व प्रोत्साहन दिले. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 296, 49, 223,3(5), सह महाराष्ट्र हॉटेल उपहारगृह आणि मद्यपान कक्ष (बार रूम) अश्लील नृत्यावर प्रतिबंध घालण्याबाबत व त्यामध्ये काम करणाऱ्या महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम व नियम 2016 चे कलम तीन, 8(1), 8(2), 8(4), 8(6) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

# नाशिकमध्ये मूर्ती संकलनात यंदाही वाढ 175 मेट्रिक टन निर्माल्यही जमा




नाशिक, दि. २० : प्रतिनिधी

गणरायाला पर्यावरणस्नेही पध्दतीने निरोप देण्यासाठी महानगरपालिकेने राबविलेल्या उपक्रमात शहरात दोन लाख पाच हजार ८५४ मूर्तीचे संकलन करण्यात आले. तसेच सुमारे १७५ मेट्रिक टन निर्माल्य संकलन करण्यात आल्याचे महापालिकेने म्हटले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत मूर्ती संकलनात साडेपाच हजारहून अधिक वाढ झाली.

गोदावरीसह तिच्या उपनद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी महापालिका दरवर्षी विभागनिहाय ठिकठिकाणी मूर्ती व निर्माल्य संकलनाचे नियोजन करते. विसर्जनासाठी शहरात २९ नैसर्गिक स्थळे तर ५६ ठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था करण्यात आली होती. पाच ठिकाणी नैसर्गिक आणि कृत्रिम अशी एकत्रित विसर्जनाची व्यवस्था होती. नाशिकरोड विभागात फिरत्या तलावाव्दारे मूर्ती संकलनाचे नियोजन करण्यात आले होते. पर्यावरण संवर्धनार्थ गणेशभक्तांनी मूर्ती दान करून जलप्रदूषण टाळण्यास हातभार लावल्याचे मूर्ती संकलनाच्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. विसर्जनाच्या दिवशी सहा विभागातून एकूण दोन लाख पाच हजार ८५४ मूर्ती संकलित करण्यात आल्या.

विविध विसर्जन स्थळांवरून १७४.७८० मेट्रिक टन निर्माल्य संकलन करण्यात आले. पीओपीच्या मूर्तीचे घरच्या घरी विसर्जन करता यावे म्हणून महापालिकेने नागरिकांना ७२५ किलो अमोनियम बायकार्बोनेट पावडर वितरीत केली. गतवर्षी दोन लाख २५३ मूर्ती आणि १५३.१५५ मेट्रिक टन निर्माल्य संकलित करण्यात आले होते. या वर्षी त्यात लक्षणीय वाढ झाली. अनेकांनी शाडू मातीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करीत घरीच विसर्जन केले. या उपक्रमात मनपा पर्यावरण, सार्वजनिक बांधकाम आणि घनकचरा व्यवस्थापन या विभागांनी समन्वयाने काम केले. या उपक्रमात विविध महाविद्यालयांतील राष्ट्रीय छात्र सेना पथकातील विद्यार्थी, के. व्ही. नाईक महाविद्यालय, क. का. वाघ अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन, एनडीएमव्हीपी महाविद्यालय, संदीप फाउंडेशन, गोखले एज्युकेशन संस्था, रोटरी क्लब आदींचे योगदान लाभले.

# अवजड वाहनांची अवेळी वाहतुक सुरूच; मुंबई नाशिक महामार्ग, मुंब्रा बाह्यवळण मार्गावर कोंडी



ठाणे, दि. २० : प्रतिनिधी

वाहतुक कोंडीमुळे ठाणेकर हैराण झाले असताना, पोलिसांच्या दुर्लक्षामुळे अवजड वाहनांची अवेळी वाहतुक पुन्हा एकदा सुरू झाली आहे. घोडबंदर मार्गावर अवजड वाहन चालक भरधाव वेगाने वाहन चालवित असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे या अवजड वाहनांच्या वाहतुकीवर केव्हा वचक बसणार असा प्रश्न नागरिकांकडून विचारला जात आहे. ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रात ठाणे ते बदलापूर आणि भिवंडी शहरे येतात. या क्षेत्रातून मुंबई नाशिक महामार्ग, घोडबंदर, पूर्व द्रुतगती महामार्ग यासांरखे महत्त्वाचे मार्ग जातात. भिवंडी शहरात गोदामांची संख्या मोठ्याप्रमाणात आहे. त्यामुळे उरण येथील जेएनपीटी बंदर, गुजरात येथून भिवंडी आणि नाशिक भागात होणाऱ्या अवजड वाहनांची वाहतुक ठाणे, भिवंडी शहरातून होत असते. अवजड वाहने घोडबंदर मार्गे शहरात थेट प्रवेश करतात. त्यामुळेअवजड वाहतुकीच्या समस्येमुळे ठाणेकर हैराण झाले आहेत. मागील काही महिन्यांपासून ठाणे शहरात अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे मोठ्याप्रमाणात वाहतुक कोंडी होत आहे.

ठाणे आयुक्तालय क्षेत्रात अवजड वाहनांना दुपारी १२ ते ४ आणि रात्री ११ ते पहाटे पाच या कालावधीत परवानगी असते. या वेळे व्यतिरिक्त इतर वेळांमध्ये अवजड वाहनांना प्रवेशबंदी असते. असे असतानाही ठाणे शहरात या नियमांचे पालन होत नसल्याचे समोर आले आहे. शहरात सकाळच्या वेळेत नोकरदारांची वाहने बाहेर पडतात. त्याचवेळी अनेकदा अवजड वाहने बिनदिक्कत प्रवेश करू लागली आहेत. याचा परिणाम घोडबंदर तसेच इतर महत्त्वाच्या मार्गांवर होण्यास सुरूवात झाली आहे. काही अवजड वाहन चालक हे भरधाव वाहन चालवितात. त्यामुळे इतर हलक्या वाहन चालकांना अवजड वाहनांच्या धोकादायक वाहतुकीचा फटका सहन करावा लागत आहे. बुधवारी देखील शहरात अवजड वाहनांची अवेळी वाहतुक दिसून आली. या वाहनांमुळे घोडबंदर, मुंबई महामार्गावर वाहनांचा भार वाढून वाहतुक कोंडी झाल्याचे चित्र होते. शहरातील महत्त्वाच्या मार्गांवर कोंडी झाल्याचे चित्र होते. अवजड वाहने रोखण्यासाठी ठाणे वाहतुक पोलिसांनी योग्य कारवाई करणे आवश्यक आहे. अवजड वाहनांच्या वाहतुकीच्या अधिसूचनेचे पालन झाल्यास अपघात तसेच कोंडी रोखण्यास मदत होईल. -सुरेश देसले, प्रवासी. यासंदर्भात वाहतुक शाखेचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट यांना संपर्क साधला. परंतु त्यांच्याकडून प्रतिसाद मिळू शकला नाही.

# दोन वेगवेगळ्या अपघातात दोघांचा मृत्यू; अज्ञातांवर गुन्हा दाखल

भिवंडी, दि. २० : प्रतिनिधी

दोन वेगवेगळ्या वाहनांच्या धडकेत झालेल्या अपघातात दोन दुचाकीस्वारांचा उपचारा पूर्वीच मृत्यू झाल्याच्या घटना बुधवारी घडल्या आहेत. अमजद अली कय्युम अन्सारी (४३) आणि महेंद्र सिंग खिची (३५) अशी अपघातात मयत पावलेल्या दुचाकीस्वारांची नावे आहेत.याप्रकरणी दोन चालकांच्या विरोधात दोन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून घटनेनंतर चालक फरार झाले आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,पहिल्या घटनेत १८ सप्टेंबर रोजी सकाळी साडे नऊ वाजेच्या सुमारास मुंबई - नाशिक वाहिनीवरील ओवळी परिसरातील मिनी पंजाब हॉटेल समोर मयत अमजद अली दुचाकीने रोड क्रॉस करत असताना त्यास अज्ञात वाहन चालकाने वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून जोरदार धडक दिली असता अमजदच्या डोक्याला, कपाळावर व उजव्या हाताला गंभीर जखमा होऊन त्याचा अतिरक्त स्त्रावाने जागीच मृत्यू झाला आहे. त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी येथील इंदिरा गांधी रुग्णालयात पाठवला आहे.याप्रकरणी मयताचा सावत्र भाऊ मोहम्मद अन्वर उर्फ गुड्डु अब्दुल कय्युम अन्सारी याच्या फिर्यादीवरून नारपोली पोलिस ठाण्यात अज्ञात चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत.तर दुसऱ्या घटनेत १८ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास चाविंद्रा रोडकडून मयत महेंद्र सिंग खीची हा दुचाकीने वंजार पट्टी नाक्याकडे जात असताना त्यास आयशर ट्रक क्र. डिडी ०१ जे ९२२४ वरील चालक जाहीद अली अब्दुल कादीर (३२) ह्याने त्याच्या ताब्यातील ट्रक बेदरकारपणे चालवून महेंद्रच्या दुचाकीला जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात महेंद्र गंभीर जखमी झाला होता.त्यास इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आल्यानंतर डॉक्टरांनी तपासून उपचारापूर्वीच त्याला मयत घोषित केले आहे. याप्रकरणी मयताचा भाऊ जालमसिंग प्रेमसिंग खिची याच्या फिर्यादीवरून जाहिदच्या विरोधात निजामपूरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून चालक घटनेनंतर फरार झाला असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

# एकाच कुटूंबातील चौघांचा संशयास्पद मृत्यू

धुळे, दि. २० : प्रतिनिधी



शहरातील प्रमोद नगरात वास्तव्यास असलेल्या एकाच कुटूंबातील चौघे जण गुरूवारी मृतावस्थेत आढळून आले. कुटूंबातील प्रमुख व्यक्ती प्रवीण गिरासे गळफास घेतलेल्या अवस्थेत तर, पत्नी आणि दोन मुलांनी विषारी द्रव घेतलेले दिसले. प्रवीण गिरासे (५२), पत्नी दीपांजली गिरासे (४७), मुलगे सोहम गिरासे (१८) आणि गितेश गिरासे (१४) अशी मृतांची नावे आहेत. धुळ्याच्या देवपूर भागातील प्रमोद नगरात सेक्टर क्रमांक दोनमध्ये प्रवीण गिरासे यांचे कुटूंबियांसह वास्तव्य होते. पारोळा रस्त्यावरील मुंदडा मार्केटमधील व्यापारी संकुलात गिरासे यांचे कामधेनू ॲग्रो या नावाचे दुकान आहे. प्रवीण यांचे दोन दिवसांपूर्वीच त्यांची बहीण संगीता राजपूत यांच्याशी बोलणे झाले होते. प्रवीण हे मुलाच्या शैक्षणिक कामानिमित्त पुणे येथे जाणार होते. यामुळे संगीता यांचा दोन दिवसांपासून प्रवीण यांच्याशी संपर्क नव्हता. त्यानंतर संगीता यांनी प्रवीण यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता उत्तर न मिळाल्याने संगीत यांनी गिरासे कुटूंबातील इतर सदस्यांशी संपर्क केला. परंतु, प्रतिसाद न मिळाल्याने संगीता राजपूत गुरुवारी सकाळी प्रवीण गिरासे यांच्या घरी गेल्या. घराचे दार केवळ लोटलेले होते. आतमधून कडी लावलेली नसल्याने त्या आत शिरल्या असता प्रचंड दुर्गंधी जाणवली. आतील खोलीत प्रवीण यांनी गळफास घेतल्याचे आणि पत्नी, दोन्ही मुलगे जमिनीवर मृतावस्थेत दिसल्याने संगीता यांना धक्का बसला. त्यांनी आजूबाजूच्या लोकांना बोलावून माहिती दिल्यानंतर रहिवाशांनी पश्चिम देवपूर पोलीस ठाण्यास या घटनेची माहिती दिली. पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. ही सामूहिक आत्महत्या की घातपात, याविषयी पोलिसांकडून तपास सुरु आहे.

# सरकारला पोलिसांच्या मदतीने दंगली घडवून पोलिसांचाच बळी द्यायचाय, राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांचा आरोप

ठाणे, दि. २० : प्रतिनिधी

भिवंडीत शांतता प्रस्थापित करण्यासाठी पोलिसांनी सौम्य लाठीचार्ज केला आणि त्याची जबरदस्त किंमत तेथील पोलीस उपायुक्तांना मोजावी लागली, असा दावा करत सरकारला पोलिसांच्या मदतीने दंगली घडवून पोलिसांचाच बळी द्यायचा आहे, असा आरोप राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. महाराष्ट्राच्या पोलीस खात्याचा राजकीय हत्यार म्हणून वापर करण्याची या सरकारची सवय महाराष्ट्राला महागात पडेल, असेही त्यांनी म्हटले आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलिसांची असते. परंतु, ही जबाबदारी उत्तमरित्या पार पाडलेली या सरकारला आवडत नाही. कारण, या सरकारला कायदा आणि सुव्यवस्था बिघडवायची आहे, असा आरोप आव्हाड यांनी केला आहे. काल भिवंडीत जे काही झाले आणि त्यानंतर शांतता प्रस्थापित करण्यासाठी पोलिसांनी सौम्य लाठीचार्ज केला. त्याची जबरदस्त किंमत तेथील पोलीस उपायुक्तांना मोजावी लागली. २४ तासांच्या आत कोणाला काहीही कळू न देता त्यांची आज बदली करण्यात आली. या बदलीमागील कारण काय तर या सरकारच्या मनात जी दंगल होती. ती दंगल घडण्यापासून रोखण्यात आली आणि हे नारळ त्यांनी पोलीस उपायुक्ताच्या डोक्यात फोडले, असा आरोपही त्यांनी केला. सबंध महाराष्ट्रातील पोलिसांनी यातून धडा घ्यावा की, या सरकारचे नेमके उद्दिष्ट काय आहे? यांना तुमच्या मदतीने दंगली घडवायच्या आहेत अन् या दंगलींनंतर तुमचाच बळी द्यायचा आहे. 'चीत भी मेरा; पट भी मेरा', अशी अवस्था आहे. महाराष्ट्राच्या पोलीस खात्याचा राजकीय हत्यार म्हणून वापर करण्याची या सरकारची सवय महाराष्ट्राला महागात पडेल, असेही त्यांनी म्हटले आहे.

# पेट्रोल पंपावरील रोकड लुटण्याच्या तयारीतील चोरट्यांची टोळी गजाआड

पुणे, दि. २० : प्रतिनिधी

महामार्गावरील पेट्रोल पंपावर दरोडा टाकण्यासाठी आलेल्या १२ जणांना भारती विद्यापीठ पोलिसांनी गजाआड केले. चोरट्यांबरोबर असलेल्या दोन अल्पवयीनांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून पाच कोयते, दुचाकी, मिरची पूड दोन लाख ५२ हजार १५० रुपयांचा माल जप्त केला आहे. प्रथमेश ऊर्फ देवीदास कुडले (वय २३, रा. दत्तनगर), प्रकाश पाराजी काटे (वय २४, रा. दत्तनगर), करण संदीप चिकणे (वय २०, रा. सातववाडी, गोंधळेनगर, हडपसर), अजहर रमजान सय्यद (वय २३, रा. काशेवाडी, भवानी पेठ), सुशांत सुधाकर धोत्रे (वय १९, रा. संतोषनगर, कात्रज), आयाजन नियाज शेख (वय १९, रा. न्यू मोदीखाना, कॅम्प), रिहान रमजान सय्यद (वय २०, रा. काशेवाडी, भवानी पेठ), अरजान शाहीद शेख (वय १९, रा. नवीन नाना पेठ), फरहान सतीश येनपुरे (वय १९, रा. सारस सोसायटी, धनकवडी), दुर्गेश् हनुमंत सिद्धापुरे (वय १८, रा. फुरसुंगी, हडपसर), अंकीत राजू हकाळे (वय २१, रा. संतोषनगर, कात्रज) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

# भिवंडी येथील राड्यानंतर आयपीएस अधिकाऱ्याची बदली

ठाणे, दि. २० : प्रतिनिधी

भिवंडी येथे गणेश विसर्जन मिरवणूकीमध्ये दोन गटामध्ये झालेल्या वादानंतर भिवंडीचे पोलीस उपायुक्त डॉ. श्रीकांत परोपकारी (आयपीएस) यांना हे प्रकरण भोवले आहे. परोपकारी यांची थेट ठाणे शहर मुख्यालयात बदली करण्यात आली आहे. तर, मुख्यालयाचे पोलीस उपायुक्त मोहन दहिकर यांची नियुक्ती भिवंडीच्या पोलीस उपायुक्तपदी करण्यात आली आहे. ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी या वृत्तास दुजोरा दिला आहे. भिवंडी येथून बुधवारी मध्यरात्री १२.३० वाजाता एका मंडळाची गणेश विसर्जन मिरवणूक सुरू होती. मिरवणूक वंजारपट्टी नाका परिसरात आली असता, अचानक दगडफेक झाल्याचा आरोप मंडळाच्या कार्यकर्त्यांनी केला. या घटनेनंतर या भागात मोठ्याप्रमाणात जमाव गोळा झाला. दोन्ही गटांकडून एकमेकांविरोधात जोरदार घोषणाबाजी सुरू झाली. घटनास्थळी पोलीस पथके दाखल झाली. आरोपींविरोधात कारवाई झाल्याशिवाय गणेश विसर्जन होणार नाही अशी मागणी मंडळातील कार्यकर्त्यांनी सुरू केली.

काहीवेळाने दोन्ही गटामध्ये गर्दी जमू लागल्याने परिस्थिती पोलिसांच्या नियंत्रणाबाहेर जात होती. अखेर जमावाला पांगविण्यासाठी पोलिसांना लाठीमार करावा लागला. काही पोलीस देखील जखमी झाले आहेत. जमावातील काहीजणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच भिवंडीतील इतर दोन ठिकाणी देखील तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. याप्रकरणानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदलीचे संकेत मिळत होते. अखेर बुधवारी रात्री उशीरा भिवंडीचे पोलीस उपायुक्त डॉ. श्रीकांत परोपकारी यांची बदली मुख्यालयात करण्यात आली. तर मुख्यालय एकचे उपायुक्त मोहन दहिकर यांची भिवंडीच्या उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. परोपकारी यांची काही महिन्यांपूर्वीच विशेष शाखेतून भिवंडीच्या उपायुक्तपदी नियुक्ती झाली होती. परंतु भिवंडीतील दोन गटामध्ये झालेला वाद परोपकारी यांना भोवला आहे.


# मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवर ट्रक चालकाला लुटणाऱ्या पाच दरोडेखोरांना अटक

पनवेल, दि. २० : प्रतिनिधी

मुंबई -पुणे एक्सप्रेस हायवेवर ट्रक चालकाला लुटणाऱ्या पाच दरोडेखोरांना पनवेल तालुका पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून पाच मोबाईल फोन आणि 7 हजार रुपये जप्त करण्यात आले. रोहन उर्फ गुड्डू गोपीनाथ नाईक (वय 24), रोहिदास सुरेश पवार (वय 23), आतेश रोहिदास वाघमारे (वय 26), मनीष काळूराम वाघमारे (वय 35), शंकर चंदर वाघमारे (वय 18, सर्व राहणार निंबोडेवाडी, खालापूर) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांना न्यायालयात हजर केले असता २० सप्टेंबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली. ट्रकवरील चालक गेंदलाल पटेल हा लघुशंकेसाठी पळस्पे हायवे पोलीस चौकीच्या 200 मीटर पुढे थांबला असताना चोरट्यांनी 9 सप्टेंबर रोजी त्याला हाता बुक्कयानी मारहाण करून धमकावले आणि मोबाईल आणि रोख रक्कम घेऊन पोबारा केला. पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर व.पो.नी. अनिल पाटील, पोलीस निरीक्षक गुन्हे जगदीश शेलकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिरुद्ध गीजे, पोलीस उपनिरीक्षक हर्षल राजपूत, विजय देवरे, सुनील कुदळे, महेश धुमाळ, शिवाजी बाबर, सतीश तांडेल, राजकुमार सोनकांबळे, आकाश भगत, भीमराव खताळ, वैभव शिंदे, प्रवीण पाटील यांनी या गुन्ह्यातील आठ आरोपींपैकी पाच आरोपींना अटक केली. या गुन्ह्यातील आणखी तीन आरोपींचा शोध सुरू आहे. यातील रोहन उर्फ गुड्डू गोपीनाथ नाईक हा सराईत गुन्हेगार असून त्याने यापूर्वी पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे दोन,खालापूर येथे एक जबरी चोरी आणि दरोडेचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले आहे. यातील आरोपी हे दिवसा अन्य ठिकाणी नोकरी करायचे आणि रात्री मौजमजेसाठी एक्सप्रेस हायवेवर नागरिकांना लुटायचे अशी माहिती पोलिसांनी दिली.

# सात महिन्यांपासून बोरगाव येथील पाणीपुरवठा योजना ठप्प

■ महासागर प्रतिनिधी,
**सिल्ली दि. २१:** तालुक्यातील बोरगाव बुज. पुनर्वसन येथील गावकऱ्यांना शुद्ध व मुबलक पाणीपुरवठा करण्यासाठी तब्बल दोन कोटी एकोणऐंशी लक्ष बावन्न हजार रुपये खर्च करण्यात आले. पाण्याच्या टाकीजवळ सोलर पॅनल लावण्यात आले. घरच्या नळाला पाणी आज येईल, उद्या येईल, अशी गावकऱ्यांना आशा होती. मात्र मागील सात महिन्यांपासून गावातील ग्रामीण पाणीपुरवठा योजना ठप्प असून गावकऱ्यांच्या घरगुती नळाला पाणी आलेच नाही. त्यामुळे हर घर नल, हर घर जल या योजनेचा पूर्णतः फज्जा उडाल्याचे बोरगाव येथे चित्र आहे.



नागरिकांना या पाणीपुरवठा योजनेचा कोणताही लाभ झाला नसल्याने नाइलाजास्तव इतरत्र असलेल्या गढूळ पाण्याचे स्रोत शोधावे लागत असून शुद्ध पाण्याविना नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. देशातील बहुतांश लोकसंख्या ग्रामीण भागामधे राहते. ग्रामीण भागातील जनतेस शुद्ध व स्वच्छ आरोग्यदायी पाणीपुरवठा करणे सरकारचा मुख्य उद्देश आहे.

शासनाच्या धोरणानुसार ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्तीस ४० लीटर पाणी दरदिवशी दरमाणशी आवश्यक आहे. मात्र बोरगाव येथील टाकीतून एक थेंबही पाणी घरगुती नळाला येत नाही. ग्रामीण जनतेला पिण्याचे पाणी व आरोग्याच्या बाबीकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असून नळाला शुद्ध पाणी द्यायचे नव्हते तर लाखो रुपयांचा चुराडा का केला, अशी गावकऱ्यांची प्रतिक्रिया आहे.लक्ष देणार काय ?सात महिन्यांपासून पिण्याचा पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असताना स्थानिक प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची गरज आहे. ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या पाठपुराव्याची गरज आहे

## आमदार गायकवाड, खा. बोंडे यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करा

■ महासागर प्रतिनिधी,
**उमरखेड, दि. २१:** येथील महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी यांच्या वतीने खासदार राहुल गांधी यांच्या विरोधात वादग्रस्त विधान करणाऱ्या दोन आमदारांविरुद्ध ट्रॉसिटीचे गुन्हे दाखल करा या आशयाचे निवेदन दि. १८ सप्टेंबरला यवतमाळ शहर पोलिस ठाणेदारांना देण्यात आले.

आमदार संजय गायकवाड व आमदार अनिल बोंडे यांनी लोकसभेचे विरोधी पक्ष नेते तथा खासदार राहुल गांधी यांच्या विरोधात बेताल वक्तव्य केल्याबद्दल त्यांच्याविरुद्ध ट्रॉसिटी अंतर्गत गुन्हे दाखल करा असे निवेदन महाराष्ट्र प्रदेश कमिटी यवतमाळ अनुसूचित जाती विभाग यांच्या वतीने पोलिस निरीक्षक यवतमाळ यांना देण्यात आले आहे.यावेळी काँग्रेसचे महेंद्र कावळे, मिलिंद रामटेके, प्रमोदिनी रामटेके, मिलिंद धुळे, सिद्धार्थ भवरे, अशोक दवणे, प्रियंका बिडकर उपस्थित होते.

# भाजीपाल्याचे दर कडाडले, लसूण १२० रुपयाला पावभर

■ महासागर प्रतिनिधी,
**आर्वी, दि. २१:** सध्या भाजीपाला व धान्याचे भाव गगनाला भिडल्याने, मध्यम वर्ग व गरिबांना महागाईचा फटका बसत आहेत. यामुळे सर्वसामान्य गृहिणींचे महिन्याचे आर्थिक बजेट बिघडले आहे. यावर्षी पावसामध्ये उघडझाप असल्यामुळे भाजीपाल्यांची आवक कमी होऊन भावात प्रचंड तेजी आली आहे. १२० रुपयाला लसूण पावभर मिळत आहे. अद्रक, कांदे, मिरची, टोमॅटो, वांगी, गवार, भेंडी, फुलकोबी, कोथिंबीर यांचे भाव कडाडले असून इतर भाजीपालाही महाग झाला आहे.

जवळपास सर्वच भाजीपाल्यांचे भाव वाढत असताना टोमॅटोच्या भाववाढीमुळे महिलांच्या डोळ्यात अश्रू दाटून येत आहेत. रोजच्या आहारातील कांद्याचे भाव सुद्धा गगनाला भिडत असल्याने, कांदा उत्पादक शेतकरी आनंदी झाला असला तरी दलालांनी त्यालाही अंधारात ठेवून आपलं चांगभलं केले आहे. तद्वतच इंधनापासून गॅस सिलिंडरची किंमत सुद्धा वाढल्याने महिलांचे आर्थिक बजेट पार कोलमडले आहे. वातावरणातील नैसर्गिक चक्राच्या बदलामुळे भाजीपाल्याला मोठा फटका बसत असून उत्पादनात मोठी घट झाली आहे. त्यामुळे सर्वत्र लहान मोठ्या शहरांमध्ये व विशेषतः ग्रामीण भागामध्ये भाजीपाल्यांच्या दरात वाढ झाल्याचे दिसून येत आहे.



आता टोमॅटो ६० रुपये किलो, अद्रक २५० रुपये, मिरची २०० रुपये, कोथिंबीर ४०० रुपये, गवार १०० रु., कारले ८० रुपये, शेवग्याच्या शेंगा १०० रुपये, भेंडी ८० रुपये, असे भाव पाहायला मिळत आहेत. बहुधा येणारे एक-दोन महिने भावात घसरण होण्याची शक्यता दिसत नाही. मटण, मासे, डाळीचे भाव सुद्धा मोठ्या प्रमाणात वधारले आहेत. तूरडाळीचा भाव गगनाला भिडला असून तूरडाळ १६० रुपये दराने विकत घ्यावी लागत आहे.

काही महिन्यांपूर्वी भाजीपाल्यांचे दर इतके कोसळले होते की बाजारातून टोमॅटो फेकून देण्याची वेळ कास्तकार बंधूंवर आली होती.आता मात्र शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळत असला तरीही बदलत्या हवामानाचा विपरीत परिणाम होऊन उत्पादनात मोठी घट झालेली आढळून येत आहे. म्हणून भाववाढ होत असली तरीही बळीराजाच्या पदरी निराशाच दिसून येत आहे. त्यामुळे या भाववाढीवर नियंत्रण येणे गरजेचे आहे. साठेबाजी करणाऱ्या तथाकथित दलालांना वठणीवर आणणे गरजेचे झाले आहे.

# समाजाची घडी नीट करण्यासाठी वारकरी संप्रदायाची शिकवण गरजेची

## रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर यांचे सोहळ्यात प्रतिपादन



■ महासागर प्रतिनिधी,
**अकोला, दि. २१:** विस्कटलेली घडी नीट करण्यासाठी आज वारकरी संप्रदायाच्या शिकवणीची समाजाला खरी गरज आहे. ही शिकवण रस्त्यात पडलेला दगड बाजूला ठेवायला सांगते. दगड मारायला नव्हे! अशा शिकवणीच्या सेवाकार्यामुळेच आपणास राज्य शासनाचा ज्ञानोबा-तुकोबा हा पुरस्कार लाभला असून या पुरस्कारामुळे सेवाकार्याची जबाबदारी वाढली आहे. हा पुरस्कार खऱ्या अर्थाने वारकऱ्यांचा असल्याचे मत सत्कारमूर्ती, ज्येष्ठ रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर यांनी व्यक्त केले.

आदर्श गोसेवा व अनुसंधान प्रकल्पाच्या वतीने प्रमिलाताई ओक सभागृहात संजय महाराज पाचपोर यांचा गौरव सोहळा संपन्न झाला. यावेळी पाचपोर महाराज आपल्या सत्काराला उत्तर देत होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विदर्भ प्रांत सहसंघचालक नागपूर येथील श्रीधर गाडगे अध्यक्ष, तर प्रमुख पाहुणे जगद्गुरु तुकाराम महाराज यांचे वंशज शिवाजी महाराज मोरे उपस्थित होते.

संजय महाराज पाचपोर पुढे म्हणाले, वारकरी संप्रदाय हा बहुआयामी संप्रदाय आहे. गाथा, ज्ञानेश्वरी व भगवंताच्या अधिष्ठानावर हा संप्रदाय रचला आहे. या अनुषंगाने संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम व छत्रपती शिवाजी महाराज हे खऱ्या अर्थाने राज्यातील पहिले पुरोगामी असल्याचे पाचपोर महाराज यांनी सांगितले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुभाष जैन, माजी अध्यक्ष रतनलाल खंडेलवाल, रमेशचंद्र चांडक, ॲड. मोतीसिंह मोहता, किशोर पाटील, सोनू देशमुख आदींच्या उपस्थितीत सत्कारमूर्ती संजय महाराज पाचपोर यांचा शाल श्रीफळ, मानपत्र व चांदीची गोमाता प्रदान करून भावपूर्ण गौरव करण्यात आला. अध्यक्षीय मनोगतात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत सहसंघचालक श्रीधर गाडगे यांनी वारकरी संप्रदाय हा रसाळ वाणीचा संप्रदाय असल्याचे सांगितले. दरम्यान सत्कारमूर्ती संजय महाराज यांच्या अनेक संस्था, सेवा, संघटनांनी सत्कार केला. मानपत्र वाचन प्रशांत महाराज ताकोते, संचालन प्रा. विवेक बिडवई यांनी केले.

यावेळी आ. रणधीर सावरकर, विजय अग्रवाल, गोपाल खंडेलवाल, रामेश्वर पुंडकर, सदानंद महाराज, तायडे महाराज, संतोष पिसे, मेहत्रे, डॉ. प्रवीण चौहान, प्रकाश लोढिया, कृष्णा शर्मा, रामभाऊ भिरड समवेत विविध गावावरून आलेले हभप, महिला पुरुष नागरिक व आदर्श गोसेवा व अनुसंधान प्रकल्पाचे समस्त विश्वस्त उपस्थित होते.

**संतांमुळे वैचारिक चळवळ :** शिवाजी महाराज मोरे संत तुकाराम महाराज यांचे वंशज शिवाजी महाराज मोरे यांनी मनोगत व्यक्त करत संतांमुळे राज्यात वैचारिक चळवळ सुरू झाली असल्याचे सांगितले.

गोसेवा ही श्रेष्ठ सेवा असून या गोसेवेच्या माध्यमातून पाचपोर महाराज यांचे सेवा कार्य सातत्याने सुरू असून देशात वाढत चाललेली गोहत्या बंद व्हावी अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

# वक्फ बोर्ड संशोधन विधेयक रद्द करा




■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती, दि. २० :** केंद्र शासनाचे वक्फ बोर्ड संशोधन विधेयक रद्द करा, या मागणीसाठी गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलनाच्या अंतिम टप्प्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या वतीने राज्य शासनाला निवेदन पाठवण्यात आले. आझाद समाज पक्षाचे मुख्य सरचिटणीस मनीष साठे यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले.

वक्फ संशोधन विधेयक सध्या योग्य त्या दुरुस्तीसाठी संयुक्त संसदीय समितीकडे पाठवले आहे. परंतु या विधेयकामुळे मुस्लिम, अल्पसंख्याक समाज आक्रमक झाला. परिणामी केंद्र शासनाविरोधात रोष व्यक्त होत आहे. त्यासाठीच गुरुवारी निदर्शने करत शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

शासनाचे म्हणणे आहे की या विधेयकामुळे वक्फ बोर्डाच्या मालमत्तेचा वाद मिटेल. परंतु, केंद्र शासनाने घेतलेला हा निर्णय अत्यंत चुकीचा आहे. सीएए, एनआरसी, एससी-एसटीआरक्षणाचे वर्गीकरण यासारखे निर्णय हे असंवैधानिक आहे, असे आझाद समाज पक्षाचे म्हणणे आहे. याशिवाय बेरोजगारी, महागाई, जाती धर्मात तेढ निर्माण करणे अशीही कामे केंद्र शासनाने केली आहे. त्यामुळेच वक्फ बोर्ड संशोधन विधेयक तत्काळ रद्द करावे, अशी मागणी करत भविष्यात तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला.

आंदोलनात प्रदेश प्रवक्ते किरण गुडधे, जिल्हाध्यक्ष सनी चौहान, शहर अध्यक्ष विपुल चांदे, जिल्हा कार्याध्यक्ष बशीर पटेल, सुनील घटाळे, रवींद्र फुले, अन्सार बेग, मुजफ्फर खान, नयीमोद्दीन, मुजफ्फर हुसेन, यायाखान पठाण, दिलबर शहा, राजरत्न चंडिकापुरे, डॉ. अलिम पटेल आदी सहभागी झाले.

हे तर हिंदू मुस्लिम ऐक्य नष्ट करण्याचे काम भाजपप्रणित केंद्र सरकार देशात हिंदू-मुस्लिम ऐक्य नष्ट करण्याचे सातत्याने काम करत आहे. बेरोजगारी, महागाई भ्रष्टाचार याकडे लक्ष न देता हिंदू आणि मुस्लिमांमध्ये तेढ निर्माण करण्याचे काम मोदी सरकार करत आहे. निवडणुकीच्या तोंडावर विविध जनविरोधी निर्णय घेत आहे. मात्र, आझाद समाज पक्ष याला नेहमी विरोध करेल व त्यांचे मनसुबे हाणून पाडेल. मनीष साठे, सरचिटणीस, आझाद समाज पार्टी.

# अकोट-अकोलामार्गावर वृक्षाविना सावली हरपली

## रयत शेतकरी संघटनेच्या वतीने आंदोलनाचा इशारा ; ४५ किमी रस्त्यावर एकही झाड नाही



■ महासागर प्रतिनिधी,
**चोहोट्टा बाजार, दि. २१:** कासवगतीने का होईना पण अकोट-अकोला मार्गाचे काम आता पूर्णत्वास येत आहे. मात्र, त्याचवेळी रस्ता रुंदी करण्यासाठी कापण्यात आलेल्या मोठमोठ्या झाडाची अनुपस्थिती जाणवत आहे. मार्गावर वृक्षाची सावली पूर्णत: हरपलेली आहे. यामुळे लोकांच्या सोयीसाठी मार्गावर वृक्षारोपण करण्याची मागणी रयत शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. सुमारे आठ ते नऊ वर्षांपासून अकोट-अकोला ४५ किलोमीटर रस्त्याचे रुंदीकरण आणि काँक्रिटीकरणाचे काम सुरू आहे.

हे काम अजूनही पूर्ण झालेले नाही. रस्त्याच्या दोन्ही बाजूला बांधाच्या नाल्या अजूनही झाल्या नाहीत. सध्या कामाचा वेग बऱ्यापैकी आहे. दरम्यान हा रस्ता रुंदीकरणासाठी अडथळा ठरणाऱ्या झाडांची कत्तल करण्यात आली होती. मोठमोठे वृक्ष यंत्रणेच्या साह्याने कापण्यात आले. त्यामुळे ४५ किलोमीटर लांबीच्या रस्त्यावर आता झाड दिसून येत नाही.

शेतकऱ्यांची मदत होईल पावसाळ्यात वृक्ष लावून त्याच्या संवर्धनाची जबाबदारी संबंधित कंत्राटदारावर दिली पाहिजे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला असणाऱ्या शेतकऱ्यांची सुद्धा मदत यासाठी घेता येईल.

**- शरद बुंदे,** शिक्षक उपजिल्हाप्रमुख, शिवसेना ठाकरे गट.

काळजी घेण्यात यावी कडूलिंब, पिंपळ, वड यासारखे दीर्घ आयुष्य असणाऱ्या वृक्षाची लागवड करण्यात यावी. ही झाड भविष्यातील रुंदीकरणामध्ये अडथळा ठरणार नाही. याची आताच काळजी घ्यावी.
**गजानन बुंदे, वृक्षप्रेमी.**

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **MALVIKA GOVINDBHAI MALVIYA.** MY NEW NAME IS **MALVIKA GOVIND MALVIYA.**
**ADD:** 202 VARAD VINAYAK APARTMENT GANEDIWAL LAYOUT CAMP AMRAVATI 444601

MY OLD NAME WAS **RUMANA KAUSAR @ RUMANA ALI.** MY NEW NAME IS **RUMANA ATIQUE AHMED.**
**ADD:** PLOT NO 34-B, GOREWADA RING ROAD, GANDHI LAYOUT, NAGPUR 440013

MY OLD NAME WAS **NAVALKUMAR RANCHODDAS GOYANKA.** MY NEW NAME IS **NAVAL RANCHODDAS GOYANKA.**
**ADD:** FLAT NO. B2, 201, MAHABALIPURAM HIWARI NAGAR NAGPUR 440008

# समाज उद्धारासाठी मातृशक्तीचे योगदान मोठे

## सूर निरागस हो.. ; मोगरा फुलला कार्यक्रमात तिसरे पुष्प गुंफताना गणेश शिंदे यांचे मार्गदर्शन



■ महासागर प्रतिनिधी,
**बुलढाणा, दि. २०:** बुलडाणा जगत कल्याण साधण्यासाठी ज्ञानेश्वरी लिहिणारे ज्ञानोबा जेव्हा संन्याशाचे पोर म्हणून हिणवल्या गेले, समाजाकडून दुखावल्या गेले. त्या एका क्षणी उद्विग्न अवस्थेत गेलेल्या ज्ञानोबा यांनी स्वत:ला झोपडीत कोंडून घेतलं.

तेव्हा त्यांची समजूत कोण काढणार तर बहीण मुक्ताई धावून आली. आपल्या आर्त स्वरांमध्ये चिंता क्रोध दूर सारा..

ताटी उघडा ज्ञानेश्वरा ची आळवणी करत समाज उद्धारासाठी एक प्रकारे ज्ञानोबांना साद घातल्याचा प्रसंग आपल्या निरुपणातून गणेश शिंदे यांनी उलगडून दाखवला. बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळाच्या वतीने आयोजित मोगरा फुलला या निरुपणात सोमवारी तिसरे पुष्प गुंफताना ते बोलत होते. सुरुवातीला बुलडाणा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक यांनी व्यासपीठावर ज्ञानेश्वरी ग्रंथाला माल्यार्पण केले.

सुर निरागस हो.. शुभनयना, गणरायाला वंदन करत सुरसूमने उधळून सन्मित्रा शिंदे कार्यक्रमाला सुरुवात केली. निरूपणामध्ये विठ्ठलपंत आणि रुक्मिणी यांच्या निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान,मुक्ताई या चारही मुलांच्या जन्माचा उल्लेख करत जेवढे महत्त्व ज्ञानोबांना आहे तेवढेच इतर तीन भावंडांना देखील असल्याचे गणेश शिंदे यांनी सांगितले. माऊलींच्या आयुष्यामध्ये मुक्ताईच महत्त्व अधोरेखित केले. मुक्ताईमुळे नामदेव यांना भक्तीचा, ज्ञानाचा मार्ग सापडला. मोठ्या लोकांनी मोठ्या मनाने लहानांना मोठा वाटा द्यावा. वेगळ्या झालेल्या वाटा भेटून ,बोलून दुरावा संपवावा असे आवाहन केले. आई-वडील देखील जपा, ते देवघरातील निरंजन दिवा असून तो तेवत ठेवा. त्यांच्या जगण्याचा उत्सव करा. म्हातारपणी आई-वडिलांचेही आई -वडील व्हा. नात्यांमधला ओलावा जपा असेही ते यावेळी म्हणाले. पुढे ब्रह्मगिरीची प्रदक्षिणा, निवृत्तीनाथांना गहिनीनाथ महाराजांची भेट या प्रसंगांना शब्द सेवेतून मांडले.

सूत्रसंचालन व आभार संजय कुलकर्णी यांनी मानले. यावेळी अनंता देशपांडे, संस्थेचे सरव्यवस्थापक कैलाश कासट, बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष महेश चेकेटकर व सचिव प्रशांत काळवाघे व मुख्यालयातील सर्व पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. गणेश शिंदे व सन्मित्रा शिंदे.

**NAGPUR MUNICIPAL CORPORATION**
**TENDER NOTICE**

Commissioner, Nagpur Municipal Corporation, Nagpur, invites tenders in appropriate form for the following works. These tenders can be purchased by registered contractors from the office of the Executive Engineer (Electrical), NMC, Nagpur. Purchase and submission of tenders can be done from the office of the Executive Engineer (Electrical), NMC, Nagpur.

| Name of the work | Project Cost |
|---|---|
| Street Lighting at Sanjaybag Colony Road in Prabhag No. 03 under Zone No. 09, Aasinagar. | Rs. 3,41,499/- |

**Note :** Rates are exclusive of G.S.T. **(1)** Tender Submission end date : 25.09.2024 (03:00 pm.) **(2)** Date of Opening of Tender (If Possible) : 26.09.2024 (03:30 pm.)
**Executive Engineer (Electrical) N.M.C., Nagpur**
**Advt No : 499/PR, Dt : 20/09/2024**

VIDYAVARDHINI BAHUDDESHIYA SHIKSHAN SANSTHA
**TREATWELL COLLEGE OF NURSING**
Gaddigodam Square, Near Ajmera Tyres, Kamptee Road, Sadar, Nagpur.
Email: treatwellgnmcollege@gmail.com • Phone : 8956744408

**Applications are invited from the Students of Sindhi Minority & Non Minority Students for the Academic Year 2024-25**

| Sr. No. | Name of the Course | Total Intake | Minority Intake | Non-Minority Intake |
|---|---|---|---|---|
| 01 | G.N.M Nursing Course | 60 | 31 | 29 |

Admission Dates for the Minority Education Institute
1. Last Date for the Application :- 22/09/2024.
2. Date of Publication of Merit List :- 23/09/2024.
3. Admission Date :- 23/09/2024

SPECTRUM

**Public Notice**

If is hereby informed of the public at large that **Mohd. Mumtazuddin s/o Mohd. Hamiduddin**, Owner of the four wheeler vehicle **(MH-31-EA-6382 (Wagon RLX BS IV))** has Expired on **02-11-2016,** Smt. Shahnaz Mohammed Mumtazuddin, Add - Plot no 41, Ring Road, New Gandhi Layout, Dutt Nagar, Near S-4 Building, Nagpur 440013, has been succeeded by **Mohd. Mumtazuddin s/o Mohd. Hamiduddin**, and he is resident of R/O Plot no 41, Ring Road, New Gandhi Layout, Dutt Nagar, Near S-4 Building, Nagpur 440013. She being the successor of possession of above mentioned vehicle to confer intent to use the vehicle accordingly, he has applied to RTO authority /Regional transport office Bhandara for the transfer of vchicle on his name any person having any claim or objective in thos regara should inform within 7 days from the date of publication of this notice and bring such fact to that notice of RTO /Transport authority.

Name of Successor
**Shahnaz Mohammed Mumtazuddin**
Plot no 41, Ring Road, New Gandhi Layout, Dutt Nagar, Near S-4 Building, Nagpur 440013
Mob : 9822567364

**-:जाहिरात:-**

**विभागीय व्यवस्थापक शासकीय गोठीत रेत मात्रा निर्मिती केंद्र यांचे कार्यालय**

**-: जाहीर लिलाव :-**

सर्व शेतकरी,गोपालक,दुग्धव्यवसायीक व शासन मान्यताप्राप्त गोशाळा यांना कळविण्यात येते की, विभागीय व्यवस्थापक, शासकीय गोठीत रेत मात्रा निर्मिती केंद्र, अमरावती रोड, नागपूर या संस्थेतील खालील प्रमाणे पैदासी वळु शेतीकामाकरीता जाहीर लिलावाव्दारे विक्री करावयाचे आहेत.

| अक्र | जनावरांचा प्रकार/जात | वळु क्रमांक | एकुण |
|---|---|---|---|
| 1 | जर्सी संकरीत 50 % | 903,963,977,979,1009,1011 | 06 |
| 2 | साहीवाल 100% | 901 | 01 |
| 3 | गवळाव् 100% | 885 | 01 |
| | एकूण | | 4 |

जाहीर लिलावाच्या नियम व अटी
1) जनावरांचा जाहीर लिलाव दिनांक 25/09/2024 रोजी दुपारी ठीक 12.00 वाजल्यापासुन सुरु होईल .
2) लिलावधारकाने लिलावात भाग घेण्याकरीता शेतीचा 7/12 उतारा / दुग्ध व्यवसाय करीत असल्याचा दाखला तसेच आधारकार्ड सोबत आणणे आवश्यक आहे.
3) लिलावात भाग घेण्यासाठी लिलावधारकाने कार्यालयात रोख रु. 1000/- अनामत रक्कम म्हणुन ठेवणे आवश्यक आहे.
4) सदरची अनामत रक्कम लिलाव धारकास लिलाव अयशस्वी झाल्यास परत करण्यात येईल.
5) लिलावाची बोली ही रु. 1000/- च्या पटीत राहील.
6) लिलावात भाग घेण्यासाठी लिलाव समितीने ठरवुन दिलेल्या अटी क्र. 1 ते 15 मान्य असल्याचे स्वाक्षरी करुन देणे बंधनकारक आहे.
7) उर्वरीत जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत कार्यालयात व खात्याच्या संकेतस्थळावर www.ahd.maharashtra.gov.in वर पाहावयास मिळतील.

तरी गरजु व ईच्छुक पशुपालकानी / गोपालकांनी सदर वळु खरेदी करण्याबाबत जाहीर लिलावास दिनांक 25/09/2024 रोजी दुपारी 12.00 वाजता पासुन कार्यालयात उपस्थित राहावे.

(डॉ.अस्मिता न. पाटिल )
विभागीय व्यवस्थापक
शासकीय गोठीत रेत मात्रा निर्मिती केंद्र
अमरावती रोड, नागपुर

क्र. संमावज / नाग / ३६३ / २०२४

# कला, कौशल्य आणि अभिव्यक्ती !

## अंबानगरी फोटो-व्हिडीओग्राफर्स असोसिएशनचे छायाचित्र प्रदर्शन

छायाचित्रण ही एक कला आहे. वास्तवचित्रणाची यथार्थ कल्पना देणारे ते केवळ एक साधन नसून कला, विज्ञान आणि तंत्रविद्या इत्यादींचा आधार आहे. या कलेत छायाचित्रकाराची कलाविषयक जाणीव, प्रेरणा, अंतर्दृष्टी, उत्स्फूर्तता आणि कला-संबंधित संकल्पनांचा समावेश होतो. तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण असलेल्या छायाचित्रातून कलातत्वांचा बोध होत असतो. ती छायाचित्रे समाजाला आनंद, सौंदर्य, सुसंवाद आणि संदेश यांसारख्या गोष्टी देतात. कलात्मकता, कल्पकता आणि वैविध्य सिद्ध करण्याचे सामर्थ्य असलेल्या या सुसज्ज कला प्रकाराला स्वतंत्र अधिष्ठान प्राप्त झाले आहे.

-------------







अंबानगरी फोटो-व्हिडीओग्राफर्स असोसिएशनच्या वतीने अमरावती येथील श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनाच्या कला दालनात राज्यस्तरीय छायाचित्र प्रदर्शन भरविण्यात आले आहे. हे प्रदर्शन निसर्ग/वन्यजीव आणि प्रवास/उत्सव या दोन गटात विभागले असून प्रदर्शनात २५० हून अधिक छायाचित्रे मांडण्यात आली आहेत. हे प्रदर्शन दि. २२ सप्टेंबर पर्यंत सुरु राहणार आहे.

नैसर्गिक छायाचित्रण हे निसर्गाचे प्रतिबिंब असते. निसर्गातील विविध विषय आणि हालचालींमुळे निसर्गाचे छायाचित्रण करणे आव्हानात्मक आहे. त्यासाठी सयंम व सर्जनशीलता लागते. अंबानगरी फोटो-व्हिडीओग्राफर्स असोसिएशनच्या या प्रदर्शनात वनसंपदा, जैवविविधता, वन्यजीव, नैसर्गिक दृश्ये, आश्चर्यकारक फ्रॅक्टल्स आणि एकमेकात मिसळलेले गुंतागुंतीचे आकार यासारखे नैसर्गिक घटक छायाचित्रांच्या माध्यमातून प्रदर्शित केले आहेत.

**आशिष यावले**
**९९२२२९००२२**

पर्यावरणीय समस्या, नैसर्गिक संवर्धन यावर भाष्य करणारीही छायाचित्रे आहेत. डोंगरावर अलगद उतरणारे ढग, घाटवाटा, वाऱ्यावर डोलणारी नाजूक रानफुले, पावसाचे थेंब, रंगीबेरंगी फुलपाखरांचा मुक्त संचार ही छायाचित्रे अतिशय बोलकी आणि सूचक आहेत. गोंडस हरीण, आकर्षक मोर, पोपटांची शाळा आणि अन्य पशु-पक्ष्यांच्या टिपलेल्या हालचाली विलोभनीय आहेत.

प्रत्येक छायाचित्रातील भिन्न कोन, यथार्थ दर्शन, प्रकाश समतोल, सूक्ष्म छटाभेद, छायाचित्रकारांनी विकसित केलेली स्वतःची शैली आणि निसगार्ला समजून घेण्याचा त्यांचा व्यापक दृष्टीकोन छायाचित्राच्या माध्यमातून समोर आला आहे. विशेषतः मायक्रो लेन्सद्वारे टिपलेले ड्रॅगनफ्लाय, जाळे विणणारा कोळी कीटक, वनस्पती पेशी ही छायाचित्रे लक्ष वेधून घेतात.

वन्यजीव छायाचित्रणाचे तंत्र हे फार वेगळे आहे. प्राण्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात पकडणे अत्यंत कठीण असते. मात्र या प्रदर्शनात सहभागी झालेल्या छायाचित्रकारांनी प्राणी जीवनातील प्रेम भवना, पशु-पक्ष्यातील वात्सल्य कलात्मकतेने टिपले आहे.



रचनेतील चौकट, अवकाश विभाजन, नैसर्गिक प्रकाश स्त्रोत, वन्यजीवांशी निगडीत असलेल्या नैसर्गिक घटकांचा अतिशय सुचक उपयोग केला आहे. वाघाची भेदक नजर, रुबाबदार वनराज, चित्ता-बछड्यांचा खेळ, लढाईसाठी सज्ज झालेले दोन सरडे या छायाचित्रातील सौंदर्यमुल्य प्रभावी आहे. निसर्गात वास्तव्य करणाऱ्या प्राण्यांबद्दल आश्चर्य आणि कौतुकाची भावना जागृत करणारी जवळपास सर्वच छायाचित्रे नजरा खिळवून ठेवतात.

प्रवास/उत्सव या गटात शहरी आणि ग्रामीण भागातील वेगवेगळ्या विषयाची छायाचित्रे आहेत. त्यातील अनेक प्रतिमा त्या-त्या प्रदेश जीवनाशी इमान राखत पुढे आल्या आहेत. अवतीभवतीच्या माणसांचे नानाविध अनुभव त्यातील भावनाट्य हळूवार टिपले आहे. उत्साह, आनंद, उधान, व्यथा, वेदना, दुःख अशा जीवनजाणीवा छायाचित्रामध्ये बंधिस्त केल्या आहेत. ती छायाचित्रे उब्दोधक आहेत.

प्रवास छायाचित्रांच्या माध्यमातून आकर्षक ठिकाणे, पर्यटन स्थळे, गडकिल्ले, डोंगा वाहतूक, सांस्कृतिक कार्यक्रम, गमती-जमती यासारख्या आठवणींचे विशेष पैलू दर्शविणारी छायाचित्रे अतिशय सुंदर आहेत. भारतीय संस्कृतीत सण, उत्सवांना विशेष महत्व आहे. सण, उत्सवाच्या माध्यमातून माणसांमध्ये सकारात्मक उर्जा निर्माण होते. या काळात छायाचित्रकारांना कलात्मक छायाचित्र टिपण्यासाठी मोठी संधी असते. या प्रदर्शनातही सण-उत्सव काळातील विविध छायाचित्रे प्रदर्शित केली आहेत.

पणत्यांची आरास, गुलालाची उधळण, ढोल-ताशांचे वादन, गणेशभक्तांचा उत्साह, दहीहंडीची धूम, आषाढी वारी, भक्तिभावात तल्लीन झालेला वारकरी, जेजूरीचा खंडोबा उत्सव, शिव तांडव, गंगा आरती, कडक लक्ष्मी, रंगीबेरंगी क्षण, आकर्षक सजावटी, जत्रा, यात्रा या विषयाच्या छायाचित्रातील टिपलेले बारकावे, आकार, भाव, रचनात्मक संकल्पना व अनुरूप नैसर्गिक प्रकाशस्त्रोत यांच्या समन्वयातून छायाचित्रकारांनी आपल्या तंत्रशुध्द शैलीचा उत्तम नमुना सादर केला आहे. वैविध्यपूर्ण छायाचित्रांच्या या प्रदर्शनातून कला, संस्कृती, परंपरा, मानवी भावना आणि नैसर्गिक जगाचे विस्मयकारक सौंदर्य प्रदर्शित झाले आहे.

संवेदनशील, सर्जनक्षम आणि मर्मज्ञ ज्ञानेंद्रीयाने टिपलेली छायाचित्रे सौंदर्य व मुल्यांची जपणूक करणारी आहेत. ती न्याहाळतांना आपूसकच भावनिक बंध निर्माण करु लागतात. संवादू लागतात.

●●●●●●●●●

# सुधीर दिवे | एक गतिशील व्यक्तिमत्व आणि प्रगतीचा आधारस्तंभ



सुधीर वामनराव दिवे यांनी नुकतीच आपली ६१ वर्षे पूर्ण केली आहेत आणि त्यांच्या सार्वजनिक सेवा, आरोग्य, कृषी आणि ग्रामीण विकासातल्या योगदानामुळे समाजात एक अमिट छाप सोडली आहे.

२१ सप्टेंबर १९६३ रोजी जन्मलेले सुधीर दिवे यांचे जीवन समाजाच्या उन्नतीसाठी समर्पित आहे. ठरलेल्या वेळेत कार्य पूर्ण करण्याच्या त्यांच्या क्षमतेमुळे ते नेहमीच उत्कृष्टतेसाठी ओळखले जातात. दूरदर्शी दृष्टीकोन असलेले सुधीर दिवे हे कार्यक्षम नेते आहेत, ज्यांनी प्रत्येक क्षेत्रात आपली जबाबदारी निष्ठेने पार पाडली आहे. त्यांची कारकीर्द अत्यंत समर्पण, कार्यक्षमतेने आणि प्रगतीच्या ध्येयाने आकारली गेली आहे. गेल्या २० वर्षांपासून सदर लेखक यांच्याशी असलेले त्यांचे घनिष्ठ नाते देखील त्यांच्या कार्यातील सहयोगी वृत्तीचे प्रतीक आहे.

---------------------

**सार्वजनिक प्रशासन आणि नेतृत्व**

सुधीर दिवे यांची सार्वजनिक सेवेतली सुरुवात डिसेंबर १९८५ मध्ये तहसीलदार म्हणून झाली. त्यानंतरच्या वर्षांत, त्यांनी महाराष्ट्रातील विविध महत्त्वाच्या पदांवर काम केले, ज्यामुळे राज्याच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

**प्रा. सागर पासेबंद**
**अमरावती.**

१९९१ ते १९९३ या कालावधीत नागपूरच्या नगर परिषदेचे प्रधान अधिकारी म्हणून ते कार्यरत होते. येथे त्यांनी स्थानिक प्रशासनात एक कुशल अधिकारी म्हणून आपले स्थान प्रस्थापित केले. पुढे, १९९५ मध्ये उपजिल्हाधिकारी म्हणून ते पदस्थ झाले, आणि त्यांनी त्यावेळी प्रशासनात महत्त्वाची भूमिका बजावली.

१९९५ ते १९९९ या काळात त्यांनी मुंबई सार्वजनिक बांधकाम विभागाचे विशेष सचिव म्हणून काम केले, ज्यामुळे सार्वजनिक पायाभूत प्रकल्पांची वेळेवर अंमलबजावणी सुनिश्चित झाली. त्यांनी विरोधी पक्षनेते मा गडकरी साहेब यांच्यासाठी १९९९ ते २००५ या कालावधीत विशेष सचिव आणि जनसंपर्क अधिकारी म्हणून काम केले, ज्यामुळे त्यांना राज्यातील विविध महत्त्वाच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळाली.

केंद्रीय सरकारमधील त्यांचे योगदान देखील महत्त्वाचे आहे. २०१७ ते २०१९ दरम्यान त्यांनी जलसंधारण आणि नदी पुनरुज्जीवन विभागाचे विशेष सल्लागार म्हणून काम केले आणि महाराष्ट्रातील अनेक नद्यांचे पुनरुज्जीवन करण्यात यश मिळवले. २०१९ पासून ते सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयात सल्लागार म्हणून कार्यरत होते, ज्यामुळे ग्रामीण भागात लघुउद्योगांना प्रोत्साहन देऊन रोजगार निर्मिती झाली आहे.

**आरोग्य सेवेतील योगदान**

श्री संत अच्युत महाराज यांनी दाखविलेल्या मार्गावर चालत ,प्रशासनाबरोबरच, सुधीर दिवे यांनी आरोग्य क्षेत्रातही उल्लेखनीय योगदान दिले आहे. ते श्री संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल, अमरावतीचे उपाध्यक्ष आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली, त्यांनी ६ कोटी रुपयांचे उरफनिधी प्राप्त करून एक अत्याधुनिक कॅथलॅब स्थापीत होत आहे, ज्यामुळे त्या भागातील हृदय रुग्णांना आधुनिक उपचार उपलब्ध होणार आहेत. ह्या लॅबने त्या क्षेत्रातील हृदयविकाराच्या रुग्णांसाठी आयुष्यात महत्त्वपूर्ण सुधारणा होणार आहे.

**दुग्ध व्यवसाय आणि ग्रामीण विकासातले क्रांतिकारी कार्य**

सुधीर दिवे यांनी ग्रामीण विकासात केलेले कार्य अद्वितीय आहे. त्यांनी धानोली, कारंजा (वर्धा) येथे एक आधुनिक गोशाळा स्थापन केली आहे, जी देशी गाईंच्या संगोपनात विशेष लक्ष देत आहे. त्यांनी IVF (इन-व्हिट्रो फर्टिलायझेशन) आणि लिंग निवड प्रक्रिया सुरू करून जनावरांच्या उत्पादन क्षमतेत वाढ केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली दोन लाख लिटर प्रति दिवस दूध प्रक्रिया केंद्र स्थापन करण्यात आले आहे, ज्याचा अमरावती आणि नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना फायदा झाला आहे.

दुग्धव्यवसायाच्या माध्यमातून सुधीर दिवे यांनी शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान शिकवून त्यांचे उत्पन्न वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांनी गोबर आणि गोमूत्राचा उपयोग करून सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन दिले आहे, ज्यामुळे कृषी उत्पादन वाढले आणि पर्यावरणपूरक शेतीचे महत्त्व वाढले आहे.

**दूध उत्पादन वाढविण्याचे तंत्रज्ञान आणि सेंद्रिय शेतीचे प्रोत्साहन**

सुधीर दिवे यांनी ग्रामीण विकासात प्रगती साधण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग केला आहे. त्यांनी IVF आणि निवड लिंग प्रजनन प्रक्रिया यांच्या मदतीने शेतकऱ्यांना जनावरांच्या पुनरुत्पादन क्षमतेत सुधारणा केली आहे, ज्यामुळे दूध शीतकरण उत्पादनात मोठी वाढ झाली आहे. त्यांचे हा कार्यक्रम शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरला आहे.

**सामाजिक आणि सांस्कृतिक व्यक्तिमत्त्व**

प्रशासनात आणि आरोग्यातील त्यांच्या योगदानाबरोबरच, सुधीर दिवे सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. ते कृषी कल्याण साप्ताहिक, नागपूर या साप्ताहिकाचे संपादक आहेत. ते अनेक संस्थांशी संबंधित आहेत जसे श्री संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल, शिवभूमी प्रतिष्ठान इत्यादी.

**प्रगतीचा वसा**

सुधीर दिवे यांची कारकीर्द त्यांना मिळालेल्या जबाबदाऱ्या निष्ठेने पूर्ण करण्याच्या वचनाशी बांधलेली आहे. त्यांनी प्रशासन, आरोग्य सेवा, आणि ग्रामीण विकास या सर्व क्षेत्रांत त्यांचे योगदान दिले आहे, ज्यामुळे त्यांच्या नेतृत्वाचे आणि कार्यक्षमतेचे उदारण आहे.

सुधीर वामनराव दिवे यांनी नुकतीच ६१ वर्षे पूर्ण केली असून, त्यांचे कार्य अनेकांना प्रेरणा देणारे आहे. त्यांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळे समाजात अमूल्य बदल घडले आहेत आणि त्यांचा पुढचा प्रवासही प्रगतीचा नवा आदर्श घालून देईल याबद्दल खात्री आहे. एकषष्ठी च्या हार्दिक शुभेच्छा आणि पुढील वाटचालीत जनता जनार्दनाचे खूप मोठे कार्य आपल्या हातून घडो हे शुभचिंतन!

●●●●●●●●●

# शांतता दिवस : जागतिक सौहार्द जपण्याची गरज

दरवर्षी 21 सप्टेंबर रोजी जगभरात आंतरराष्ट्रीय शांतता दिवस साजरा केला जातो. दोन दशकांनंतर 2001 मध्ये महासभेने हा दिवस 1981 मध्ये एकमताने संयुक्त राष्ट्रसंघाच्या ठराव 36/37 द्वारे स्थापित जनरल असेंब्लीने हा दिवस सर्व राष्ट्रे आणि लोकांमध्ये आणि शांततेच्या आदर्शांचे स्मरण आणि 24 तास अहिंसा आणि युद्धविराम पाळण्याद्वारे शांततेच्या आदर्शांना बळकट करण्यासाठी समर्पित दिवस म्हणून आंतरराष्ट्रीय शांतता दिवस घोषित केले आणि सप्टेंबर 1982 मध्ये पहिल्यांदा साजरा केला गेला. अनेक राष्ट्रे, राजकीय गट, लष्करी गट आणि लोक पाळतात. अहिंसा आणि युद्धविरामाचा कालावधी म्हणून नियुक्त करण्यासाठी मतदान केले. सोप्या भाषेत सांगायचे तर, प्रत्येकासाठी अधिक शांततापूर्ण जग निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे.

---------------

शांतता आपल्या जीवनाच्या जवळजवळ प्रत्येक पैलूवर परिणाम करते. जागतिक शांतता ही पृथ्वीवरील सर्व लोक आणि राष्ट्रांमध्ये आणि त्यांच्यामध्ये शांततेच्या आदर्श स्थितीची संकल्पना आहे. दलाई लामा यांनी ते चांगले सांगितलेः ह्लजागतिक शांतता आंतरिक शांततेतून विकसित झाली पाहिजे. शांतता म्हणजे केवळ हिंसाचाराचा अभाव नाही. माझ्या मते शांतता ही मानवी करुणेचे प्रकटीकरण आहे.

वेगवेगळ्या संस्कृती, धर्म, तत्त्वज्ञान आणि संघटनांमध्ये असे राज्य कसे निर्माण होईल, याबद्दल वेगवेगळ्या संकल्पना आहेत. विविध धार्मिक आणि धर्मनिरपेक्ष संघटनांचे मानवी हक्क, तंत्रज्ञान, शिक्षण, अभियांत्रिकी, वैद्यक किंवा मुत्सद्देगिरी या सर्व प्रकारच्या लढाईचा अंत करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मुत्सद्देगिरीला संबोधित करून जागतिक शांतता प्राप्त करण्याचे उद्दिष्ट आहे. 1945 पासून युनायटेड नेशन्स आणि त्याच्या सुरक्षा परिषदेचे पाच स्थायी सदस्य (चीन, फ्रान्स, रशिया, युनायटेड किंगडम आणि युनायटेड स्टेट्स) युद्धाशिवाय संघर्षांचे निराकरण करण्याच्या उद्देशाने कार्यरत आहेत. तरीही तेव्हापासून राष्ट्रांनी अनेक लष्करी संघर्षात प्रवेश केला आहे.

शांतता बळजबरीने राखली जाऊ शकत नाही; ती केवळ समजूतदारपणानेच मिळवता येते. शांतता म्हणजे संघर्षाची अनुपस्थिती नाही, ती शांततापूर्ण मार्गाने संघर्ष हाताळण्याची क्षमता आहे. स्वतःला हाताळण्यासाठी, आपले डोके वापरा; इतरांना हाताळण्यासाठी, आपले हृदय वापरा. शत्रुत्व आणि हिंसाचार नसतानाही शांतता ही सामाजिक मैत्री आणि सौहार्दाची संकल्पना आहे.

**पूर्वार्ध**

सामाजिक अर्थाने, शांतता म्हणजे सामान्यतः संघर्षाचा अभाव (जसे की युद्ध) आणि व्यक्ती किंवा गटांमधील हिंसाचाराच्या भीतीपासून मुक्तता. संपूर्ण इतिहासात नेत्यांनी वर्तनात्मक संयम स्थापित करण्यासाठी शांतता आणि मुत्सद्देगिरीचा वापर केला आहे, ज्यामुळे विविध प्रकारचे करार किंवा शांतता कराराद्वारे प्रादेशिक शांतता किंवा आर्थिक वाढीची स्थापना झाली आहे. अशा वर्तणुकीवरील संयमामुळे अनेकदा संघर्ष कमी झाला, आर्थिक परस्परसंवाद वाढला आणि परिणामी भरभराट झाली.

मानसिक शांतता (जसे की शांततापूर्ण विचार आणि भावना) कदाचित कमी चांगल्या प्रकारे परिभाषित केले जाते, तरीही वर्तणुकीशी शांतता स्थापित करण्यासाठी एक आवश्यक अग्रदूत आहे. शांततापूर्ण वर्तन कधीकधी ह्लशांततापूर्ण आंतरिक स्वभावमुळे होते. दैनंदिन जीवनातील अनिश्चिततेवर अवलंबून नसलेल्या आंतरिक शांततेच्या विशिष्ट गुणवत्तेने शांततेची सुरुवात केली जाऊ शकते. स्वतः साठी आणि इतरांसाठी अशा शांततापूर्ण अंतर्गत स्वभावचे संपादन अन्यथा परस्परविरोधी हितसंबंधांचे निराकरण करण्यात योगदान देऊ शकते.

शांतता सहसा उत्साहाच्या स्थितीत नसते, जरी आपण उत्साही असताना आनंदी असतो, परंतु शांतता असते जेव्हा एखाद्याचे मन शांत आणि समाधानी असते. शांतता, सुरक्षा, भविष्यः मूलभूत गरजा ज्या हिंसक संघर्षाच्या दरम्यान असलेल्या लोकांना हव्या असतात आणि शोधतात. तथापि, विश्वास, उपजीविका, संस्था आणि नातेसंबंध परत निर्माण करणे हे एक जटिल आणि दीर्घकालीन प्रयत्न आहे, जे पुढे आणि मागे पावले भरलेले आहे. शांतता प्रस्थापित करण्याचे हे कार्य आहे. प्रत्येकाला सुरक्षित आणि आनंदी जीवनाचा अधिकार आहे, परंतु जगभरातील लाखो लोक युद्ध आणि हिंसाचारामुळे त्रस्त आहेत.

आंतरराष्ट्रीय शांतता दिवस ज्याला अधिकृतपणे जागतिक शांतता दिवस म्हणून देखील ओळखले जाते. ही संयुक्त राष्ट्रांनी मंजूर केलेली सुट्टी आहे जी दरवर्षी २१ सप्टेंबर रोजी पाळली जाते.



**प्रविण बागडे**
**नागपूर. 9923620919**
pravinbagde@gmail.com

---------

**(उर्वरीत भाग उद्या)**

●●●●

# छावणी : ऊर्जावान गौरव ग्रंथ



तामिळनाडूच्या पब्लिशर्स असोसिएशनतर्फे दिला जाणारा कल्लय्यान्यार हा साहित्य पुरस्कार सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधिशांच्या हस्ते स्वीकारताना अर्जून डांगळे.

**उत्तरार्ध**

**छावणी**
अर्जुन डांगळे गौरव ग्रंथ
सायन पब्लिकेशन्स प्रा. लि.,पुणे.
पृष्ठे - ५५० : मूल्य - रु. ९००/-

समीक्षक विचारवंत डॉ. भास्कर पाटील म्हणतात, आंबेडकरी राजकारणाचे भाष्यकार म्हणूनही अर्जुन डांगळे यांच्या नावाचा उल्लेख केला जातो. त्यांनी वाङ्मयातील ललित-वैचारिक अशी दोन्ही दालने समृद्ध केलीत. आंबेडकरी समीक्षा दालनही समृद्ध केले.

जवळपास चाळीस दिग्गज लेखक-लेखिकांनी आपल्या चिंतनपर लेखनाने हा गौरव ग्रंथ समृद्ध केलाय. या लेखात सर्वांचा उल्लेख करता येणार नाही. आपल्यावरही असा भरदार गौरवग्रंथ निघावा असं वाटायला भाग पाडणारा हा श्रीमंत गौरव ग्रंथ आहे. छायाचित्र विभागही खूपच बोलका आहे. त्यात आयु अर्जुन डांगळे व चारुशीला डांगळेया दांपत्याच्या छायाचित्राने सुरवात होते. आई वडील, गणगोत व मान्यवरांची छायाचित्रे लक्ष वेधून घेतात.यात बाळासाहेब ठाकरे, मा. उद्धव बाळासाहेब ठाकरे, सुशिलकुमार शिंदे, बाबा आढाव, कांशीराम, रा.सु.गवई, मुलायमसिंग, प्रकाश आंबेडकर, ना. रामदास आठवले, कॉ. तारा रेड्डी, मृणालताई, कॉ. अहिल्या रांगणेकर, ज. वि. पवार, सुभाष देसाई, डॉ. सीताराम येचुरी, बॅ. ए. आर. अंतुले, डॉ. यशवंत मनोहर, बाबूराव बागूल, कॉ. गोविंद पानसरे, डॉ. रावसाहेब कसबे, विलासराव देशमुख, मधू दंडवते, कॉ. इन्द्रजीत गुप्ता, संगीतकार नौशाद, कुमार सप्तर्षी, गुलजार, कविश्रेष्ठ कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, निळूभाऊ फुले, असे कितीतरी दिग्गज आहेत.

सायन पब्लिकेशन्सची ही कृती छपाई, मांडणी, कागद यांचा विचार केल्यास सर्वांगसुंदर कृती आहे. ग्रंथालयांनी या संदर्भमूल्य असलेल्या ग्रंथाला आवर्जुन स्थान द्यावे, अशी ही कृती आहे. शांत, संयमी, प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाचे धनी, मित्रवर्य अर्जुन डांगळे साहेबांना दीर्घ आयुरारोग्य लाभो ही शुभेच्छा !

------------

**डी. बी. जगत्पुरिया**
**9860485398**
**मीरानगर, पडेगांव,**
**औरंगाबाद.**

●●●●●●●




# झटक्यात सुटला असता चष्मा

चष्म्याचा नंबर घालविण्याचा दावा करणाऱ्या एका आय ड्रॉपला भारतीय बाजारात उतरविण्यापूर्वीच बंदी आली आहे. कंपनीने असा दावा केला होता की या आय ड्रॉपने नजरेचा चष्मा दूर होण्यास मदत मिळेल. भारतीय औषध नियामक एजन्सीने या आय ड्रॉपला मंजूरी देखील दिली होती. परंतू आता उऋउड ने मायोपिया आणि हायपरमेट्रोपिया हे आजार दूर करण्याचा दावा करणाऱ्या या आय ड्रॉपवर नोटीसीला उत्तर मिळेपर्यंत बंदी घातली आहे.

मायोपिया आणि हायपरमेट्रोपिया या आजारावर उपचार करण्यासाठी मुंबई स्थित एन्टोड (ENTOD) फार्मास्यूटिकल्स या कंपनीने PresVu नावाने एक आयड्रॉपची निर्मिती केली होती. याच्या नियमित वापराने नजरेचा चष्मा दूर होऊ शकतो असे म्हटले जात होते.

सेंट्रल ड्रग्स स्टॅंडर्ड कंट्रोल ऑर्गनायझेशनच्या एक्सपर्ट कमेटीद्वारा आधी या उत्पादनाची शिफारस केल्यानंतर ENTOD फार्मास्यूटिकल्सला ड्रग कंट्रोलर जनरल ऑफ इंडियाने (DCGI)अंतिम मंजूरी देखील दिली होती. परंतू या कंपनीने आपल्या आय ड्रॉपच्या (1.25% पिलोकार्पाइन ६/५) अशा प्रकारच्या भ्रामक दावा करण्याच्या प्रचाराची दखल घेत नियामक संस्थेचा पुढील आदेश मिळत बंदी घातली आहे.

## अशोकायन

### सी.बी.एस.ई .

**सीबीएसई कोर्स**
**तसा आहे परिपुर्ण**
**पण बहुसंख्य शाळेत**
**तो होतोच कुठे पुर्ण?**

**शिक्षण मंडळ ही करीत आहे**
**सीबीएसईचा विचार सद्या**
**अभिनंदन त्यांचे, पण नको**
**एक ना धड भाराभर चिंध्या . .**

**साधन सामुग्री मनुष्य बळाचा**
**घेऊनच अदमास**
**शुभारंभ करता योजना**
**फलद्रुप होईल हमखास ..**



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
(९४२१३९४३३९)

# राहुल गांधी काय म्हणाले ते देखील आधी सांगा

## राज्यातील काँग्रेसच्या आंदोलनाआधीच भाजप खासदार अनिल बोंडे यांचे आव्हान

■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती, दि. २१ :** काँग्रेसला माझ्या विरोधात आंदोलन करायचे असेल तर त्यावर मला काहीही म्हणायचे नाही. मात्र, आंदोलन करण्याआधी राहुल गांधी काय म्हणाले होते, ते देखील जनतेला सांगावे, असे आव्हान खासदार अनिल बोंडे यांनी दिले आहे. राहुल गांधी यांच्या जिभेला चटके द्यायला हवे, अनिल बोंडे यांनी असे वादग्रस्त वक्तव्य केले होते. यावर आता काँग्रेसच्या वतीने त्यांच्या विरोधात राज्यभर आंदोलन करण्यात येत आहे. यावर अनिल बोंडे यांनी देखील पलटवार केला आहे.

माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी देखील आरक्षण संपवण्याची भाषा केली होती. भारतामध्ये निवडणुकीच्या काळामध्ये आम्ही आरक्षणाची मर्यादा वाढवणार, जातीनिहाय जनगणना करणार, असा दावा राहुल गांधी यांनी केला होता. एकिकडे आरक्षणाची मर्यादा वाढवण्याचा दावा करायचा आणि दुसरीकडे अमेरिकेममध्ये जात आरक्षण संपवण्याची भाषा ते करत आहे. असा आरोप देखील बोंडे यांनी केला आहे. काँग्रेसने माझ्याविरुद्ध आंदोलन निश्चित करावे त्यांच्या आंदोलनावर मला काही म्हणायचे नाही. मात्र, राहुल गांधी आरक्षणावर काय म्हणाले होते, हे देखील जनतेचा सांगावे, असे आवाहन देखील खासदार बोंडे यांनी दिले आहे.

आरक्षणाच्या मुद्यावर वादग्रस्त विधान करणाऱ्या काँग्रेस नेते राहुल गांधी यांची जीभ छाटू नका, तिला केवळ चटके द्या, असे वादग्रस्त विधान भाजप खासदार अनिल बोंडे यांनी केले होते. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेच्या आमदारानंतर भाजप खासदार बोंडे यांनी असे विधान केल्यामुळे राज्याचे राजकारण चांगलेच तापले आहे.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आपल्या अमेरिका दौऱ्यात आरक्षणाच्या मुद्यावर कथित वादग्रस्त विधान केले होते. देशात सर्वांना समान संधी मिळू लागतील, तेव्हा काँग्रेस आरक्षण संपुष्टात आणण्याच्या मुद्यावर विचार करेन. पण सध्या भारतात अशी कोणतीही परिस्थिती नाही, असे ते म्हणाले होते. त्यांच्या या विधानानंतर सत्ताधारी शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी त्यांची जीभ छाटणाऱ्यास ११ लाख रुपयांचे बक्षीस देण्याची घोषणा केली होती. त्यानंतर आता भाजप खासदार अनिल बोंडे यांनी राहुल गांधी यांच्या जिभेला चटके देण्याची मागणी केली होती.

### जिभेला चटके देण्याची गरज -अनिल बोंडे

अनिल बोंडे म्हणाले होते की, आमदार संजय गायकवाड यांनी जीभ छाटण्याची केलेली भाषा योग्य नाही. पण राहुल गांधी यांनी आरक्षणावर



केलेले विधान अतिशय भयानक आहे. कुणी परदेशात जाऊन असे वात्रटासारखे बोलत असेल तर त्याची जीभ छाटू नये, तर त्याच्या जिभेला चटके द्यावेत. अशा लोकांच्या जिभेला चटके देण्याची फार गरज असते.

अनिल बोंडे यांनी यावेळी पत्रकार ज्ञानेश महाराव व अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे कार्यकर्ते श्याम मानव यांच्यावरही निशाणा साधला होता. भारतातील बहुसंख्यकांच्या भावना दुखावणाऱ्या लोकांना किमान त्यांच्या चुकीची जाणीव करून देण्यासाठी त्यांची जीभ छाटू नये तर त्यांच्या जिभेला चटके निश्चितपणे दिले पाहिजे, असे ते म्हणाले.

### युवक काँग्रेसचे आंदोलन

भाजपचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांच्या विरोधात बुधवारी आक्षेपार्ह वक्तव्य केले. त्यामुळे काँग्रेस व भाजप असा नवा वाद निर्माण झाला आहे. या वक्तव्याचा निषेध करण्यासाठी संतप्त युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी खासदार बोंडे यांच्या घरासमोर आंदोलन केले. यावेळी तीव्र नारेबाजी करीत डॉ. अनिल बोंडे यांच्या प्रतीकात्मक पोस्टरला चपलांनी बदडले. तसेच कारवाईची मागणी रेटून धरली आहे. यावेळी कोणतेही अनुचित प्रकार घडू नये. यासाठी बोंडेच्या घरापुढे तगडा पोलिस बंदोबस्त लावण्यात आला आहे.

### विजय वडेट्टीवार यांचा पलटवार

दुसरीकडे, काँग्रेस नेते तथा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी अनिल बोंडे यांच्या विधानाचा चांगलाच समाचार घेतला होता. ते म्हणाले, संविधान रक्षणाची भाषा करणारे, जातनिहाय जनगणना करण्याची मागणी करणारे आमचे नेते राहुलजी गांधी यांच्या जीभेला चटके देण्याची भाषा आता भाजपचे राज्यसभा अनिल बोंडे यांनी केली आहे. महायुती मधील नेत्यांची तोंडाची गटार बंद होत नाही. एका मागून एक महायुतीचे नेते आमचे नेते राहुल गांधी यांच्याविरुद्ध प्रक्षोभक वक्तव्य करत आहेत. संविधान वाचवण्याची भूमिका आणि जातनिहाय जनगणनेची मागणी राहुलजी गांधींनी घेतल्यामुळे भाजप आणि त्यांच्या मित्र पक्षांना राजकीय चटके बसत आहेत. म्हणूनच खासदार अनिल बोंडे आणि आमदार संजय गायकवाड नैराश्यामुळे राहुल गांधी बद्दल अशी भाषा वापरत आहे.

### आता पाहू काय म्हणाले होते संजय गायकवाड ?

राहुल गांधी यांच्या आरक्षणावरील विधानावर भाष्य करताना आमदार संजय गायकवाड म्हणाले होते की, महाराष्ट्रात व देशात आरक्षणाच्या मागणीसाठी आग लागली आहे. मागासलेल्या जातींना समाजाच्या बरोबरीने उभे करण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात मागासवर्गीय, आदिवासी, ओबीसी व इतर प्रवर्गांना आरक्षणाची तरतूद केली. असे असताना काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनी परदेशात जाऊन आरक्षण संपवण्याचे विधान केले. या माध्यमातून त्यांनी काँग्रेसचा खरा चेहरा व पोटातील मळमळ ओकून दाखवली. काँग्रेसने लोकसभा निवडणुकीत आरक्षण व संविधान धोक्यात असल्याचे फेक नरेटिव्ह पसरवले. त्यातून त्यांनी दिनदुबळ्या समाजाची मते घेतली. त्यानंतर आज ते आरक्षण संपवण्याची भाषा करत आहेत. याचा अर्थ त्यांना सर्वच मागासवर्ग, आदिवासी, दलित व इतरांचे आरक्षण संपवायचे आहे. त्यामुळे आरक्षण संपवण्याची भाषा करणाऱ्या राहुल गांधी यांची जीभ छाटणाऱ्यास मी ११ लाख रुपयांचे बक्षीस देईल, असे ते म्हणाले होते.

# आमिर खान २१ सप्टेंबरला अकोल्यात, शेतकऱ्यांशी संवाद साधणार

■ महासागर प्रतिनिधी,
**अकोला, दि. २०:** जागतिक हवामान बदल व व्यावसायिक स्पर्धेच्या कालखंडात अत्याधुनिक शेती तंत्रज्ञान, पीक पद्धती, कृषिमाल प्रक्रियेसह विपणन क्षेत्रातील अद्ययावत माहिती शेतकऱ्यांपुढे मांडण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाद्वारे २० सप्टेंबरपासून तीन दिवसीय खरीप शिवार फेरी आयोजित करण्यात आली आहे. पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून सामाजिक कार्य करणारे अभिनेते आमिर खान शिवार फेरीत सहभागी होऊन शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत, अशी माहिती डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी ते तंत्रज्ञान जाणून घेणार आहेत.

व्यावसायिक शेतीचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांनी अवगत करणे काळाची गरज झाली आहे. त्याच्या प्रत्यक्ष वापरातून शेतकऱ्यांना समृद्धी साधता येते.

विद्यापीठाद्वारे आयोजित शिवार फेरीला २० सप्टेंबर रोजी सकाळी ४.३०. वाजतापासून सुरुवात होईल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांची विशेष उपस्थिती राहील. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, कृषिमंत्री धनंजय मुंडे आदी




प्रामुख्याने उपस्थित राहतील, असे कुलगुरूंनी सांगितले.

### तंत्रज्ञानाचा मेळा

शिवार फेरीमध्ये प्रगत कृषी तंत्रज्ञान विषयक माहिती मिळणार असून विद्यापीठाचे संपूर्ण संशोधन प्रक्षेत्र अवलोकनासाठी उपलब्ध राहील. यंदाच्या शिवार फेरीत विविध पिकांच्या वाणासह सेंद्रिय शेतीचे विविध पैलू जाणून घेता येईल.

कृषी प्रक्रिया उद्योगातील विविध संधी, शेतीपयोगी यंत्र व अवजारे, जातिवंत गोवंशाचा संवर्धन प्रकल्प, आधुनिक मोकळ्या पद्धतीचा गोठा, एकात्मिक शेती तंत्रज्ञान प्रकल्प, रेशीम शेती प्रत्यक्ष पाहता येणार आहे.

### आमिर खान विशेष विमानाने येणार

अकोल्यातील शिवार फेरीमध्ये २१ सप्टेंबरला अभिनेते आमिर खान सहभागी होणार आहेत. विशेष विभामाने ते सकाळी ४.३०. वाजता शहरात दाखल होतील. त्यानंतर दुपारी ३ वाजेपर्यंत ते कृषी तंत्रज्ञान जाणून घेत शेतकऱ्यांशी संवाद साधतील. नाम फाउंडेशन व विद्यापीठात करार झाला आहे, असे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी सांगितले.

### दोनशेहून अधिक प्रात्यक्षिक

गहू संशोधन विभागाच्या प्रक्षेत्रावर एकाच ठिकाणी वीस एकर क्षेत्रावर खरीप पिकांच्या विविध जातींचे तथा तंत्रज्ञानाचे दोनशेहून अधिक प्रात्यक्षिक साकारण्यात आले आहेत.

विविध विद्यापीठ तथा खासगी संस्थांद्वारे संशोधित विविध पिकांच्या जाती, लागवड तंत्रज्ञान एकाच ठिकाणी बघायला उपलब्ध राहील.

# जि.प.चा आरोग्य विभागच 'आजारी'; १८ पैकी १५ संवर्गातील ५४१ पदे रिक्त



■ महासागर प्रतिनिधी,
**गडचिरोली,दि. २१ :** जिल्ह्याच्या ग्रामीण भागात आरोग्य व्यवस्थेचा कणा म्हणून ओळख असलेल्या जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाला रिक्त पदांचा आजार जडलेला आहे. जि. प. अंतर्गत एकूण मंजूर १ हजार ३२८ पदांपैकी७३७ पदे भरलेली आहेत, तर५४१ पदे रिक्त आहेत. यामुळे दुर्गम भागातील रुग्णांना वेळीच उपचार न मिळणे व उपचाराअभावी मृत्यू यासारख्या घटनांवरून जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेचे धिंडवडे उडत असल्याचे चित्र अधूनमधून दिसून येत आहे.

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागांतर्गत ग्रामीण भागात आरोग्य उपकेंद्र, आरोग्य पथक व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून आरोग्यसेवा दिली जाते. याशिवाय जिल्हा परिषद अंतर्गत सहायक संचालक कुष्ठरोग, माता बाल संगोपन अधिकारी, जिल्हा क्षयरोग अधिकारी, जिल्हा हिवताप अधिकारी, साथरोग अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी यांच्या माध्यमातून आरोग्य सेवेची अंमलबजावणी व संनियंत्रण केले जाते. अधिकाऱ्यांची ही प्रमुख पदे सध्या प्रभारींच्या खांद्यावर आहेत. एकूण १८ संवर्गापैकी तब्बल १५ संवर्गातील विविध पदे रिक्त आहेत. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा प्रशिक्षण पथकाचे वैद्यकीय अधिकारी प्रत्येकी एक तर आरोग्य सहायक (महिला) एकूण ५३ पदे ही पदे भरलेली आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद अंतर्गत आरोग्य विभागातील अन्य रिक्त पदे केव्हा भरणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.प्रधान सचिवांकडे पाठपुरावा सुरूजिल्हा परिषद आरोग्य विभागांतर्गत अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्यात यावीत, यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी आयुषी सिंह यांनी १४ जुलै २०२४ रोजी सार्वजनिक आरोग्य विभागाकडे पत्राद्वारे पाठपुरावा केला.

यासंदर्भात त्यांनी आरोग्य विभागाच्या प्रधान सचिवांना नियमित पदे भरण्याची विनंती केली होती; परंतु दोन महिन्यांचा कालावधी उलटूनही अजूनपर्यंत काहीच कार्यवाही झालेली नाही.वैद्यकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या पदांबाबतची स्थितीपदाचे नाव मंजूर पदे भरलेली रिक्त पदेवैद्यकीय अधिकारी गट-अ ७८ ०३वैद्यकीय अधिकारी गट-ब४५४७५ २० प्रयोगशाळा वैद्यकीय अधिकारी ५८ ५३ ०५ औषध निर्माण अधिकारी ८४ ६० २४ आरोग्य सहायक (पुरुष) १०० ९८ ०२ आरोग्य सहायक (महिला)५३ ५३ ०० आरोग्य सेवक (पुरुष) २४८ ४७ २०१ आरोग्य सेविक (महिला) ५५७ २२४ ३२८ जिल्हा आरोग्य अधिकारी नियमित, बाकी सर्व प्रभारीजिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांचे पद भरलेले आहे; परंतु वर्ग-ची अनेक पदे रिक्त आहेत.

> जिल्हा परिषद अंतर्गत सहायक संचालक कुष्ठरोग, माता बाल संगोपन अधिकारी, जिल्हा क्षयरोग अधिकारी, जिल्हा हिवताप अधिकारी, साथरोग अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी यांच्या माध्यमातून आरोग्य सेवेची अंमलबजावणी व संनियंत्रण केले जाते.

यामध्ये अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी, सहायक संचालक (कुष्ठरोग), जिल्हा माता बालसंगोपन अधिकारी, जिल्हा क्षयरोग अधिकारी आदी पदे तसेच जिल्हा हिवताप अधिकारी वर्ग- २, वैद्यकीय अधिकारी (साथरोग) आदी पदे रिक्त आहेत.

विशेष म्हणजे, तालुका आरोग्य अधिकाऱ्यांची १२ पैकी ११ पदे भरलेली आहेत, ही जमेची बाजू आहे.

# मतदारयादी जाहीर लवकर करून घ्या आपल्या नावाची खात्री

■ महासागर प्रतिनिधी,
**चंद्रपूर, दि. २० :** आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत जिल्हा प्रशासनाने मतदारयादी जाहीर करून दोन आठवडे होत आहेत. ही यादी सर्व मतदान केंद्र, तहसील कार्यालये, उपविभागीय अधिकारी कार्यालये, जिल्हाधिकारी कार्यालय व संकेतस्थळावरही उपलब्ध करून देण्यात आली. मात्र, अनेकांनी यादीकडे ढुंकूनही पाहिले नसल्याची माहिती आहे. याबाबत 'लोकमत'ने गुरुवारी (दि. १४) विचारणा केली असता कुणी म्हणाले, सध्या वेळ नाही, तर कुणी म्हणताहेत नंतर बघू, अशी उत्तरे मिळाली आहेत.

१ जुलै२०२४ च्या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्र मतदारयादी ३० ऑगस्ट २०२४रोजी जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्र, तहसील कार्यालये, उपविभागीय अधिकारी कार्यालये जिल्हाधिकारी



कार्यालय मतदारयादीत आपले नाव आहे की नाही, ते लगेच तपासावे, मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहणार नाही. निवडणुकीची घोषणा होईपर्यंत नावनोंदणी किंवा नाव वगळणे ही प्रक्रिया सुरू राहते. त्यामुळे नागरिकांनी संबंधित ठिकाणी जाऊन नाव तपासावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी केले होते. काही नागरिक यादी लावलेल्या स्थळापासून जातात. मात्र, त्याकडे पाहात नसल्याचे उघडकीस आले.

युवकांनाही यादीचे वावडेजिल्ह्यात १८ ते१४ वयोगटातील युवा मतदारांची संख्या केवळ १० हजार ४८८ ने वाढली. सध्याच्या यादीनुसार जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदा-रसंघ मिळून ३३ हजार ८२५ युवा मतदार आहेत. यामध्ये १८ हजार८०१ पुरुष, १५ हजार २२ स्त्री आणि २ इतर मतदार यांचा समावेश आहे.जिल्ह्याची लोकसंख्या लक्षात घेता ही संख्या एक लाखांच्या घरात असायला हवी होती.

मात्र, युवकांनीही मतदारयादीकडे सध्या तरी दुर्लक्ष केल्याचे चित्र आहे.अशी करा आपल्या नावाची खात्रीआगामी मतदारयादी सर्व मतदान केंद्र, तहसील कार्यालये, उपविभागीय अधिकारी कार्यालये, जिल्हाधिकारी कार्यालय वा संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली आहे. यादीत नाव समाविष्ट नसल्यास संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी किंवा तहसील कार्यालयातील निवडणूक विभागास प्रत्यक्ष भेट देऊन .

## सडक अर्जुनी येथील वाढत्या अतिक्रमणाकडे न.पं.ची डोळेझाक

**सडक अर्जुनी :** येथील शहरात अतिक्रमणाच्या समस्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. वाढत्या अतिक्रमणामुळे शहरातील विकासकामात अडचण निर्माण होत आहे; पण अतिक्रमणधारकांवर कुठलीच कारवाई केली जात नसल्याने शहरवासीयांनी नगरपंचायतवर रोष व्यक्त केला आहे. सडक अर्जुनी ग्रामपंचायतचे सन २०१५-१६मध्ये नगरपंचायतमध्ये रूपांतर झाले. त्यामुळे सडक अर्जुनी सारख्या छोट्याशा तालुक्याला नगरपंचायतचा दर्जा प्राप्त झाला. यामुळे विकास होऊन चेहरा मोहरा बदलणार, असे शहरवासीयांना वाटू लागले होते. परंतु प्रत्यक्षात मात्र वेगळेच चित्र आहे. सडक अर्जुनी शहरात अतिक्रमण करणाऱ्यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. शहरातील काही मोक्याच्या व शासकीय जागा व जिल्हा परिषदेवर जागेवर अतिक्रमण केले जात आहे. याचा शहरातील विकास कामांवर परिणाम होत आहे. अतिक्रमणधारकांना नगरपंचायत व प्रशासनाचा कुठलाच धाक राहिलेला नाही.नगरपंचायतने या अतिक्रमणधारकांवर वेळीच कारवाई करण्याची गरज असताना ते याकडे डोळेझाक करीत आहे. परिणामी, अतिक्रमणधारकांची हिंमत दिवसेंदिवस वाढत चालल्याचे चित्र आहे. या प्रकारामुळे शहरवासीयांनी नगरपंचायतवर रोष व्यक्त केला आहे. वेळीच पावले उचलण्याची गरजसडक अर्जुनी हे तालुक्याचे ठिकाण असून, या शहराला नगरपंचायतचा दर्जा मिळाल्याने अनेक शासकीय कार्यालय येथे येणार आहेत. त्यांना जागा उपलब्ध करून द्यायची जवाबदारी नगरपंचायत प्रशासनाची आहे. त्याशिवाय सडक अर्जुनीचा विकास होऊ शकणार नाही, त्याकरिता नगर-पंचायतमध्ये दूरदृष्टी असलेले मुख्याधिकारी, अध्यक्ष व नगरसेवकांची गरज आहे. वेळप्रसंगी वाद-विवाझाला तरी त्याला सामोरे जाण्याची ठेवावी लागेल. तेव्हाच शहरातील वाढत्या अतिक्रमणाला ब्रेक लागू शकतो.


कार्यालय
**नगर परिषद वाडी**
ता. व जि. नागपूर

जा.क्र.न.प.वाडी/बांध/८३७/२०२४ दिनांक :- २०/०९/२०२४

ई-निविदा सुचना क्र. १

**ई-निविदा सुचना क्र. १ - २०२४ - २५**

**मुख्याधिकारी, नगर परिषद वाडी, जिल्हा नागपूर यांच्या वतीने वाडी नगर परिषद हद्दीतील सन २०२४-२५ वर्षातील नगर परिषद / विकास निधी अंतर्गत खालील नमूद कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागचे बी-१ कराराचे नमुन्यात ऑनलाईन दोन लिफाफा पद्धतीने ई- निविदा, महाराष्ट्र शासनचे सार्वजनीक बांधकाम विभागामध्ये योग्य त्या वर्गवारी पंजीकृत कंत्राटदाराकडून मागविण्यात येत आहे. सदर कामांची निविदा केवळ ई निविदा पध्दतीनेच सादर करावयाची आहे. निविदेचा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २०/०९/२०२४ ला संध्याकाळी ३.00 वाजेपासुन पाहण्यास उपलब्ध राहील.**

मुख्याधिकारी
नगर परिषद वाडी


# गणेशोत्सवातील शिबिरांमुळे रक्त तुटवड्याचे विघ्न दूर

### १० दिवसांत दीड हजारांवर युवकांसह नागरिकांनी केले रक्तदान

■ महासागर प्रतिनिधी,
**यवतमाळ, दि. २० :** यवतमाळ जिल्हाभरात गणेशोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. ७ सप्टेंबर ते १६ सप्टेंबर या उत्सव कालावधीत विविध सार्वजनिक गणेश मंडळांनी सामाजिक उपक्रम राबविले. यामध्ये कौतुकास्पद बाब म्हणजे गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या कालावधीत विविध सार्वजनिक गणेश मंडळांनी रक्तदान शिबिर आयोजित केले. यामध्ये शहर, तसेच ग्रामीण भागातील १ हजार ७०० जणांनी रक्तदान करून आपली सामाजिक बांधिलकी जोपासली. अनेक रोगांमध्ये अनेकांच्या शरीरात रक्त तयार होत नसल्यामुळे त्यांना बाहेरून रक्त चढवावे लागते. त्याचबरोबर अपघातात जखमी, गरोदर महिलांना प्रसूती दरम्यान होणाऱ्या रक्तस्त्रावानंतर अनेकदा रक्ताची आवश्यकता भासते. त्यामुळे रक्तदानाला सर्वश्रेष्ठ दान असेही म्हटले जाते, कारण रक्तदानामुळे लोकांचे प्राण वाचतात. मागील अनेक वर्षांपासून शहरासह जिल्हाभर सार्वजनिक उत्सव, सण, वाढदिवस, महापुरुषांची जयंती पुण्यतिथीनिमित्त रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्याचे प्रमाण वाढले आहे. त्याचबरोबर सामाजिक बांधिलकी म्हणून अनेक नामांकित व्यक्तींच्या वाढदिवसाच्या निमित्ताने रक्तदान शिबिरांचे आयोजन केले



जाते. यामध्ये रक्तदान करणाऱ्यांमध्ये युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो, हे विशेष. दरम्यान, गणेशोत्सवात बहुतांश गणेश मंडळांनी आपल्या राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांमध्ये रक्तदान शिबिरांचे आयोजन केल्याचे पहावयास मिळाले. सण-उत्सव काळात रक्तदान शिबिरे मोठ्या प्रमाणात आयोजित केली जातात. परंतु, रक्ताची सर्वाधिक आवश्यकता ही फेब्रुवारी ते मे या कालावधीत भासते. त्यामुळे प्रत्येकाने नियोजन करून रक्तदान करायला हवे. त्याचबरोबर गरज ओळखून रक्तदानाचा उपक्रम हाती घेणे आवश्यक असून असे केले तर गरजूंना रक्ताचा तुटवडा भेडसावणार नाही. असे वसंतराव नाईक वैद्यकीय महाविद्यालयातील रक्तपेढी विभागाकडून सांगण्यात आले.


**कामठी नगर परिषद कामठी**
बांधकाम विभाग
जिल्हा नागपुर ४४१००२
Phone 07109 288262, Fax: 07109286665,
Mail: chiefofficermckamptee@gmail.com

जा.क./न.प.का./सा.वा.वि./३६५५/२०२४ दिनांक : २०/९/२०२४

**निविदा सुचना २०२४-२०२५**

नगर परिषद कामठीला महाराष्ट्र शासनाचे खात्यात पंजीबध्द असलेल्या योग्य त्या वर्गात नोंदणीकृत अनुभवी कंत्राटदाराकडून दलितेत्तर वस्ती सुधार योजना अंतर्गत एकुण ४ कामाचे द्वी लिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे. निविदेबाबतची सविस्तर माहिती दिनांक २०/९/२०२४ पासुन नगर परिषद कामठी जुने कार्यालय येथील बांधकाम विभागात पाहण्यास उपलब्ध आहे.

(संदिप बोरकर)
मुख्य अधिकारी तथा प्रशासक
नगर परिषद कामठी



**नगर पंचायत कुही**
ता. कुही, जि. नागपूर - ४४१२०२
E-mail Id: nagarpanchayatkuhi@gmail.com दुरध्वनी क्रमांक : ०७१०० २२२२८०

जा.क्र/नपकु/फे. नि २५६२/२०२४-२०२५ दिनांक: २०/०९/२०२४

**जाहीर सूचना**

पथविक्रेता निवडणुकीसाठी आरक्षण सोडत

कुही नगर पंचायत पथविक्रेता समितीच्या निवडणुकीकरिता पथविक्रेत्यांचे सोडत पद्धतीने आरक्षण निश्चित करणेबाबत, केंद्र शासनाकडील पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम २०१४ चे मधील कलम १६ च्या पोटकलम (२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार अ या राजपत्राद्वारे शहरामधील पथविक्रेत्याबाबत नियम व आदेश प्रसिद्ध केले होते. सदर शासनाच्या नियम व आदेशामधील प्रकरण ४ मधील कलम १५ भाग १ नमूद केल्याप्रमाणे शहरातील पथ विक्रेत्यांचे संगणक प्रणाली द्वारे सर्वेक्षण करून नोंदणीकृत पात्र पथ विक्रेत्यांची अंतिम मतदार यादी तयार करून त्यांची निवडणूक घेणे अनिवार्य आहे.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाने असाधारण भाग ४ अ अन्वये एकूण २० सदस्यांची शहर फेरीवाला समिती स्थापन करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या पथ विक्रेता निवडणूक नियम प्रणाली मध्ये नमूद केलेल्या एकूण २० सदस्य संख्येमध्ये. ८ (आठ) पथ विक्रेता सदस्य पथ विक्रेत्यामधून निवडणुकीद्वारे निवडून द्यावयाचे आहे. महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाने असाधारण भाग चार मधील नगर पथ विक्रेता समिती रचनेनुमार ११ - ख (एक) मध्ये नमूद पथ विक्रेते अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इमाव, अल्पसख्यांक, विकलांग व्यक्ती या संवर्गाचा उल्लेख केला आहे. तसेच १/३ आरक्षण हे महिलांना देण्यात यावे, असे नमूद केले आहे. त्या अनुषंगाने महिला पथ विक्रेत्यांचे आरक्षण सोडत पद्धतीने निश्चित करणेकामी खालील ठिकाणी कार्यवाही नियोजित केली आहे.

| अ.क्र | नगर परिषदेचे नाव | सोडत ठिकाण | सोडत कार्यवाहीची दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १. | नगर पंचायत कुही | नगर पंचायत सभागृह | २५/०९/२०२४ वेळ दुपारी १.00 वाजता |

कुही नगर पंचायत मधील पथ विक्रेता समितीचे निवडणुकीकरिता महिला पथ विक्रेत्यांचे सोडत पद्धतीने आरक्षण निश्चित करणेसाठी ज्या पथ विक्रेत्यांना उपस्थित राहण्याच्या इच्छा आहे. त्यांनी वरील वेळापत्रकानुसार उपस्थित राहावे.

(रामेश्वर पंडागळे)
निवडणूक निर्णय अधिकारी तथा
मुख्याधिकारी
नगर पंचायत कुही


RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# निरामय

## कधी करायचं शरीर स्वच्छ?

शरीराची अंतर्गत स्वच्छता नैसर्गिक पद्धतीने होत असते. पण ताण आल्यावर तसंच इतर काही कारणांमुळे ही प्रक्रिया मंदावते. शरीरात विषद्रव्यं साठू लागतात. मग बाह्य उपायांनी शरीराची स्वच्छता करावी लागते. दरम्यान, शरीर आपल्याला या बिघाडाचे संकेत देत असतं. हे संकेत कोणते?

* कोणत्याही कारणाशिवाय, सतत थकवा जाणवत असेल तर तुम्ही शरीराच्या स्वच्छतेसाठी तातडीने उपाय करायला हवेत.

* सतत आजारी पडणं हे रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत झाल्याचं लक्षण असतं. अशा वेळी जंक फूड, प्रक्रिया केलेले पदार्थ खाणं टाळलं पाहिजे. ताजी फळं, भाज्या यांचा आहारात समावेश करायला हवा.



आरोग्यमंत्र

* शरीरातल्या विषारी घटकांमुळे मेंदूचं कार्य मंदावतं. यामुळे विस्मरण, लक्ष केंद्रित करता न येण्यासारख्या समस्या निर्माण होतात.


* विषारी घटकांमुळे झोप येत नाही. नियमित जागरण होत असेल तर शरीर स्वच्छ करा. शांत झोपेसाठी प्रयत्न करा.

## श्वास नावाची जादुई अनुभुती

**रोजच्या जीवनात घडणाऱ्या प्रसंगांमधून निर्माण होणाऱ्या भावभावनांचे आपल्या मनावर सतत बरे-वाईट आघात होत असतात. काही वरवरचे असतात तर काही मर्मावर बोट ठेवणारे. संस्कारांचा हा साठा दिवसागणिक वाढत जातो. किंबहुना, आपल्याला अशी काही विद्या वा तंत्र माहितच नसते जी मन हलके करेल. आणि इथेच आपला श्वास आणि त्यामुळे येणारी तरलता प्रभावीपणे आणि सहजगत्या कामास येते.**

सामाजिक

**राजशेखर हिरेमठ**



श्वास म्हटले की लगेच प्राणायाम (प्राणाचा आयाम म्हणजेच श्वासाचा व्यायाम) आठवतो. प्राणायामामध्ये प्रयत्नपूर्वक श्वास घेतला जातो. प्राणायाम हे एक स्वतंत्र शास्त्र आहे आणि त्याचे अनेक फायदेही आहेत. पण श्वासाबद्दल काही विपरीतही सांगता येते. आपली श्वसन प्रक्रिया सतत सुरू असते. ती ही आपल्या नकळत. पण तिच्याकडे आपण जाणिपूर्वक, तटस्थपणे पाहणे म्हणजे श्वास जसा आहे तसा पाहणे, बघणे, जाणणे. प्राणयामापेक्षा ही एक खूप वेगळी आणि भन्नाट गोष्ट आहे. त्याबद्दल उत्सुकता निर्माण झाली, जाणीवपूर्वक प्रयत्न केले आणि यश मिळाले तर अलिबाबाच्या गुहेची चावीच हाती लागते. पण श्वासाकडे तटस्थपणे पाहणे ही बाब तशी सोपी नाही. हा प्रवास आपल्या संयमाची परिक्षा घेतो, थकवून सोडतो. पोहायला शिकत असतानाही असेच काहीसे होते. नाकातोंडात पाणी जाते, जीव गुदमरतो आणि मग नको बाबा ते पोहणे असे वाटून जाते. पण आपण प्रयत्न करत राहिलो तर शेवटी यशस्वी होतो हा आपल्या सर्वांचाच अनुभव आहे. असेच काहीसे श्वासाबद्दल होते.

एक-दोन श्वास बघतो न बघता तोपर्यंत मन कुठे तरी निघून जाते, भटकते. आपण भटकलो हे लक्षात आले की परत श्वासाकडे लक्ष. हे असे स्वतःशीच चाललेले द्वंद्व मनाला थकवा आणते. नको बाबा ते श्वासा कडे बघणे, असे वाटून जाते आणि सुरुवातीला आपल्या हाती काहीच लागत नाही. कंटाळून प्रयत्न करणे सोडून देण्याची शक्यता जास्त. आणखी एक खूप मोठी अडचण म्हणजे मनाला खरच श्वासावर रोखून धरायचे म्हटले तर आपण जाणीवपूर्वक श्वास घेवू लागतो. म्हणजेच सायास (प्राणायाम) सुरू होतो आणि मग आपल्याच श्वासाला तटस्थपणे न्याहाळणे राहून जाते. बऱ्याच वेळा श्वास न्याहाळण्याच्या धडपडीत रोखून धरला जातो आणि मग गुदमर होते. पण मग अचानक एके दिवशी सायकलचा तोल जमतो, पाण्यात तरंगता येवू लागते, तसे घडते आणि प्रयत्न यशस्वी ठरतो. काही मुद्रा (प्रामुख्याने भैरवमुद्रा आणि आदीमुद्रा) श्वास जाणण्याच्या प्रवासात खूप पूरक ठरतात. मुद्रा शास्त्र हे खूप प्रगत आणि प्रभावी आहे. प्रयोग करून पाहण्यास तर खूपच सोप्पे. आता कोणी विचारेल की या बाबीला एवढे महत्त्व का? त्याचे उत्तर असे की मनाची आणि शरीराची अनेक गुपिते आणि रहस्ये आपल्याला कधीच समजत नाहीत. श्वास नावाच्या किल्लीने मात्र ती सहज उघडली जातात. कोणत्या पायऱ्या आहेत ह्या प्रवासात, कसा करायचा हा प्रवास असे काही प्रश्न पडू शकतात. त्यांची उत्तरे समजून घ्यायला हवी.

सलग दहा ते पंधरा श्वास पकडता आले तरी, आपले मन (जे किती चंचल असते हे आपणा सर्वांना ठाऊक आहे) एकदम सूक्ष्म आणि तरल होते, शरीर एकदम स्थिर होते. शरीर स्थिर करण्यासाठी वेगळा प्रयत्न करावा लागत नाही. आणि ही स्थिती शब्दातीत शांतता देऊन जाते. जो अनुभव घेईल त्यालाच ते कळेल. आपण या प्रक्रियेत मुरत जातो तसतसे आपले शरीर आणखी स्थीर आणि मन आणखी तरल होत जाते. आपल्या मनाची तरलता, शरीराची स्थिरता एका ठराविक पातळीस आली की (हे कोणासाठी कधी कसे होईल हा ज्याचा त्याचा प्रवास असेल) आपल्याला आपल्याच शरीरात सतत घडणारे सुक्ष्म बदल (संवेदना) जाणवू लागतात. ही तरलता, संवेदनशीलता आपल्याला एका मस्त अंतर्मुखी प्रवासाला घेऊन जावू शकते. अर्थात ते जाणून घेण्याची उत्सुकता, कुतुहल असेल तर. इथेच हा खेळ आणखी गमतीदार होतो आणि नीट समजून घेतले तर आयुष्याला वेगळी दिशा देऊन जातो. एक गोष्ट आपल्याला समजून घेतली पाहिजे की, आपल्या शरीरात सतत जीवरासायनिक आणि विद्युतचुंबकीय क्रिया घडत असतात. हे एक वैज्ञानिक सत्य आहे. या प्रक्रिया आपल्या शरीरावर संवेदनांच्या स्वरूपात प्रकट होत असतात. काही क्रिया या भौतिक कारणामुळे असू शकतील. जसे जखम झाली असेल तर तिथले दुखणे वा पोट बिघडले असेल तर तिथले दुखणे. पण या संवेदना बऱ्याच अंशी आपल्याच अंतर्मनावर झालेल्या/दडलेल्या सुप्त भावभावनांचे प्रतिक असतात. प्रत्येकाला या निमित्ताने आपल्या बाबतीत हे प्रकर्षाने जाणवू शकते.

रोजच्या धांदलीत मन खूप जड आणि विचलित असते. संवेदना मात्र खूप सूक्ष्म आणि तरल असतात. त्यामुळे आपण या सर्व प्रकाराबाबत पूर्ण अनभिज्ञ असतो. हे अज्ञान आपले कळत नकळत खूप खूप नुकसान करून जाते. संवेदना विविध प्रकारच्या जाणवतात. काही खूप क्लेशदायक असतात, तर काही खूप मोहक, रोमांचकारी, पुलकित करणाऱ्या. शेवटी अंतर्मनात दडलेले असते तेच तर तरल मानस पाहू लागते, जाणू लागते. एक खूप महत्वाची बाब इथे लक्षात घेणे आवश्यक आहे, ती म्हणजे संवेदना क्लेशदायक असो वा मोहक, आपली भूमिका तटस्थ बघ्याची हवी. नाही तर आपण वेगळ्याच समस्या ओढवून घेवू. काही संवेदना तर खूप क्लेशदायक, वेदनादायक असू शकतात. म्हणून धीर सोडू नये. श्वास आणि संवेदना यांच्याकडे आपण तटस्थपणे बघू शकलो तर अंतर्मनावरील हे खोलवरचे आघात बाहेर पडायला, विरघळून जायला मदत होते. एक प्रकारचा हलकेपणा, ताजेपणा जाणवू लागतो. ही प्रक्रिया सहजगत्या आणि निरंतर साधता आली तर खूप प्रभावशाली ठरते, अंतर्मन स्वच्छ करण्यासाठी तिचा उपयोग होतो.

आपण श्वास आणि संवेदनांकडे तटस्थपणे बघण्याच्या तंत्रामध्ये, विद्येमध्ये पारंगत होत गेलो, मुरत गेलो की आपली अनेक शारीरिक दुखणी आपोआप कमी होत जातात. उदा. डोके दुखणे, गळा सुजणे, मान अवघडणे, अपचन, पित्त. आधुनिक वैद्यकशास्त्र असे अनेक आजार अस्तित्वात असल्याचे मान्य करते आणि एखाद्याला आपले मन अंतर्बाह्य स्वच्छ करण्याची कला साध्य झाली असेल तर त्याचे मन आणि शरीर सुदृढ होणारच. याचीच सकारात्मक बाजू म्हणजे नेहमी प्रसन्न वाटते, कंटाळा असा येतच नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपणच आपले छान मित्र होऊन जातो. 'स्वांत सुखाय', 'अत्त दीप भव' ही केवळ महावाक्ये न राहता, रोजच्या जीवनात सहजगत्या उतरू लागतात. कोण किती खोलवर आणि दूरपर्यंत जाईल... ज्याचे त्याचे प्रयत्न, ज्याचा त्याचा प्रवास! श्वासाची ही जाणीव आयुष्यात जादूची एक कांडी ठरली आहे. तुम्ही पण अनुभवू शकता.

**(लेखक संगणकशास्त्रातील पदव्युत्तर पदवीधारक आहेत.)**

## हृदयावर लक्ष ठेवणारं सॉफ्टवेअर

नवसंशोधन

हृदयाच्या हालचालींवर लक्ष ठेवणारं आणि भविष्यातला हृदयविकाराचा धोका ओळखणारं सॉफ्टवेअर शास्त्रज्ञांनी विकसित केलं.



'इलेक्ट्रो मॅप' असं या सॉफ्टवेअरचं नाव असून यामुळे हृदयविकाराला प्रतिबंध करण्यासोबतच प्रभावी उपचार उपलब्ध करून देणं शक्य होणार आहे. 'इलेक्ट्रो मॅप' अवयवातली इलेक्ट्रिकल हालचाल मोजतं. याबाबत एक संशोधन करण्यात आलं होतं. त्यानुसार हृदयाच्या पंपिंगच्या क्रियेवर इलेक्ट्रिकल हालचालींचं नियंत्रण असतं. यामुळे हृदयाच्या स्नायूंच्या पेशी आकुंचन आणि प्रसरण पावतात. 'इलेक्ट्रो मॅप'मुळे हृदयाशी संबंधित संशोधनाला गती मिळेल अशी अपेक्षा आहे.

## काळजी छोट्यांच्या दातांची...

दंतारोग्य

लहान मुलांच्या तोंडाच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्यायला हवं. मूल सहा महिन्याचं झाल्यावर दात यायला सुरूवात होते. पण एवढ्या लहान वयात दात घासल्याने मुलांच्या हिरड्यांची हानी होऊ शकते. त्यामुळे मूल एक वर्षाचं झाल्यानंतर ब्रशने दात घासायला सुरूवात करा. मुलांचे वरचे आणि खालचे दात येईपर्यंत थांबा. मुलं पाच वर्षांची होईपर्यंत त्यांचे सगळे दात आलेले असतात. पण धान्य खायला सुरूवात केल्यानंतर मुलांच्या दातांची जास्त काळजी घ्यावी लागते. मुलांसाठी योग्य ब्रशची निवड करायला हवी. ब्रश मुलायम असावा तसंच फ्लोराइड नसलेल्या पेस्टचा वापर करावा. मुलांना दिवसातून दोन वेळा दात घासायची सवय लावा. दर तीन महिन्यांनी ब्रश बदला.



## अशी घ्या डोळ्यांची काळजी

डोळ्यांचं आरोग्य

डोळे खराब होऊ नयेत, डोळ्यांचे आजार होऊ नयेत असे वाटत असेल तर डोळे निरोगी राहण्यासाठी आणि दृष्टी चांगली ठेवण्यासाठी काही सोपे उपाय नक्की करा. पामिंग व्यायाम केल्याने दृष्टी सुधारते. त्यामुळे डोळ्यांना आराम मिळतो. पामिंग व्यायाम करण्यासाठी तुमचे दोन्ही हाताचे तळवे एकत्र घासून काही सेकंद डोळ्यांवर ठेवा. असे ५-७ वेळा करा. डोळ्यांचा सर्व थकवा निघून जाईल. आपले डोळे एका वर्तुळात हलवण्याचा प्रयत्न करा. डोळे किमान पाच वेळा घड्याळाच्या दिशेने आणि घड्याळाच्या विरुद्ध दिशेने हलवा. असे दिवसातून दोनदा करा, दृष्टी वाढेल. डोळे दीर्घकाळ निरोगी राहतील.



## औषधी वांगं

आजीबाईचा बटवा

वांगं ही घरांमध्ये सर्वसाधारपणे आढळणारी भाजी. वांग्याचे वेगवेगळे आकार आणि प्रकार आहेत. काहीजण वांग्याला नाकं मुरडतात. पण साधीशी वाटणारी ही भाजी औषधी आहे. यातल्या अँटीऑक्सिडंट्स तसंच फायबरमुळे हृदयविकाराला आळा घालता येतो, असं काही संशोधनांमधून समोर आलं आहे. यातल्या पोषक घटकांमुळे 'फ्री रॅडिकल्स'चा प्रभाव कमी होतो. त्यामुळे वांगं कॅन्सरला अटकाव करू शकतं. यातल्या कमी कॅलरी आणि भरपूर फायबरमुळे वजन कमी व्हायला मदत होते. यातल्या के जीवनसत्त्व, मँगनीज आणि कॉपरमुळे हाडांना बळकटी मिळते.



## कामाच्या ताणामुळे...

मानसोपचार

दिवसातला बराच काळ आपण कार्यालयात घालवतो. आपल्यापैकी प्रत्येकालाच कामाच्या ठिकाणी काही ना काही समस्या असतात. एखादा दिवस वाईट जातो. कधी वरिष्ठांचा ओरडा खावा लागतो तर कधी मेहनतीचं फळ मिळत नाही. आपल्या कामाचं कौतुक होत नाही. यामुळे आपण खूप अस्वस्थ होतो. दुसऱ्या दिवशी कार्यालयात जाण्याच्या विचाराने पोटात गोळा येतो. हे असं नियमितपणे होत असेल तर थोडा विचार करण्याची गरज आहे. कार्यालयातलं नकारात्मक वातावरण, कामाचा ताण यामुळे आपलं मानसिक आरोग्य धोक्यात येतंच शिवाय शरीरावरही याचे परिणाम दिसू लागतात. नोकरीतला हा ताण शारीरिक व्याधींना निमंत्रण देतो. कामाच्या ठिकाणी आपण आनंदी नाही हे ओळखण्याच्या काही खुणा आहेत. शारीरिक संकेतांमधून आपण याचा अंदाज बांधू शकतो.



वारंवार उद्भवणारी डोकेदुखी तसंच मानदुखी यामागे प्रचंड ताण हे कारण असू शकतं. कामाच्या ठिकाणचं खराब वातावरण तुम्हाला अस्वस्थ करून जातं. सतत थकवा जाणवतो. कितीही आराम केला तरी थकवा काही जात नाही. त्यामुळे वारंवार अंग दुखत असेल तर ते कार्यालयातल्या वातावरणामुळे आलेल्या ताणाचं लक्षणं असू शकतं. कार्यालयातल्या नकारात्मक वातावरणामुळे रोगप्रतिकार शक्तीवर परिणाम होतो. तुम्ही वारंवार आजारी पडता. हवामान बदलाच्या काळात शारीरिक व्याधी उद्भवतात.

महिलांच्या प्रजनन संस्थेवर कामाच्या ताणाचा वाईट परिणाम होतो. हार्मोन्समधले बदल याला कारणीभूत ठरतात. मासिक पाळी अनियमित होते. त्यामुळे पाळीचं चक्र अचानक बिघडलं तर त्यामागे कामाचा ताण हे कारण असू शकतं. झोप न येणं, मानसिक आरोग्य बिघडणं, स्वभावात होणारे बदल ही लक्षणंही दिसून येतात. अशा वेळी कार्यालयातल्या जबाबदाऱ्यांचं विश्लेषण करून योग्य तो निर्णय घ्यायला हवा.

## एचआयव्हीवर येणार नवीन औषध

आरोग्य विशेष

शास्त्रज्ञांनी एचआयव्हीच्या उपचारात एक नवीन पद्धत शोधून काढली आहे. त्यामुळे रुग्णांना आता दररोज औषधे घेण्याची गरज भासणार नाही. संशोधकांनी एक विशेष प्रकारचा विषाणू वापरला आहे, ज्याला 'टीआयपी' (थेरप्युटिक इंटरफेरिंग पार्टिकल) म्हणतात. हा विषाणू एचआयव्हीविरूद्ध कार्य करतो आणि शरीरात पसरण्यापासून प्रतिबंधित करतो. हे इंजेक्शनच्या स्वरूपात रुग्णाच्या शरीरात दिले जाते. या नवीन उपचाराची चाचणी सहा माकडांवर करण्यात आली. त्यांना प्रथम 'टीआयपी' चे इंजेक्शन देण्यात आले आणि नंतर त्यांना एचआयव्हीसार'या धोकादायक विषाणूची लागण झाली. यानंतर शास्त्रज्ञांनी सात महिने या माकडांच्या स्थितीचा अभ्यास केला. परिणाम आश्चर्यकारक होते. 'टीआयपी'चे इंजेक्शन देण्यात आलेल्या माकडांमध्ये एचआयव्हीचे प्रमाण दहा हजार पटीने कमी झाले होते आणि त्यांची प्रतिकारशक्तीही चांगली होती. दुसरीकडे, उपचार न केलेली माकडे गंभीर आजारांनी ग्रस्त झाले आहेत.




सध्या शास्त्रज्ञ हे उपचार सुधारण्यासाठी सतत काम करत आहेत. पुढील टप्प्यात त्याची मानवांवर चाचणी केली जाईल. ते यशस्वी झाले, तर एचआयव्ही उपचारांसाठी ही एक नवीन दिशा ठरू शकेल. त्यामुळे रुग्णांना दीर्घकाळ औषधांच्या ओझ्यातून मुक्तता मिळेल. या नवीन उपचाराने एचआयव्हीशी झुंजणाऱ्या करोडो लोकांना नवी आशा दिली आहे. हे उपचार यशस्वी झाले, तर एचआयव्ही विरुद्धच्या लढ्यात हे एक मोठे पाऊल असेल आणि लाखो लोकांचे जीवन सुधारू शकेल.

## रक्ताच्या नात्यातील लग्न धोकादायक

लक्षात घ्या

रक्ताच्या नात्यात लग्न केल्यामुळे अनेक प्रकारचे अनुवांशिक रोग होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे असे लग्न टाळणे केव्हाही चांगले. जवळच्या नातेवाइकांमधील विवाहामुळे अनेक रोग होऊ शकतात. मुलांमध्ये अनुवांशिक विकारांचा धोका वाढू शकतो. नात्यातील लग्नामुळे अनेक आजारांचा धोका वाढतो. जसे की मधुमेह, हृदयाशी संबंधित विकार, लठ्ठपणा आणि काही प्रकारचे कर्करोग, इ. सुसंगतता प्रजनन दर आणि गर्भधारणेच्या परिणाम करू शकते.



गर्भधारणा कमी होणे आणि अकाली प्रसुती होणे असे प्रकार वाढतात. क्षयरोग आणि हिपॅटायटीस सारख्या संसर्गजन्य रोगजनकांना अधिक संवेदनाक्षम बनवू शकते. ते मलेरिया आणि इतर रोगजनकांना कमी संवेदनाक्षम बनवू शकते. एकाच जनुकासह दोन लोक लग्न करतात आणि त्यांना मुले होतात, तेव्हा निष्क्रिय जीन्स दुप्पट होतात. त्यामुळे मुलांमध्ये अनुवांशिक समस्या उद्भवू शकतात.

नुकत्याच झालेल्या संशोधनानुसार, रक्ताशी संबंधित व्यक्तीशी लग्न केल्यास हृदयविकाराचा धोका वाढतो. पालकांमधील नातेसंबंध जितके जवळ असतील, तितकेच त्यांना अनुवांशिक रोग होण्याची शक्यता असते. त्यामुळे त्यांच्या मुलांमध्ये सामान्य रोग होऊ शकतात. उदाहरणार्थ, भावंडांमध्ये ५० टक्के डीएनए, काका आणि भाची २५ टक्के शेअर करतात आणि चुलत भाऊ १२.५ टक्के डीएनए शेअर करतात. जवळच्या नातेवाइकांच्या पोटी जन्मलेल्या मुलांमध्ये थॅलेसेमिया, डाऊन सिंड्रोम, इन्फेंटाइल सेरेब्रल पाल्सी आणि श्रवण आणि दृष्टीचे अपंगत्व देखील येते.

## फुफ्फुसाचा आजार ओळखणे सोपे!

आरोग्यवेध

आता नवीन एआय तंत्रज्ञानामुळे खोकल्याचा आवाज ऐकून फुफ्फुसाचा आजार ओळखता येतो. खोकल्याच्या आवाजाचे विश्लेषण करून हे तंत्रज्ञान एखाद्या व्यक्तीला फुफ्फुसाचा आजार आहे की नाही हे ओळखू शकते. त्यामुळे आजार लवकर ओळखून रुग्णांना वेळेवर उपचार मिळू शकतील.

हे तंत्र विशेषतः योग्य वेळी डॉक्टरकडे जाऊ शकत नाहीत अशा लोकांसाठी खूप उपयुक्त ठरेल. गुगलने विकसित केलेल्या या तंत्रज्ञानाद्वारे खोकल्याचा आवाज ऐकून फुफ्फुसाचे आजार ओळखता येतात. एचईएआर (हेल्थ क्युस्टिक रिप्रेझेंटेशन्स) असे या तंत्रज्ञानाचे नाव आहे. 'एचईएआर एआय' मॉडेल खोकल्याच्या आवाजाचे विश्लेषण करून एखाद्या व्यक्तीला टीबी किंवा क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज (सीओपीडी) सारखा गंभीर आजार आहे की नाही हे ओळखू शकते. लोकांना वेळेवर डॉक्टर किंवा उपचार मिळू शकत नाहीत अशा ठिकाणी हे तंत्रज्ञान खूप उपयुक्त ठरू शकते.

'एचईएआर एआय' ला ३०० दशलक्षाहून अधिक ऑडिओ क्लिप आणि अंदाजे १०० दशलक्ष खोकल्याच्या आवाजांवर प्रशिक्षण देण्यात आले आहे. यामुळे हे मॉडेल खोकल्याच्या आवाजातून फुफ्फुसाचे आजार शोधण्यात सक्षम आहे. डॉक्टर आणि संशोधक या तंत्रज्ञानाचा वापर करून रोग लवकर आणि सहज शोधू शकतात. गुगलने तंत्रज्ञान आणखी सुधारण्यासाठी 'सॅलकिट टेक्नॉलॉजीस'या भारतीय आरोग्य सेवा कंपनीसोबत भागीदारी केली आहे. 'सॅलकिट टेक्नॉलॉजीस' ने श्वास नावाचे एक साधन तयार केले आहे, ते खोकल्याचा आवाज ऐकून फुफ्फुसांच्या आरोग्याचे मूल्यांकन करते. आता या टूलमध्ये 'एचईएआर' तंत्रज्ञान जोडले जात आहे. त्यामुळे टीबीसारखे आजार सुरुवातीच्या टप्प्यात शोधता येतील.

टीबी हा एक गंभीर आजार आहे, जो उपचाराने वेळेवर बरा होऊ शकतो; पण परवडणारी आणि प्रत्येकासाठी सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध नाही, तिथे क्षयरोग वेळेत शोधणे कठीण आहे. श्वास आणि 'एचईएआर' सारखे तंत्रज्ञान या समस्येचे निराकरण करण्यात मदत करू शकतात. या उपकरणांमुळे रोग लवकर आणि कमी खर्चात ओळखता येतो. त्यामुळे रुग्णावर उपचार वेळेवर सुरू होऊ शकतात. 'एचईएआर एआय' सारखे तंत्रज्ञान केवळ फुफ्फुसाचे आजार लवकर शोधण्यातच उपयुक्त नाही, तर हे तंत्रज्ञान परवडणाऱ्या आणि सुलभ आरोग्य सेवांचा एक भागदेखील बनू शकते.



# नागपुरातील सहाही जागा लढणार

## काँग्रेसच्या दाव्याने आघाडीत बिघाडीचे संकेत



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २०:

नागपूर शहरातील विधानसभेच्या सहाही जागा काँग्रेस लढवणार आहे. परंतु याबाबत माझे बोलणे योग्य नाही. हायकमांडच याबाबत स्पष्ट बोलू व सांगू शकतील, असेही विकास ठाकरे म्हणाले. परंतु शहरातील सहाही जागेबाबतच्या ठाकरेंच्या वक्तव्याने महाविकास आघाडीतील इतर पक्षांचे टेंशन वाढणार आहे.

पत्रकार परिषदेत विकास ठाकरे यांनी विदर्भातील प्रश्नावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दहा प्रश्न विचारले. ठाकरे म्हणाले, नागपूर मेट्रोचे उद्घाटन होऊन दशक उलटले तरी अद्याप काम अपूर्ण आहे. मेट्रोचा भ्रष्टाचार कॅगने उघड केला आहे, याकडे पंतप्रधानांचे लक्ष वेधत तुमचे सरकार भ्रष्टाचारी आहे का, असा सवाल आ. विकास ठाकरे यांनी केला.

ठाकरे म्हणाले, नागपुरात ९ वर्षांच्या मुलीवर तिच्या लहान बहिणीसमोर बलात्कार झाला. अद्याप आरोपी मोकाट आहेत. २०२३ मध्ये अशी २४७ प्रकरणे समोर आली. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नरजेत लाडकी बहीणचे संरक्षण कसे होते?, विदर्भात २०२३ मध्ये १,४३९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. विदर्भातील शेतकऱ्यांकडे तुमचे दुर्लक्ष का, असे प्रश्न ठाकरेंनी उपस्थित केले.

कापूस, सोयाबीन आणि संत्री उत्पादकांसाठी आयात- निर्यात नियम आणि हमीभाव यासारख्या न्याय धोरणाची अंमलबजावणी कधी करणार?, पंतप्रधान मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांनी आश्वासन दिल्यावरही विदर्भात ४५ सिंचन प्रकल्प अपूर्ण का?, गडचिरोलीत मृत मुलाला १५ किलोमीटर पायी न्यावे लागले व अमरावतीत रुग्णवाहिकाअभावी गर्भवतीचा मृत्यू झाला, हाच सबका साथ, सबका विकास आहे का?, बुटीबोरीतील सोलर पॅनल प्रकल्प गुजरातला का हलवण्यात आला?, ५५ हजार कोटींच्या समृद्धी महामार्गाला तडे का गेले, असे प्रश्न विकास ठाकरे यांनी पंतप्रधान मोदींना विचारले. या पत्रपरिषदेला आमदार अभिजित वंजारी, विशाल मुत्तेमवार, संजय महाळकर आणि इतरही पदाधिकारी उपस्थित होते.

**आंबेडकर भवन पाडणाऱ्यांकडून वसुली करा**

अंबाझरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन पाडण्यात आले. उच्च न्यायालयाच्या आदेशाने आरोपींवर गुन्हा दाखल झाला. हे कृत्य करणाऱ्या कंपनीच्या संचालकांकडून खर्चाची वसुली करा, अशी मागणी ठाकरे यांनी केली.

**दंगे भडकवण्याचा प्रयत्न**

शिवसेना शिंदे गटाचा आमदार, भाजप खासदारासह इतर सत्ताधारी नेत्यांकडून राहूल गांधींबाबत वादग्रस्त वक्तव्य करून वातावरण दुषीत करण्याचा प्रयत्न होत आहे. मोदी, अमित शहासह भाजपचे नेते त्यावर बोलत नाही. त्यामुळे या सगळ्यांच्या संमतीने हे वक्तव्य होत असून हा दंगे भडकवण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप विकास ठाकरे यांनी केला.

## राहुल गांधी विदेशात देशाची बदनामी करतात



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २०:

राहुल गांधी यांच्याबाबत केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याचे समर्थन करत नाही मात्र ते विदेशात जातात आणि देशाच्या विरोधात बोलून बदनामी करतात. देशात राहतात तेव्हा ते काहीच बोलत नाही, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे केली.

गुरुवारी रात्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नागपुरात आले असता ते प्रसार माध्यमांशी बोलत होते. खोटे बोलायचे आणि ते रेटून बोलायचे असा एकच कार्यक्रम विरोधी पक्षाचा सुरू आहे. विदेशात जाऊन देशाची बदनामी करण्याचे काम केले जात आहे. आरक्षण बंद करण्याचे बोलत असतील, पण देशात कोणी आरक्षण हटवू शकत नाही आणि संविधान कोणी बदलू शकणार नाही असेही शिंदे म्हणाले.

बुधवारी सेमीकंडक्टरच्या कंपनीचे उद्घाटन केले आहे. दोन वर्षाच्या कारकीर्दीत विविध उद्योगांशीसंबंधित पाच लाख कोटींचा सामंजस्य करार केला आहे, त्याच बरोबर स्टील उद्योग व सोलार उद्योगासह नामांकित कंपन्या येत आहेत. त्यामुळे विरोधी पक्षाचे हे सगळे आरोप दिशाभूल करण्यासाठी केले जात आहे. खोटे नेरेटीव पसरवून राज्याची बदनामी करण्याचे एकमेव काम विरोधी पक्ष करतो आहे, असेही शिंदे म्हणाले. अनेक प्रकल्प आपण करतो आणि पूर्ण केले. सगळे सकारात्मक सुरू आहे. लोकसभा निवडणुकीत खोटे बोलून त्यांनी मत घेतली आहेत, असेही शिंदे म्हणाले.

## थोडक्यात

### तरुणांनो तुम्ही दंगलीच्या भानगडीत पडू नका




■ **अकोले :** तुम्ही गरीब राहा, वेळ पडली तर घरोघरी फिरून कुल्फी विका, आणखी काही व्यावसाय धंदा करा, पण दंगलींच्या भानगडीत पडू नका, असा सल्ला इंदूरीकर महाराजांनी दिला आहे. धर्माच्या नावाखाली गरीबांच्या पोरांचा बळी देऊ नका, धर्मांचं भांडवल करु नका, असे सांगत राजकारण्यांचेही कान टोचले आहेत.

इंदूरीकर महाराज म्हणाले, तरुणांनो तुम्ही दंगलीच्या भानगडीत पडू नका. दंगलीत अडकला तर दहा वर्षे शिक्षा आहे. आतापर्यंत गरीबांचीच मुले दंगलीत अडकली आहेत. श्रीमंत आणि राजकारण्यांचे कोणी यात अडकत नाही. धमार्चा अभिमान नाही का? असे कुणी तुम्हाला विचारले तर त्याला सांगा तुमचा धर्म माईकवर आहे. आमचा धर्म आमच्या ह्दयात आहे.

पुढे ते म्हणाले, धर्माच्या नावाखाली आमच्या गरीबांच्या पोरांचा बळी देऊ नका. दंगलीत अडकवून आमच्या पोरांचे करिअर उध्वस्त करू नका, असे राजकारण्यांना सांगितले पाहिजे, असेही इंदुरीकर म्हणाले. तुम्ही दंगलीत पडू नका. तुम्ही गरीब राहा, वेळ पडली तर घरोघरी फिरून कुल्फी विका, आणखी काही काम धंदा करा, ४० टक्के तरुण पुढाऱ्यांच्या मागे फिरून भिकारी झाले आहेत, असेही ते म्हणाले.

### संजय पांडे काँग्रेसमध्ये



■ **मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मुंबईचे माजी पोलिस आयुक्त संजय पांडे यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. ते वर्सोवा विधानसभा मतदारसंघातून रिंगणात उतरणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. खासदार वर्षा गायकवाड यांच्या उपस्थितीत त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. संजय पांडे १९८६ च्या भारतीय पोलीस सेवेच्या तुकडीतील अधिकारी होते. ते अलीकडेच सेवानिवृत्त झाले. त्यांची गृह खात्यातील कारकीर्द चर्चेत राहिली आहे.

### भास्करराव खतगावकर यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

■ **मुंबई :** माजी मुख्यमंत्री तथा भाजप खासदार अशोक चव्हाण यांचे मेहुणे माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांनी शुक्रवारी भाजपला सोडचिठ्ठी देत काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

त्यांच्यासोबत माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा व मीनल पाटील खतगावकर यांनीही काँग्रेसमध्ये घरवापसी केली. खतगावकर यांनी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर अशोक चव्हाण यांच्यासह भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यांनी पुन्हा काँग्रेसचा 'पंजा' हातात घेतला आहे. यामुळे येथे भाजपाला मोठा धोका निर्माण झाल्याचे बोलले जाते.

### धार्मिक रॅलीवर दगडफेक

■ **नंदुरबार :** नंदुरबार येथे एका धार्मिक रॅलीवर दगडफेक करण्यात आली. यानंतर शहरातील माळीवाडा, इलाही चौक आणि मच्छी बाजार या परिसरात दोन गटांमध्ये दगडफेक झाली.

यावेळी उपद्रव करणाऱ्यांनी काही वाहनांचीही तोडफोड केली. तीन घरं आणि दोन दुचाकींना आग लावण्याचा प्रयत्नही झाला. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली.

## अभियंता दिनानिमित महानिर्मितीचे अभियंते सन्मानित





■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २०:** वीज क्षेत्रातील बदलत्या परिस्थितीत कार्यक्षमता वाढ, कामाबाबत समर्पण आणि सातत्य ठेवावे लागेल तरच स्पर्धेत टिकून राहता येईल. ज्या संस्थेत आपण काम करतो, त्या संस्थेला पुढे नेण्याचा ध्यास ठेवून प्रत्येकाने योगदान वाढविणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन डॉ. पी. अनबलगन यांनी केले. महानिर्मितीतर्फे अभियंता दिनी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

अभियंता दिनानिमित्त राज्यस्तरीय तांत्रिक पेपर्स सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कनिष्ठ अभियंता ते कार्यकारी अभियंता संवर्गातील सुमारे २०० अभियंते यामध्ये सहभागी झाले. त्यामधून ३० पेपर्सची प्राथमिक निवड करून सर्वोत्तम १० तांत्रिक पेपर्सला सन्मानित करण्यात आले.

अध्यक्षस्थानी डॉ. पी. अनबलगन, संचालक बाळासाहेब थिटे, संजय मारुडकर, अभय हरणे, डॉ. धनंजय सावळकर, कार्यकारी संचालक राजेश पाटील मंचावर उपस्थित होते.

महानिर्मितीच्या अवांतर खर्चात लक्षणीय घट झाली. त्याचे मूळ कारण आर्थिक शिस्त असून महानिर्मितीच्या पैशाची बचत म्हणजेच पैशाचे निर्माण याची जाणीव प्रत्येक अभियंत्याने ठेवून काम करावे, असे बाळासाहेब थिटे म्हणाले.

आगामी वर्षांसाठी महत्तम वीज उत्पादनाचे व्यवस्थापनाने लक्ष्य निर्धारित करून दिले आहे. महानिर्मितीचा सर्वांगीण विकास साधण्याची ही खरी वेळ असून आगामी दहा वर्षांचे नियोजन करणे गरजेचे असल्याचे मत संजय मारुडकर यांनी व्यक्त केले.

आगामी काळात महानिर्मिती वीज क्षेत्रातील नामांकित संस्थांसमवेत सामंजस्य करार, जे.व्ही करणार असून नवीकरणीय क्षेत्रात दमदार पाऊल टाकत असून वाढीव क्षमतेसोबतच महसूल वाढीच्या विविध स्त्रोतांचे नियोजन करण्यात आले असल्याचे अभय हरणे यांनी सांगितले. प्रास्ताविक राजेश पाटील यांनी केले.

सर्वोत्तम तांत्रिक पेपर सादरीकरणाबाबत चित्रा पाटील, उप कार्यकारी अभियंता, भुसावळ आणि जयश्री नंदनवार, उप कार्यकारी अभियंता, खापरखेडा यांनी तांत्रिक पेपर्स सादरीकरणावर आपली अभ्यासपूर्ण भूमिका मांडली.

खापरखेडा औष्णिक वीज केंद, पारस औष्णिक विद्युत केंद्र, चंद्रपूर महा औ.वि. केंद, परळी औ. वि. केंद्र, उरण बी.ओ. यांना विविध कामगिरीसाठी सन्मानित करून पिनॅकल पारितोषिक देण्यात आले. विद्युत केंद्राच्या शिफ्ट प्रमुखांना वैयक्तिक पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले.

सर्वोत्कृष्ट कामगिरी पारितोषिकाचे मानकरी म्हणून मुख्य अभियंता सुनिल सोनपेठकर, कार्यकारी अभियंता सुनिल दंडवते, रेणुकादास कुळकर्णी, उप कार्यकारी अभियंता शैलेंद्र पडवी, सौरभ कुळकर्णी, महेश जोशी, उप महाव्यवस्थापक समीर देऊळकर, योगेंद्र पाटील, यांना सन्मानित करण्यात आले.

संचालन सोनाली पगारे, वैष्णवी वंजाळकर, रोशन दुधे यांनी केले तर मुख्य अभियंता सुनिल सोनपेठकर यांनी आभार मानले. याप्रसंगी कार्यकारी संचालक विवेक रोकडे, डॉ. नितीन वाघ, पंकज नागदेवते, नितीन चांदूरकर, मुख्य अभियंते डॉ. अनिल काठोये, प्रसन्न कोटेचा, संजय रहाटे, दत्तात्रय साळुंखे, राहुल नाळे, शैलेश पडोळ, विजय बारंगे, अतुल सोनजे, श्रीमती विजया बोरकर, मुख्य महाव्यवस्थापक आनंद कोंत, विश्वनाथ कुळकर्णी, हर्षल भास्करे, राजीव मालेवार, पुरुषोत्तम वारजुरकर, कंपनी सचिव राहुल दुबे, उपमुख्य अभियंते, अधीक्षक अभियंते, अन्य वरिष्ठ अधिकारी तसेच कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

## फडणवीस यांनी आमचं घर फोडलं

मधुकरराव चव्हाणांचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २०:

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दबाव टाकून आमचं घर फोडलं, असा आरोप काँग्रेसचे जेष्ठ नेते माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी केला.

लोकसभा निवडणुकी दरम्यान चव्हाण यांचे पुत्र आणि तुळजाभवानी साखर कारखान्याचे अध्यक्ष सुनील चव्हाण यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. याच पार्श्वभूमीवर मधुकरराव चव्हाण यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आरोप करीत तोंडसुख घेतले आहे.

## महिला नेत्यांनी काढला एकमेकींचा बाप


**चाकणकर, खडसेंत जुंपली**



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २०:

राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला नेत्या रूपाली चाकणकर व शरद पवार गटाच्या नेत्या रोहिणी खडसेया महिला नेत्यांनी यावेळी थेट एकमेकींचा बाप काढला आहे. मुक्ताईनगरमध्ये बोलताना रूपाली चाकणकर यांनी एकनाथ खडसे यांच्या कन्या रोहिणी खडसे यांच्यावर निशाणा साधला होता. त्यांचे स्वतःचे कोणतेही कर्तृत्व नाही. त्यांना वडिलांच्या नावावर सुरक्षित असणारा मतदारसंघही जिंकता आला नाही, असे त्या म्हणाल्या.

रोहिणी खडसे यांनी रुपाली चाकणकर यांच्या या टीकेला सडेतोड प्रत्युत्तर दिले. रूपाली चाकणकर या बाप बदलणाऱ्यांपैकी एक आहेत. त्यांनी आपले बाप बदलले असून, त्यांना कोणताही जनाधार नाही. त्यामुळे त्यांच्या विधानाला मी कोणतेही महत्त्व देत नाही. त्यांनी आधी नगरसेवक होऊन दाखवावे, असे आव्हान रोहिणी खडसे यांनी दिले आहे.




पान १ वरून.....

### विश्वकर्मा योजनेतून कौशल्याला...

अमरावती येथे होत असलेले पीएम मित्रा पार्क हे वस्त्रोद्योगास नवी झळाळी प्राप्त करुन देण्याच्या प्रयत्नातील पुढचे पाऊल आहे. फार्म टू फायबर, फायबर टू फॅब्रिक, फॅब्रिक टू फॅशन आणि फॅशन टू फॉरेन अशा सुत्रातून प्रयत्न सुरू असून विदर्भातील उच्च दर्जाच्या सूतापासून तयार होणारे कपडे परदेशात निर्यात होऊन येथील शेतकरी समृध्द होतील. अमरावतीच्या पार्कमध्ये दहा हजार कोटींची गुंतवणूक अपेक्षित असून १ लाखाचा रोजगार उपलब्ध होईल, असेही मोदी म्हणाले.

आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजनांमुळे राज्यातील महिला व इतरांच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीला पोषक ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पीएम विश्वकर्मा योजनेंतर्गत महाराष्ट्रात १ लाख ४६ हजार कारागिरांची नोंदणी झाली आहे. कारागिरांना अत्याधुनिक साधनांसाठी ५ टक्के दराने कर्ज उपलब्ध करून देण्यात येत असून त्यांच्या उत्पादीत वस्तुंना मोठी बाजारपेठ निर्माण करण्यात आल्याचे केंद्रीय लघु, सुक्ष्म व मध्यम उद्योग मंत्री जीतनराम मांझी यावेळी म्हणाले.

देशातील सात पीएम मित्रा पार्कपैकी अमरावती येथे होत असलेल्या पार्कच्या माध्यमातून कापसापासून कापडापर्यंत व कापडापासून फॅशनपर्यंतच्या एकत्र सुविधा उपलब्ध होणार आहेत. यामुळे मोठ्या गुंतवणुकीसह रोजगार उपलब्ध होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

पीएम मित्रा पार्कच्या माध्यमातून विदर्भासह राज्याच्या औद्योगिक क्षेत्राला मोठी चालना मिळेल, असे सांगत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अत्यंत कमी कालावधीमध्ये मोठे प्रकल्प गतिमानतेने पुर्ण केल्यामुळे पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा विक्रम केल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

दरम्यान, प्रधानमंत्र्यांनी कळ दाबून अमरावती येथील पीएम मित्र पार्क, आचार्य चाणक्य कौशल विकास केंद्रांचे उद्घाटन केले तसेच पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्ट अप योजनेचा शुभारंभ केला. पीएम विश्वकर्मा योजनेच्या १ लाख कारागिरांना ओळखपत्र व प्रमाणपत्र तसेच १ लाख कारागिरांना डिजिटल कौशल्य प्रमाणपत्रांचे वितरण आणि ७५ हजार कारागिरांना कर्जाचे वितरण आभासी पद्धतीने करण्यात आले.

प्रारंभी मुख्यमंत्री शिंदे यांनी चरख्याची प्रतिकृती तर केंद्रीय मंत्री जीतनराम मांझी यांनी ग्रामीण कारागिरांनी तयार केलेल्या कलाकृती भेट देऊन प्रधानमंत्र्यांचे स्वागत केले. लघु, सुक्ष्म व मध्यम विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या परंपरागत ग्रामीण कारागिरांनी तयार केलेल्या विविध आकर्षक कलाकृतींच्या प्रदर्शनाचे उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमाला आमदार चंद्रशेखर बावनकुळे, डॉ.पंकज भोयर, दादाराव केचे, समीर कुणावार, माजी खासदार रामदास तडस, प्रभारी विभागीय आयुक्त डॉ. विपीन ईटनकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

## महायुतीची मते वाढवता येत नसतील तर गप्प राहा..


**भुजबळांचा वाचाळविरांना सल्ला**




■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २०:** राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा मंत्री छगन भुजबळ यांनी आपल्या सहकारी नेत्यांना वादापासून दूर राहण्याचा सल्ला दिला आहे. महायुतीची मते वाढवता येत नसतील, तर आपल्या बोलण्याने कोणताही वाईट परिणाम होऊ नये याची काळजी सर्वांनी घेतली पाहिजे, असे ते म्हणालेत.

भाजप आमदार नीतेश राणे यांनी नुकतेच अल्पसंख्यक समाजाविषयी वादग्रस्त विधान केले होते. त्यानंतर बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी राहुल गांधींची जीभ छाटण्याची भाषा केली होती. तदनंतर भाजपचे खासदार अनिल बोंडे यांनी त्यांच्या जिभेला चटके द्या, असे विधान केले होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गुरुवारीच महायुतीच्या नेत्यांना सांभाळून बोलण्याचा सल्ला दिला होता. यानंतर छगन भुजबळ यांनी महायुतीच्या नेत्यांना वादग्रस्त विधाने करण्यापासून स्वतःला दूर ठेवण्याचा सल्ला दिला आहे.



नागपूर
महासागर
वृत्तसागर
■ शनिवार, दि. २१, सप्टेंबर २०२४ ■

# फटाक्यामुळे ७ महिला भाजल्या

## उमरेडमध्ये गणपती विसर्जन मिरवणुकीतील दुर्घटना

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

उमरेडमध्ये गुरूवारी रात्री गणपती विसर्जनादरम्यान फटाक्यांमुळे सात महिला भाजल्या आहे. घटनेमुळे परिसरात तणाव निर्माण झाला होता. जखमींवर विविध रुग्णालयात उपचार सुरू आहे. पोलिसांकडून मंडळाच्या पदाधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याच्या हालचाली सुरू आहे.

उमरेडमध्ये शिवस्नेह गणेश मंडळाद्वारे आयोजित केला जाणारा गणेशोत्सव उमरेडचा राजा या नावाने प्रसिद्ध आहे. गणेशोत्सवादरम्यान येथे विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. प्रत्येक वर्षी येथील गणपती विसर्जनाची मिरवणूकही आकर्षणाचे केंद्र आहे. गुरूवारी रात्री (१९ सप्टेंबरला) मंडळाकडून गणेश विसर्जनाची मिसवणूक निघाली. त्यात मोठ्या संख्येने परिसरातील भाविक सहभागी झाले होते.

मंडळाकडून गणेश विसर्जनादरम्यान ढोल- ताशेसह फटाक्यांचेही प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. विसर्जनाच्या मिरवणूकीत परिसरातील मोठ्या संख्येने भाविक सहभागी होऊन नाचत होते. मिरवणूकीत मंडळाच्या काही कार्यकर्त्यांनी फटाका प्रदर्शनासाठी फटाके पेटवले. त्यानंतर अचानक फटाक्याच्या स्फोट होऊन येथील सुमारे सात महिला जखमी झाल्या.

या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली. तर आगीत महिला भाजत असल्याचे बघत उपस्थितांची पळापळ झाल्याने काही जण खाली पडले. उपस्थितांनी तातडीने जखमींना जवळच्या ग्रामीण रुग्णालयात हलवले. येथे प्राथमिक उपचारानंतर काहींना नागपुरातील खासगी रुग्णालयात हलवले गेले. सध्या सगळ्याच जखमी महिलांची प्रकृती स्थिर असल्याचा पोलिसांचा दावा आहे. दरम्यान या गणेश विसर्जनाच्या मिरवणूकीत फटाका प्रदर्शनासाठी कोणतेही सुरक्षेचे उपाय केले नसल्याचे पुढे येत आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचे गांभिर्य बघत गणेशोत्सव मंडळाच्या फटाके फोडणाऱ्या कार्यकर्त्यांसह पदाधिकाऱ्यांवरही गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# आयुर्वेदात मॉडर्न ॲप्रोच आवश्यक : नितीन गडकरी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

येणारा काळ आयुर्वेदासाठी अनुकूल आहे. पण गतीने पुढे जायचे असेल तर आयुर्वेदासाठी भविष्याचे व्हिजन तयार करावे लागेल. उपकरणे/यंत्रे तयार करणाऱ्यांसोबत आयुर्वेदाचा समन्वय साधावा लागेल. आयुर्वेदात मॉडर्न ॲप्रोच आणि डिजीटल इन्फ्रास्ट्रक्चर व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. तसे झाले तर लोकांचा आयुर्वेदाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलेल, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज (शुक्रवार) व्यक्त केला.



श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व संशोधन केंद्र आणि श्री सद्गुरू विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने कवीवर्य सुरेश भट सभागृहात श्री विश्व व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. या व्याख्यानमालेचे उद्घाटन नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्यांनी विचार मांडले. यावेळी सद्गुरू विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्टचे अध्यक्ष आनंदनाथ महाराज, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, भारत सरकारच्या भारतीय चिकित्सा पद्धतीचे अध्यक्ष डॉ. जयंत देवपुजारी, बैद्यनाथचे संचालक सुरेश शर्मा आदींची प्रमुख उपस्थिती होती.

गडकरी म्हणाले, आयुर्वेद आणि योगविज्ञान ही भारताची मोठी शक्ती आहे. संपूर्ण जग आपल्याकडे अपेक्षेने बघत आहे. भारतीय समृद्ध संस्कृती, इतिहास आणि वारसा हेच याचे मुख्य कारण आहे. आपण पुरातन काळात विकसित केलेल्या विज्ञानाबद्दल जगाला आकर्षण आहे. आयुवेर्दात पंचकर्मासह विविध उपचार तसेच अनेक प्रकारच्या औषधांमुळे असाध्य आजार बरे झाले आहेत. आयुवेर्दाच्या बाबतीत देशात चांगले काम करणाऱ्या संस्था आहेत. पण ज्या पद्धतीने संशोधन व्हायला पाहिजे, त्यात आणखी खूप प्रयत्नांची गरज आहे.

कुठल्याही रुग्णाला जो आजार असेल त्याचे योग्य निदान खूप महत्त्वाचे असते. रोगाचे निदान होणार नाही तोपर्यंत औषध ठरवता येणार नाही. त्यातही औषधांची गुणवत्ता खूप महत्त्वाची आहे. प्रत्येक पॅथीमध्ये चांगले संशोधन सुरू आहे. आयुवेर्दात ज्या थेरेपी विकसित झाल्या आहेत, त्याचा लोकांना फायदा होत आहे, याचाही त्यांनी आवर्जून उल्लेख केला. आयुवेर्दात कॅन्सर, अस्थमा, पोटाच्या अनेक आजारांवर औषध आहे. त्याचा चांगला परिणाम बघायला मिळत आहे. आयुर्वेद हे भारतीय संस्कृती आणि इतिहासाच्या स्वाभिमानाचे प्रतिक आहे. योगविज्ञान आणि आयुर्वेद असो, किंवा कुठलीही उपचार पद्धती असो, त्याचा स्वीकार होण्यास वेळ लागतो. विश्वासार्हता हे सर्वांत मोठे कॅपिटल आहे. ती मिळवण्यासाठी व राखण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न केला पाहिजे, अशी अपेक्षा गडकरी यांनी व्यक्त केली.

## अखिल भारतीय पेन्शन न्यायालयाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे नागपूर विभागात 18/09/2024 रोजी जी.व्ही. जगताप- अध्यक्षस्थानी अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक (टी) आणि उदय कुमार भारती, वरिष्ठ. कार्मिक विभागातर्फे विभागीय कार्मिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय पेन्शन अदालतचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या पेन्शन कोर्टात विभागीय कार्मिक अधिकारी - श्वेता एच के छोरिया, सहाय्यक विभागीय वित्त व्यवस्थापक-प्रेमप्रकाश आणि पेन्शनर्स असोसिएशनच्या वतीने अध्यक्ष -डी.एन. मूर्ती, सरचिटणीस - बासुदेव पात्रा, सचिव - पी. व्ही. रमण व तक्रारदार यांची प्रमुख उपस्थिती होती.

या पेन्शन कोटार्तील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी विशेष मोहीम 4.0 अंतर्गत 14 प्रलंबित प्रकरणांवर चर्चा करून निकाली काढण्यात आला.

## खनिज क्षेत्र बाधीत गरजु व्यक्तींना सहाय्य अर्ज करण्याचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

अनुदान तत्वावर गरजु व्यक्तींना चार चाकी हातगाडी, वजन काटा व प्लास्टीक खुर्ची 100 टक्के उपलब्ध करून देण्यात येते. प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेंतर्गत, कौशल्य विकास या लेखाशिर्षकाखाली, रोजगार निर्माण करण्याच्या दृष्टीने नागपूर जिल्ह्यातील खनिज प्रत्यक्ष बाधीत व अप्रत्यक्ष बाधीत क्षेत्रातील, प्रथम अर्ज प्राप्त होणाऱ्या पात्र अर्जदारास प्रथम प्राधान्य तत्वावर ही योजना आहे. या योजनेचा अर्ज सहायक आयुक्त समाज कल्याण, नागपूर यांचे कार्यालयात उपलब्ध असून 23 सप्टेंबरपर्यंत अर्ज मागविण्यात आले आहे.

अर्जदार हा नागपूर जिल्ह्यातील खनिजकर्म प्रत्यक्ष बाधित (66 टक्के) किंवा अप्रत्यक्ष बाधित (34 टक्के) क्षेत्रातील रहीवासी असावा. 2023-24 या आर्थिक वषार्तील तहसिलदार/नायब तहसिलदार यांनी निर्गमित केलेला उत्पन्नाचा दाखला (उत्पन्न मयार्दा 1 लाख पर्यंत ), रहिवासी दाखला, आधार कार्ड झेराक्स प्रत (नागपूर जिल्ह्यातील आवश्यक), रेशन कार्ड झेराक्स प्रत, इलेक्ट्रीक बिलाची झेराक्स प्रत सोबत जोडावी.

नागपूर जिल्ह्यातील रहीवासी असणाऱ्या व्यक्तींनी या योजनेचा लाभ घेण्याकरीता सहायक आयुक्त समाज कल्याण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन, श्रध्दानंद पेठ, नागपूर या कार्यालयातून अर्ज प्राप्त करून घेऊन सर्व कागदपत्रासह 23 सप्टेंबरपर्यंत कार्यालयास करावे, असे आवाहन सहायक आयुक्त समाज कल्याण सुकेशिनी तेलगोटे यांनी आहे. अधिक माहीतीसाठी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाशी सपंर्क साधावा.

## हावडा एक्सप्रेसवर दगडफेक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

शुक्रवारी नागपूर जवळील कामठी रेल्वे स्थानकाबाहेर हावडा एक्सप्रेसवर दगडफेक झाली. शुक्रवारी अहमदाबादहून कामठी स्थानकावर येत असलेल्या अहमदाबाद-हावडा एक्सप्रेसवर दगडफेक करण्यात आली. ही गाडी कामठी स्थानकाजवळ असताना काहींनी दगड भिरकावले. अचानक दगड आल्याने नेमके काय होत आहे हे प्रवाशांना समजले नाही.

याबाबत काही प्रवाशांनी तक्रार केली. रेल्वे स्थानक काही अंतरावर असताना गाडी थांबवण्यात आली. याठिकाणी सुमारे १५ मिनिटे गाडी उभी होती. दगडफेकीमुळे कोणालाही दुखापत झाली नाही. तसेच गाडीचेही नुकसान झाले नाही. सर्व काही ठीक असल्याची खात्री पटल्यानंतर ही गाडी पुढील प्रवासाला निघाली. रेल्वे सुरक्षा दल आणि लोहमार्ग पोलिसांनी घटनास्थळ गाठले. परंतु दगडफेक करणारे पसार झाले होते.

# कंत्राटी भरतीचा पुन्हा धडाका

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

इतर मागास बहुजन कल्याण विभागाची आस्थापना, क्षेत्रीय कार्यालये, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) आणि इतर मागासवर्गीयांच्या वसतिगृहांसाठी बाह्यस्त्रोताद्वारे मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या सेवापुरवठादार कंपनीची निवड करण्यात आली आहे. या माध्यमातून ओबीसी विभागात ८७० कंत्राटी पदांची भरती होणार आहे. विशेष म्हणजे, राज्य शासनाने कंत्राटी भरती करणार नाही असे जाहीर केले असतानाही विविध विभागात सेवापुरवठादार कंपनीमार्फत कंत्राटी भरती सुरूच असल्याचे चित्र आहे.

कामगार विभागाच्या १४ मार्च २०२३ रोजीच्या निर्णयाद्वारे सर्व शासकीय, निमशासकीय संस्था, महामंडळांमध्ये आवश्यक कर्मचाऱ्यांची कंत्राटी भरती सुरू झाली होती.

त्यासाठी नऊ संस्थांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, हा निर्णय केवळ मंत्रालय किंवा शासकीय विभागापुरता मर्यादित न ठेवता सरकारने त्याची व्याप्ती थेट महापालिका, नगरपालिका, महामंडळांपर्यंत वाढवल्याने विद्यार्थी संघटना आणि राजकीय पक्षांनी आंदोलन उभारले.

हे आघाडी सरकारचे पाप असल्याचा आरोप करीत कंत्राटी भरतीचा निर्णय रद्द करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २० ऑक्टोबर २०२३ रोजी केली. ३१ ऑक्टोबरला कंत्राटी भरती रद्द केल्याचा निर्णय जाहीर झाला.

मात्र, केवळ पुरवठादार नऊ संस्थांचेच कंत्राट रद्द करण्यात आले असून शासनाच्या विविध विभागांमध्ये कंत्राटी भरती सुरूच असल्याचे चित्र आहे. इतर बहुजन कल्याण विभागाच्या आस्थापनेतील विविध विभागांसाठी सुधारित आकृतिबंध तयार करण्यात आला आहे.

त्यानुसार बाह्ययंत्रणेद्वारे विविध संवगार्ची ८७० पदे भरण्यात येणार आहेत. यासाठी एस-२ इन्फोटेक इंटरनॅशनल लि.या सेवापुरवठादार कंपनीची निवड करण्यात आली आहे. कंत्राटी भरतीमुळे पुन्हा राज्यातील वातावरण तापण्याची शक्यता आहे.

कंत्राटी भरतीमध्ये मागासवर्गीय समाजाला आरक्षण मिळणार नसल्याने विविध ओबीसी संघटनांनी यास विरोध केला आहे.

ओबीसी विभागाच्या शासन निर्णयानुसार, सेवा पुरवठादार कंपनीच्या कायार्देशाच्या दिनांकापासून पुढील ३ वर्षांपर्यंत किंवा याबाबत पुढील आदेश येईपर्यंत बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ पुरवठा करता येणार आहे. त्यामुळे पुढील तीन वर्षे नियमित पदभरतीची शक्यता धुसर असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

## बावनकुळेंकडूनही नितेश राणेंची पाठराखण

**नागपूर:** या देशांमध्ये राहून काही मुस्लिम पाकिस्तान आणि बांगलादेशची भाषा बोलत आहे. जे मुस्लिम भारतात प्रेमाने राहतात त्यांच्याबद्दल नितेश राणे बोलले नाहीत तर भारताबद्दल जे विरोधी मत व्यक्त करतात त्यांच्याबद्दल राणे बोलले, असे सांगत भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी राणे यांची पाठराखण केली. चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपुरात प्रसार माध्यमांशी संवाद साधला. नितेश राणे यांनी मुस्लिमांबद्दल केलेल्या आक्षेपार्ह विधानाची सध्या राज्यभर चर्चा आहे. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी त्यांच्यावर टीका केली आहे. भाजप नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राणे यांना वादग्रस्त वक्तव्य टाळा, असा सल्ला दिला.

# विजेचे दर घटणार!

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना कार्यान्वित झाल्यावर कृषी पंपावरील दीड ते दोन रुपयांच्या क्रॉस सबसिडीचा भार कमी होईल.

त्यामुळे राज्यातील व्यावसायिक, औद्योगिक व जास्त वीज वापर असलेल्या घरगुती ग्राहकांचे वीज दर युनिटमागे सुमारे दीड ते दोन रुपयांनी कमी होतील, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष



तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

नागपुरातील महावितरण कार्यालयात बैठकीसाठी आले असता त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. लोकेश चंद्र म्हणाले, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनीच्या ९ हजार २०० मेगावॉट प्रकल्पावर काम सुरू आहे. छत्रपती संभाजीनगर येथील पहिला प्रकल्प कार्यान्वित झाला आहे. येत्या महिन्याभरात राज्यात ५० मेगावॉट, डिसेंबरपर्यंत ५०० मेगावॉट, मार्च २०२५ पर्यंत ३ हजार मेगावॉट तर सप्टेंबर २०२५ पर्यंत संपूर्ण ९ हजार २०० मेगावॉटचा प्रकल्प कार्यान्वित होण्याची शक्यता आहे.

### क्रॉस सबसिडीचा भार कमी होणार

महावितरणकडून सरकारी-भागीदारी तत्त्वावर ३ हजार ५०० मेगावॉटचे कायार्देश दिले गेले. मार्च २०२६ पर्यंत १५ ते १६ हजार मेगावॉटचे काम दिले जाईल. या योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळेल, असेही लोकेश चंद्र म्हणाले. सध्या कृषी पंपासाठी शासनाकडून काही क्रॉस सबसिडी दिली जाते.

इतर भार व्यावसायिक, औद्योगिक आणि जास्त वीज वापर असलेल्या घरगुती ग्राहकांवर टाकला जातो. या योजनेमुळे शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या क्रॉस सबसिडीचा भार कमी होऊन व्यावसायिक, औद्योगिक, जास्त वापर असलेल्या घरगुती ग्राहकांचे वीज दर युनिटमागे दीड ते दोन रुपयांनी कमी होतील. उन्हाळ्यात राज्यात विजेची मागणी २९ हजार मेगावॉटपर्यंत जाते. ही मागणी २०३० पर्यंत ४५ हजार मेगावॉटपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

त्यामुळे अखंडित वीज पुरवठ्यासाठी महावितरणने सौर, पवन ऊर्जा, जलविद्युत प्रकल्प, औष्णिक विद्युत प्रकल्पातून सुमारे ३५ हजार मेगावॉट वीज मिळवण्याचे नियोजन केल्याचेही लोकेश चंद्र यांनी सांगितले.

## शुभम गावंडे रातुम नागपूर विद्यापीठात प्रथम

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. २० :

दत्तवाडीतील शुभम धनंजय गावंडे हा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या एम.टेक. मेकॅनिकल इंजिनिअरिंग परीक्षेत विद्यापीठातून प्रथम आला आहे. एम.टेक. मेकॅनिकल इंजिनिअरिंग शाखेत मेरिट येणारा तो एकमेव विद्यार्थी आहे. याबाबतचे सूचना पत्रक विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे यांनी नुकतेच जारी केले आहे. केडीके अभियांत्रिकी महाविद्यालयाचा एम. टेक. इंजिनिअरिंगचा विद्यार्थी असलेल्या शुभमचा सीजीपीए ७.७४ असा आहे. नोकरी करीत असतानाच शुभमने तो एम.टेक. मध्ये प्रवेश घेतला होता. शुभमने आपल्या यशाचे श्रेय आई - वडील,



महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, मामा सतीश मोहोड यांना दिले.


# बटुकभाई ज्वेलर्सने लाँच केले

## सुझैन खानच्या सहाकार्याने खास ज्वेलरी कलेक्शन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

प्रसिद्ध ज्वेलरी ब्रँड बटुकभाई ज्वेलर्स ख्यातनाम डिझायनर सुझैन खान यांच्या सहकार्याने तयार केलेले त्यांचे बहुप्रतीक्षित नवीन कलेक्शन लॉन्च करत असल्याची घोषणा करताना खूप आनंद होत आहे. हा संग्रह, 25 सप्टेंबर 2024 रोजी शंकर नगर येथील बटुकभाईच्या नवीन स्टोअरमध्ये पदार्पण होईल.

नवीन कलेक्शन त्याच्या क्लिष्ट कारागिरी आणि कलात्मक दृष्टीसाठी वेगळे आहे. प्रथमच, बटुकभाई ज्वेलर्सने ग्राहकांना खरोखर अद्वितीय काहीतरी ऑफर करून कलाकृती म्हणून दुप्पट दागिने सादर केले आहेत. प्रत्येक तुकडा अचूक आणि उत्कटतेने डिझाइन केलेला आहे, वायकिंग आणि नॉर्स सभ्यतेच्या गूढवादातून कालातीत प्रेरणा घेऊन आधुनिक सौंदर्यशास्त्रांचे मिश्रण करते. प्राचीन रूनिक प्रतीकांचा समावेश करून, संग्रहामध्ये सोने, हिरे आणि मौल्यवान दगड यासारख्या सामग्रीपासून बनवलेल्या अंगठ्या, हार, कफ आणि कानातले यांचा समावेश आहे.

हे कलेक्शन फक्त दागिन्यांपेक्षा जास्त आहे. सर्जनशीलता आणि कारागिरीचा दुर्मिळ संयोजन देणारा प्रत्येक तुकडा ही कलाकृती आहे. केवळ वयाने तरुणांनाच नाही तर मनाने तरुणांनाही आकर्षित करणारे काहीतरी तयार करण्यावर आम्ही भर दिला आहे, बटुकभाई ज्वेलर्सच्या क्रिएटिव्ह डायरेक्टर नयना शेठ म्हणाल्या.

ज्वेलरी कलेक्शन ठळक, रंगीबेरंगी आणि तरूण आहे, जे इतिहास आणि अभिजातता यांच्या संमिश्रणाची प्रशंसा करतात त्यांच्यासाठी डिझाइन केलेले आहे. हे बटुकभाई ज्वेलर्सच्या सोने, हिरे आणि मौल्यवान दगडांच्या कारागिरीतील उत्कृष्टतेचा तिस-या पिढीतील वारसा दाखवते, जे किरकोळ आणि निर्यात दोन्ही बाजारांना पुरवते.

हा ब्रँड संपूर्ण शहरात दोन आऊटलेट्स चालवतो आणि शंकर नगरमधील नवीन स्टोअर बटुकभाईच्या विस्तारातील एक रोमांचक मैलाचा दगड आहे.

सुझैन खान, एक प्रसिद्ध इंटिरियर आणि प्रोडक्ट डिझायनर, लॉन्च इव्हेंटला उपस्थित राहतील, ज्यामुळे या प्रसंगाचे ग्लॅमर आणि अनन्यता वाढेल. ज्वेलरी कलेक्शनमधील अतुलनीय लालित्य आणि वेगळेपण प्रत्यक्ष अनुभवण्यासाठी ज्वेलरी प्रेमी आणि संग्राहकांना 25 सप्टेंबर 2024 रोजी स्टोअरला भेट देण्याचे हार्दिक निमंत्रण आहे.



### बटुकभाई ज्वेलर्स बद्दल


उत्कृष्ट कारागिरी आणि उत्कृष्ट डिझाइनच्या परंपरेवर स्थापित, बटुकभाई ज्वेलर्स हा तिसऱ्या पिढीचा कौटुंबिक व्यवसाय आहे जो सोने, हिरे आणि मौल्यवान दगडांच्या दागिन्यांमध्ये विशेष आहे. उत्कृष्टतेचा वारसा आणि शहरातील दोन आउटलेटसह, ब्रँड किरकोळ, निर्यात आणि घाऊक सेवांसह दागिन्यांची विविध श्रेणी ऑफर करतो. बटुकभाई ज्वेलर्स नाविन्यपूर्णता, कलात्मकता आणि वेळ आणि ट्रेंडच्या पलीकडे जाणारे साहित्य वितरित करण्याच्या वचनबद्धतेसाठी ओळखले जाते.


# नागपूर जिल्ह्यात अनेक महाविद्यालयात चाणक्य कौशल्य विकास केंद्र

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

राज्यातील नामंकित महाविद्यालयामध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करून विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान योजनेच्या धर्तीवर आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राची स्थापन करण्यात आली आहे.

नागपूर जिल्ह्यातील ४७ महाविद्यालयामध्ये केंद्र सुरू झाले. त्याचे ऑनलाईन उद्घाटन शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले.



केंद्र सुरू करण्यात आलेल्या महाविद्यालयात एन.आय.टी. पॉलिटेक्निक, नागपूर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलाजी, गुरु नानक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलाजी, कोलबास्वामी ज्युनियर कॉलेज, कोरडे पीव्हीटी आयटीआय नरखेड, डॉ. एम.के. उमाठे कॉलेज नागपूर, आयुष्मान मेडिकल पॅरामेडिकल कॉलेज, लक्ष्मीनारायण इनोव्हेशन टेक्नॉलाजी विद्यापीठ, जवाहरलाल नेहरु आर्ट, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, इंदिरा गांधी नर्सिंग स्कुल भिवापूर, हिस्लॉप कॉलेज, राधिकाताई पांडव पॉलिटेक्निक बेसा, अरुणराव कलोडे महाविद्यालय, सेंट विन्सेट पलोती कॉलेज ऑफ इंजिनियरींग नागपूर, भिवगडे नॅशनल कॉलेज, जी.एच. रायसोनी कॉलेज ऑफ ऑर्ट, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, जी.एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनियरींग, महात्मा गांधी ऑर्ट अँड कामर्स कॉलेज, सेंट्रल इंस्टिटयुट ऑफ बिजनेस मॅनेजमेंट, रिसर्च अँड डेव्हलपमेंट, सेंट्रल इंडिया कॉलेज ऑफ फार्मसी लोणारा, सेंट्रल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, एएमसीईसी इन्स्टीट्यूट, विलासराव देशमुख कॉलेज ऑफ इंजिनियरिग, गव्हर्नमेंट इन्स्टिट्यूट ऑफ होटल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलाजी, वसंतदादा पॉलिटेक्निक नंदनवन, महिला महाविद्यालय नंदनवन, मेहरबाबा महाविद्यालय, मानीयर कॉलेज ऑफ कॉम्प्युटर अँड मॅनेजमेंट, झुलेलाल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलाजी नागपूर, मदर टेरेसा नर्सिंग इन्स्टीट्यूट नागपूर, पन्नासे पॉलिटेक्निक, श्रीमती किशोरीताई भोयर कॉलेज ऑफ फार्मसी, श्रीमती सुग्रता वंजारी महिला महाविद्यालय वडोदा, ज्युपीटर आयुर्वेद मेडिकल कॉलेज नागपूर, तुलसीरामजी गायकवाड-पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरींग नागपूर, रेनुका कॉलेज, एस.बी. सीटी बिंझाणी कॉलेज, सिंबासिस सेंटर फॉर स्किल डेव्हलपमेंट, अब्दुल मजीद प्रायव्हेट इंडस्ट्रियल ट्रेनिंग सेंटर, साई कॉलेज ऑफ होटल मॅनेजमेंट, संताजी महाविद्यालय, वैंनगंगा कॉलेज ऑफ इंजिनियरींग अँड मॅनेजमेंट, व्हीएसपीएम माधुरीबाई देशमुख इंस्टिट्युट ऑफ नर्सिंग एज्युकेशन, व्हीएसपीएम कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, सोनाताई पांडव पॉलिटेक्नीक काटोल, सेवासदन ऑर्ट कॉमर्स अँड सायन्स कॉलेज नागपूर यांचा समावेश आहे.

# खिंडसी जलाशयाच्या बॅक वॉटर वाढीमुळे शेतकरी संकटात

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २० :

खिंडसी जलाशयाचे बॅक वॉटर सध्या शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरली आहे. पाण्यात शेती बुडाली. जनावरांना कुरण व शेती संबंधित विविध समस्या उद्भवल्या आहेत. पाणी साठवणूक पातळी कमी करून या समस्या त्वरित सोडवाव्यात, या आशयाचे निवेदन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सचिन किरपान यांच्या नेतृत्वात मंगळवार, 17 सप्टेंबरला शेकडो शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी यांना दिले. समस्या त्वरित निकाली न काढल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे.



## उपाययोजना करा : सचिन किरपान

बॅक वॉटरमध्ये वाढीमुळे जलाशय परिसरातील कवडक, मुसेवाडी, सोनपूर, पिंडकापार, मांगली, गुडेगांव, मांद्री, पंचाळा, लोहारा, घोटी आदी 10 ते 12 गावांच्या शिवारातील सुमारे 2000 एकर आणि खोलगट भागातील शेतीत 8 ते 10 टक्के पाणी साचलेले आहे. शेकडो एकर शेतीतील पिकांचे नुकसान झाले. गुरांना वैरण, रस्ते, मासेमारी, शेतात मजूर नेणे-आणने, विद्यार्थ्यांना शाळेत जाण्याची समस्या निर्माण झाली आहे.

खते व इतर साहित्य शेतात नेण्यासाठी बोटींचा वापर करावा लागत आहे. जनावरांवरांची देखील उपासमार होत आहे. मुसेवाडीपर्यंतचा शिवार पाण्याखाली आहे. विद्युत ट्रान्सार्मर पाण्यात बुडाला आहे. खंडीत विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी बोटीचा वापर करावा लागतो. त्याचा भुर्दंडही शेतकयांवर पडतो.

अधिक पाण्यामुळे मासेमारी होत नही. तुंबलेले पाणी कमी होण्याऐवजी सतत वाढ आहे. वैरणाअभावी अनेक शेतकऱ्यांनी दुभती जनावरे विकली. उर्वरित विकण्याच्या तयारीत आहेत. या सर्व समस्या बॅक वाटरनमुळे निर्माण झाल्या आहेत.

सिंचन विभागाचे अधिकारी कर्मचाऱ्यांनी खिंडसी तलावालगतच्या शेतकऱ्यांना पुर्वसुचना न देता, जमिनीचे मोजमाप न करता त्यांच्या जमिनीवर खिंडसी तलावाची सिमांकन कक्षा निश्चित केली व दगड गाडले.

याप्रकरणाची तातडीने चौकशी करावी. जलाशयातील शेती करण्यासाठी लिलावात घेतलेली जमीन तीन वर्षापासून पाण्याखाली आहे. शासनाने शेतकऱ्यांकडून गोळा केलेली अंदाजे एक कोटी रक्कम संबंधित शेतकऱ्यांना त्वरीत परत द्यावी. या सर्व समस्यांवर व मागण्यांवर कायमस्वरूपी उपाययोजना करावी अन्यथा आंदोलन करण्यात येईल व उद्भवणाया परिस्थितीला प्रशासन जाबाबदार राहील, असा इशारा देण्यात आला आहे.

शिष्टमंडळात रामटेक कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती सचिन किरपान, संचालक नकुल बरबटे तसेच शेतकरी कवडुजी नवघरे, शिवाजी रामकेळकर, राजु माहादेव हिवरकर, जयेंद्र कारु मेश्राम, रतन ब्राम्हणवाडे, ज्ञानेश्वर नवघरे, मनोज खुशाल नऊले, उमराव सहादेव देशभ्रतार, आशिष बदन, दादुराव चाफले, विष्णु मौतकार, सुधाकर बदन, नारायन वाघाडे, बालचंद चनेकार, संजय वाघ, शंकर देशमुख, श्रीराम बघेले, नारायण महाजन, गजाणन चकोले, होरेलाल मनघटे, तुळशिराम महाजन, देवराव चनेकर, बाळकृष्ण बागडे, नितीन दामोधर चांदेकर, गिरधर पानसे, गजानन चकोले, शंकर लक्ष्मण देशमुख, जयदेव विसनेपार, परसराम मौतकार, अनिल झाडे, पृथ्वीराज भोवते, रविन्द्र शालीकराम गभणे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा समावेश होता.

# खापरी रेल्वे जि.प. शाळेत शैक्षणिक सॉफ्टवेअर हस्तांतरण सोहळा



■ महासागर प्रतिनिधी
वाडी , दि. २० :

खापरी ( रेल्वे )जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत लुपिन फाऊंडेशनच्या वतीने ग्रामीण भागातील गरजू वंचित गरीब होतकरू विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढावी यासाठी अभ्यासक्रमावर आधारित इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतचे अभ्यासक्रमाचे सॉफ्टवेअर शाळेला हस्तांतरित करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच रेखा सोनटक्के होते.

उदघाटन लुपिन लिमिटेडचे व्यवस्थापक किरण देशमुख यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून लुपिन फाउंडेशनच्या श्रीमती शिल्पा, पंचायत समिती नागपूरचे गटशिक्षणाधिकारी केवल दुर्गे शिक्षण विस्तार अधिकारी नारायण चापले केंद्रप्रमुख अर्चना नागपुरे, ग्रा.पं. सदस्य तथा शाळा व्यवस्थापन समिती सदस्य शेखर उपरे ग्रा.पं.सदस्य विनोद ठाकरे, शेषराव चरडे, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष श्री पवार, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य सुषमा ठाकरे उपस्थित होते.

प्रास्ताविक मुख्याध्यापक विलास भोतमांगे यांनी केले. संचालन शिक्षक रवींद्र बोबडे यांनी तर आभार वर्षा पदीर यांनी मानले. आयोजनासाठी कल्पना भांगे, कांता खोंडे, सुनीता वराडे तसेच ग्रामपंचायतचे कर्मचारी यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाला पालक विद्यार्थी उपस्थित होते.

# पुढच्या वर्षी लवकर या, जयघोषात संताजी नगरच्या राजाचे विसर्जन

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. २० :

कांद्री येथील संताजी नगरच्या राजाचे मोठ्या उत्साहात विसर्जन करण्यात आले. गेल्या दहा वर्षांपासून संताजी नगरमध्ये गणेशोत्सव मोठ्या उत्साहात थाटात साजरा केला जातो . दरवर्षी प्रमाणे याही वर्षी गणेश चतुर्थी च्या दिवशी शनिवार दिनांक ७ सप्टेंबर रोजी विधिवत पूजा करून गणेश मूर्तीर्ची स्थापना करण्यात आली. या गणेशोत्सवा दरम्यान भाविक गणेशभक्तांनी दररोज सकाळ - संध्याकाळ आरती केली. रक्तदान शिबिर, मटके फोडणे, संगीत खुर्ची, होम मिनिस्टर, लहान मुलांचे ध्वनिमुद्रण नृत्य, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा असे अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून सोमवारला भव्य महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.

बुधवार दिनांक १८ सप्टेंबर रोजी सायंकाळी समस्त संताजी नगर वासीयांच्या उपस्थितीत भव्य महाआरती करण्यात आली. महामार्गा वरून मोठ्या उत्साहात विसर्जन मिरवणुक काढुन गणपती बाप्पा मोरया , पुढच्या वर्षी लवकर या असा जयघोषात गणेशजींच्या मूतीर्चे कन्हान नदीत विसर्जन करुन दहा दिवस चाललेल्या गणेशोत्सवाची सांगता करण्यात आली.

यावेळी अतुल हजारे, प्रफुल्ल हजारे, तन्मय मेश्राम, अमर कुंभलकर, भगवान मस्के, अप्पी सैनी, सतीश झलके, मनोज वाडे, गणेश शर्मा, पियुष राजनकर, कैलास काकडे, राजेश शिंगणे, संजय लाडगे, दिनेश खाडे, हरी यादव, शुभम यादव आदी उपस्थित होते.

यादव, मेहुल शुक्ला, ओम हजारे, पुरुषोत्तम काकडे, नंदू बारई, पंकज गुरव, निखिल हजारे, चंदू ठाकरे, पवन मेश्राम, अरुणा हजारे, वंदना गडदे, रितू मस्के, मीरा कुंभलकर, राखी गभणे, सुषमा चावडे, निशा ठाकरे, पोर्णिमा ठाकरे, आशा गुरव, रुपाली हजारे, पूजा हजारे, सुनीता सावरकर, सुनीता चटप आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रेल्वे संरक्षण दल आणि रेल्वे फुटबॉल संघाकडून खेळांच्या माध्यमातून स्वच्छतेच्या जागृतीसाठी सहकार्य

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

सध्या सुरू असलेल्या स्वच्छता ही सेवा 2024 मोहिमेच्या चौथ्या दिवशी, मध्य रेल्वे नागपूर विभागामध्ये क्रीडा आणि सामाजिक जबाबदारीचा अनोखा मिलाफ पाहायला मिळाला कारण रेल्वे संरक्षण दल आणि रेल्वे फुटबॉल संघ यांनी एका विशेष फुटबॉल सामन्याच्या माध्यमातून स्वच्छतेच्या जनजागृतीसाठी एकत्र आले आणि समुदाय क्रियाकलाप. या कार्यक्रमाचा उद्देश स्वच्छ भारत मिशनचा संदेश वाढवणे आणि स्वच्छ भारतासाठी सामूहिक प्रयत्नांना प्रेरणा देणे हा आहे.

दिवसाची सुरुवात टूगेदरनेस रन ने झाली ज्यामध्ये कर्मचारी, क्रीडा अधिकारी आणि उत्साही खेळाडूंचा सक्रिय सहभाग होता. स्वच्छ पर्यावरण राखणे ही एक सामायिक जबाबदारी आहे हे दाखवून देत सहभागींनी स्वच्छता उपक्रमाच्या समर्थनार्थ रॅली काढली. रनने दिवसभरातील




उर्वरित क्रियाकलापांसाठी टोन सेट केला, निरोगी आणि अधिक टिकाऊ वातावरण तयार करण्यासाठी फिटनेस आणि समुदायाच्या सहभागाचे महत्त्व अधिक बळकट केले.

धाव घेतल्यानंतर, रेल्वे फुटबॉल संघ आणि आरपीएफ यांच्यात मैत्रीपूर्ण फुटबॉल सामना झाला. हा कार्यक्रम केवळ कौशल्य आणि सांघिक कायार्चे प्रदर्शन नव्हते, तर महत्त्वाच्या सामाजिक समस्यांवर जागरुकता निर्माण करण्यासाठी क्रीडा कसे व्यासपीठ म्हणून काम करू शकतात हे अधोरेखित करण्याची संधी देखील होती. संपूर्ण सामन्यादरम्यान, खेळाडूंनी वैयक्तिक आणि सार्वजनिक दोन्ही ठिकाणी स्वच्छता राखण्याचा संदेश देत स्वच्छता आणि सांघिक कायार्ची भावना मूर्त स्वरुपात दिली. सामना आणि दिवसाच्या क्रियाकलापांना सहभागी आणि प्रेक्षक या दोघांकडून मोठ्या उत्साहाने भेट दिली गेली, स्वच्छ भारताची संकल्पना साकार करण्यात सामूहिक कृतीची महत्त्वपूर्ण भूमिका यावर जोर देण्यात आला. स्वच्छता ही सेवा 2024 अंतर्गत या उपक्रमाने खेळ, सामुदायिक सहभाग आणि सामाजिक जबाबदारी यांच्यातील समन्वय अधोरेखित केला.

## निधन वार्ता

# पुणाबाई धार्मिक



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २० :

प्लाट नं ५५ सुदर्शन नगर, राजापेठ हुडकेश्वर रोड नागपूर निवासी पुणाबाई बाळकृष्णा धार्मिक यांचे निधन झाले. त्या ८५ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात चार मुले, सुना, नातवंड व बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्या द्रुगधामना हायस्कूलचे शिक्षकेत्तर कर्मचारी पंढरी धार्मीक यांच्या मातोश्री आहे. त्यांच्या पाथीर्वावर २१ सप्टेंबर रोजी स. ११ वाजता मानेवाडा घाटावर अंत्यसंस्कार करण्यात येईल.

# पं. गोपाळराव वाडेगावकर स्मृती द्विदिवसीय संगीत समारोह

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

पं. गोपाळराव वाडेगावकर शिष्य परिवार, खासदार सांस्कृतिक महोत्सव समिती, सप्तक आणि दि ब्लाईंड रिलीफ असोसिएशनद्वारा कै. पं. गोपाळराव वाडेगावकर स्मृती द्विदिवसीय संगीत समारोह 20 आणि 21 सप्टेंबर 2024 रोजी आयोजित करण्यात आला आहे. यात संगीत क्षेत्रातील नामवंत कलाकार आपली कला सादर करणार आहेत. दक्षिण अंबाझरी रोड येथील दि ब्लाईंड रिलीफ असोसिएशनच्या प्लॅटिनम जुबिली हॉल मध्ये शुक्रवारी 20 संध्या. 6 वाजता पं. गोपाळराव वाडेगावकर यांचे शिष्य सूर-ताल संसद सादर केली. त्यानंतर मुंबईचे प्रसिद्ध तबलावादक ओजस अढ़िया यांचे एकल तबला वादन होईल.

श्रीकांत पिसे लहरा संगत करतील. शनिवारी, 21 तारखेला इटलीच्या लियो व्हतुर्नी यांचे एकल सतार वादन होणार असून त्यांना तबल्यावर फ्रांचेस्को घेरार्डी साथसंगत करणार आहेत. त्यानंतर, देवासच्या प्रसिद्ध विदुषी कलापिनी कोमकली यांचे सुश्राव्य गायन होणार आहे. त्यांना तबल्यावर पं. संदेश पोपटकर तर संवादिनीवर श्रीकांत पिसे साथसंगत करणार आहेत. या निःशुल्क कार्यक्रमाचा रसिकांनी आस्वाद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केली आहे.

# कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघाची जिल्हा कार्यकारिणी जाहीर






■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २० :

नागपूर जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालय मराठी विषयाच्या प्राध्यापकांची सभा महाल येथील सी.पी.अँड बेरार महाविद्यालयात प्रा.विजया दहीकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.या सभेत नागपूर जिल्हा मराठी विषय कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या कार्यकारिणीची घोषणा राज्य सल्लागार प्रा.नीता खोत यांनी केली.

या नवीन कार्यकारिणीत नागपूर जिल्हाध्यक्षपदी प्रा.सुरेश नखाते, कार्याध्यक्षपदी प्रा.सपन नेहरोत्रा तर सचिवपदी प्रा.संजय तिजारे यांची निवड करण्यात आली. कोषाध्यक्ष प्रा. मृगा पागे, उपाध्यक्षपदी प्रा.नरेश तम्मेवार, प्रा.डॉ.शालिनी तेलरांधे, प्रा. डॉ.सुधीर रायपूरकर, प्रा.मेघा राऊत तर सहसचिव प्रा. भारती दवणे, संघटक प्रा.किशोर वरभे सल्लागार प्रा.विजया दहिकर, प्रा.विवेक सातेलवार, सदस्यपदी प्रा.धनश्री माकडे, प्रा.वर्षा वाढई, प्रा.डॉ.गायत्री ताजने, प्रा.डॉ. दिनेश खुरगे, यांची निवड करण्यात आली आहे.

नागपूर जिल्ह्यातील तालुकानिहाय अध्यक्ष उमरेड प्रा.सुदर्शन अंगडलवार, भिवापूर अध्यक्ष प्रा.संजय बनकर, रामटेक अध्यक्ष प्रा.जगदीश गुजरकर, नरखेड अध्यक्ष प्रा.रमेश काळे, सावनेर अध्यक्ष प्रा. दुगार्लाल खंगारे, काटोल अध्यक्ष प्रा.संगीता काकपुरे, पारशिवनी अध्यक्ष प्रा.दामोधर चुटे, कळमेश्वर अध्यक्ष प्रा. रामकृष्णा सर्याम, हिंगणा अध्यक्ष प्रा.डॉ.प्रकाश राठोड, कामठी अध्यक्ष प्रा.डॉ.नीता वानखेडे, मौदा अध्यक्ष प्रा मधुकर सदाशिव बाभरे, कुही अध्यक्ष प्रा.श्रावण लांबट, ग्रामीण तालुका प्रतिनिधी, प्रा. सायली लाखे ( पिदडी) आदींची नियुक्ती करण्यात आली.

# नारे तकबीर अल्ला हो अकबरने कामठी दुमदुमली

■ महासागर प्रतिनिधी,
कामठी, दि. २० :

ईद ए मिलाद दुन्नबि या सना निमित्ताने कामठी शहरात प्रमुख मार्गांनी भव्य प्रमाणांत मिरवणुक काढण्यात आली. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मुस्लीम धमार्चे प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्या जयंती निमित्ताने आज १६ सप्टेंबर २०२४ ला



कामठी शहरात मोठ्या प्रमाणांत मिरवणुक काढण्यात आली. या मिरवणुकीत नारे तकबीर अल्ला हो अकबर च्या गजराने संपूर्ण कामठी शहर दूमदूमले होते.

मोहम्मद अली गंज रूईगंज मैदान परिसरातुन मरकजी सिरतुण्णबी सोसायटीचे अध्यक्ष मोहम्मद हनीफ अशरफी यांच्यासह सुरेश भाऊ भोयर, अँड सुलेखा ताई कुंभारे, शहाजहा शफात अंसारी , शकील अहमद, अहफाज ठेकेदार, युवा नेते इर्शाद शेख, राशिद अंसारी, मोहम्मद सुलतान अशरफी आणि मान्यवर होते. हैदरी चौकात हुसैन अली, जफर अब्बास , अनावर भाई गुपचुपवाले, शहनशाह शाईन भाई आदींनी मिरवणूकीतील उपस्थितांना शरबत आदींचे वाटप केले.

# किट्स ऑटोनॉमस महाविद्यालय मध्ये ३९ वा स्थापना दिवस संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २० :

कविकुलगुरू ईंस्टिटयूटय ऑटेक्नॉलाजी अॅण्ड सायंस, किट्स (युजीसी अँटोनॉमस) महाविद्यालय रामटेक मध्ये 39 वा स्थापना दिवस 19 सप्टेबर ला किट्सच्या सिल्व्हर जुबली हॉल मध्ये संपन्न झाला.

या वेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत व्ही. राजेश्वरराव यांना अभिवादन करण्यात आले. स्थापना दिवसाचे उद्घाटन प्रमुख वक्ते संदिप अग्रवाल यांचे हस्ते झाले. कार्यक्रमाची अध्यक्षता प्राचार्य डॉ. अविनाश श्रीखंडे यांनी केली. यावेळी प्रामुख्याने आयक्यूएसीचे समन्वयक डॉ. यशवंत जिभकाटे, डीन. डॉ. पंकज आष्टणकर, विद्युत विभाग प्रमुख भानुदास टाले सहीत विविध विभागाचे डीन, विभाग प्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते.




प्रमुख अतीथी संदिप अग्रवाल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाले की पढाई के अलावा पढाई सुद्धा तेवढीच महत्वाची आहे. शैक्षणिक अभ्यासक्रम व्यतिरिक विद्यार्थ्यांनी विविध पुस्तकांचा अभ्यास करावा.

त्यातून नवीन संकल्पना मिळू शकते. कौशल्य मिळवा, निर्णय घेण्याची क्षमता वाढवा, परिवार व मित्रा मधे विश्वास वाढवा, संवेदनशील व्हा, निरोगी राहा व मनापासून काम करा.

प्रस्तावना प्राचार्य डॉ अविनाश श्रीखंडे यांनी केली. ते म्हणाले की किट्स रामटेकचे उद्घाटन पूर्व पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांनी केले होते. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत व्ही. राजेश्वरराव यांच्या दुरदृष्टीने संस्था आज ऑटोनॉमस झाली आहे.

संस्था सचिव व्ही. श्रीनिवास व संचालक व्ही. प्रणव यांच्या मार्गदर्शनात संस्था विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्वक शिक्षण सहित सर्व सोयी उपलब्ध करून देत आहे.

# विद्यार्थी सक्षम तर देश सक्षम : प्रा. अवंतीका लेकुरवाळे



■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. २० :

महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने आयोजित सक्षम विद्यार्थी घडले तर सक्षम देश निर्माण बनू शकतो, असे उद्गार या कार्यक्रमात सभापती प्रा. अवंतीका लेकुरवाळे यांनीं काढले.

बाल कल्याण विभाग सभापती जिप नागपुर यांच्या विशेष प्रयत्नाने मौदा तालुक्यात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व करियर गायडण्स या कार्यक्रमा मध्ये प्रत्येक गावात १० वी १२ वी ला जास्त टक्केवारी मिळालेल्या १५० विद्यार्थ्याचा सत्कार करण्यात आला. तसेच १२ वी कला, वाणिज्य व विज्ञान या तीनही क्षेत्रा मध्ये अव्वल असलेल्या प्रत्येकी पाच त्याचप्रमाणे १० वी मध्ये तालुक्यातुन अव्वल असलेल्या तालुक्यातील अशा एकूण वीस याप्रमाणे १२० विद्यार्थांना गौरविण्यात आले. त्यांनी पुढील शैक्षणिक आयुष्यात आपले चांगले करियर घडवावें, असे मार्गदर्शन केले. याप्रसंगी आमदार मा. टेकचंद सावरकर, जिप सदस्या राधाताई अग्रवाल, प.स. सभापती स्वप्निल जी श्रावणकर, पस सदस्य दिपक गेडाम, दुर्गा ठाकरे आदी उपस्थीत होते.

## -: जाहिरनामा :-

कोर्ट विद्य. कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, भिवापूर यांचे न्यायालय भिवापूर रोड, भिवापूर जिल्हा नागपूर पिन कोड – ४४१२०१
E-mail ID-tahsilbhiwapur@gmail.com
दुरध्वनी क्रमांक –०७१०६ २३२२४१.
क्र. प्रस्तु–१/तह.भि./कावि ७६७/२०२४
दिनांक: ३०/०८/२०२४

वाचा :- १. जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ २. भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचें कडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र. ३. जन्म मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३ २०२३ चा २०) च्या खंड १ आणि उपखंड. ४. मा. जिल्हादंडाधिकारी, नागपुर यांचे कडील आदेश क्रमांक अका/डी–१/जन्म–मृत्यु आदेश/कावि–१५८/२०२३ दिनांक ११/०५/२०२४ अन्वये. ५. मा. उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, उमरेड यांचे पत्र क्र. प्रस्तु.४/उविअ/– उम/कावि–१५/२०२४. दिनांक ३०/०५/२०२४, अन्वये. ६. अर्जदार श्री. अशोक बाबुराव मांढरे, राह, भिवापूर तह. भिवापूर जि. नागपूर

ज्याअर्थी अर्जदार श्री. अशोक बाबुराव मांढरे, राह. भिवापूर तह. भिवापूर जि. नागपूर यांनी त्यांचे आई नामे वच्छला बाबुराव मांढरे यांचा दिनांक २६/०४/१९७० रोजी मृत्यु झाल्याने दिनांक २६/०४/१९७० रोजी मृत्युची नोंद बाबत नगर पंचायत, भिवापूर ता. भिवापूर येथे दप्तरी घेणे करीमा निर्देशित करणे कामी अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू त्यांची आई नामे वच्छला बाबुराव मांढरे यांचा दिनांक २६/०४/१९७० रोजी मृत्यु झाल्याने दिनांक २६/०४/१९७० रोजी मृत्युची नोंद घेण्यात यावी असा अर्जदारांचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदहू अर्जदार यांना मृत्यु प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणे कामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी कार्यकारी दंडाधिकारी तथा नायक तहसिलदार, भिवापूर उपरोक्त वाचा क्र. १ आणि २ नुसार व ३, ४ व ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा मृत्युबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, भिवापूर यांचे न्यायालयात स्वतः जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनाम्याच्या दिनांका पासून तीस दिवसाचे आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्युबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही गृहीत धरून प्रस्तावित मृत्यु नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

कार्यकारी दंडाधिकारी,
तथा नायब तहसिलदार, भिवापूर

## जाहीरनामा

को.वि. श्रीमती. सारीका धात्रक,
तहसिलदार, रामटेक यांचे न्यायालय
प्र.क्र. ३/ एम आर सी–८१/२०२४
मौजा नगरधन ता. रामटेक
जिल्हा नागपूर

ज्याअर्थी मयुर संतोष उपासे रा. नगरधन, ता. रामटेक, जि. नागपूर यांनी स्वतः नामे मयुर संतोष उपासे यांचा जन्म दिनांक १९.०८.१९९१ रोजी मौजा नगरधन, ता. रामटेक येथे राहत्या घरी येथे झाला असुन जन्मची नोंद ग्रामपंचायत, नगरधन येथे केली नाही. त्याबाबत ग्रामपंचायत, नगरधन यांनी दिनांक २१.०८.२०२४ रोजी नोंद नसल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे नामे मयुर संतोष उपासे यांचा जन्म दिनांक १९.०८.१९९१ बाबत ग्रामपंचायत, नगरधन येथे नोंद घेणे बाबत आदेश पत्र मिळणे करीता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याव्दारे असे सुचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जात नमूद मयुर संतोष उपासे यांचा जन्म दिनांक १९.०८.१९९१ बाबत ग्रामपंचायत, नगरधन येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे आक्षेप अथवा उजर तक्रार असल्यास आपण दिनांक २८/०९/२०२४ पावेतो आपले आक्षेप अथवा उजर तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या न्यायालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक १९/०९/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

स्थळ :– रामटेक
दिनांक :– १९/०९/२०२४
(सारीका धात्रक)
नायब तहसिलदार, रामटेक

## नोटीस

तहसिलद्वार, नागपूर शहर यांचे कार्यालय, आकाशवाणी चौक, सिव्हील लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१
ई-मेल-आयडी-www.tahsildarngpcity@gmail.com
दुरध्वनी क्र. ०७१२-२५६११७५
क्र. प्रस्तु–२/नाय.तह./तह.नाग. (श.)/प्र.क्र. १०२/कावि-४९७/२०२४ दि :१३/८/२०२४

प्रति,
निबंधक, जन्म मृत्यू विभाग, नागपूर महानगर पालिका नागपूर

विषय :- जन्मची नोंद घेणेकामी जन्म मृत्यू अधिनियम कलम १३ (३) अन्वये प्राप्त अर्जावर सुनावणीस उपस्थित राहणेबाबत.

संदर्भ:- संजय जगदीशप्रसाद तिवारी, वय ५९ वर्षे धंदा निवृत्त, राह. अयोध्या नगर नागपूर मेकोसाबाग नागपूर यांचा अर्ज दिनांक २९.७.२०२४

उपरोक्त संदर्भीय पत्राचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भिय अर्जान्वये ज्या जन्माची किंवा मृत्यूची तो घडल्यानंतर एक वर्षाच्या आत नोंदणी करण्यात आली नसेल त्यांची नोंदणी जन्माचा किंवा मृत्यूचा तपशील बरोबर असल्याची खातरजमा करुन पाहिल्यानंतर प्रथम वर्ग दंडाधिकारी किंवा इलाखा शहर दंडाधिकारी यांनी दिलेल्या आदेशावरुन करण्यात येते. सबब जन्म मृत्यू अधिनियम कलम १३ (३) अन्वये संदर्भिय अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर अर्जावर दिनांक ३०/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता नायब तहसिलदार, तथा कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर शहर यांचे कक्षात सुनावणी घेण्यात येणार असून उक्त अर्जावर आपले म्हणने सादर करणेकामी उक्त नमूद दिनांकास न चुकता उपस्थित राहावे. अन्यथा आपले काहीही म्हणणे नसून संदर्भिय अर्जासमवेत जोडण्यात आलेल्या दस्ताऐवजाची तपासणी करुन जन्मची नोंद घेणेकामी आदेश देण्यास आपली काहीही हरकत नाही असे समजून नियमानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल याबाबत नोंद घ्यावी.

श्रीमती अपेक्षा रेच
नायब तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर शहर.

## नोटीस

तहसिलद्वार, नागपूर शहर यांचे कार्यालय, आकाशवाणी चौक, सिव्हील लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१
ई-मेल-आयडी-www.tahsildarngpcity@gmail.com
दुरध्वनी क्र. ०७१२-२५६११७५
क्र. प्रस्तु–२/नाय.तह./तह.नाग. (श.)/प्र.क्र. १०४/कावि-५०१/२०२४ दि :१४/८/२०२४

प्रति,
निबंधक, जन्म मृत्यू विभाग, नागपूर महानगर पालिका नागपूर

विषय :- जन्मची नोंद घेणेकामी जन्म मृत्यू अधिनियम कलम १३ (३) अन्वये प्राप्त अर्जावर सुनावणीस उपस्थित राहणेबाबत.

संदर्भ:- हंसदास उंदरुजी उके, वय ७९ वर्षे, धंदा सेवानिवृत्त, राह. अमर नगर, मानेवाडा, बेसा नागपूर यांचा अर्ज दिनांक २९-०७-२०२४

उपरोक्त संदर्भीय पत्राचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भिय अर्जान्वये ज्या जन्माची किंवा मृत्यूची तो घडल्यानंतर एक वर्षाच्या आत नोंदणी करण्यात आली नसेल त्यांची नोंदणी जन्माचा किंवा मृत्यूचा तपशील बरोबर असल्याची खातरजमा करुन पाहिल्यानंतर प्रथम वर्ग दंडाधिकारी किंवा इलाखा शहर दंडाधिकारी यांनी दिलेल्या आदेशावरुन करण्यात येते. सबब जन्म मृत्यू अधिनियम कलम १३ (३) अन्वये संदर्भिय अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर अर्जावर दिनांक ३०/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता नायब तहसिलदार, तथा कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर शहर यांचे कक्षात सुनावणी घेण्यात येणार असून उक्त अर्जावर आपले म्हणने सादर करणेकामी उक्त नमूद दिनांकास न चुकता उपस्थित राहावे. अन्यथा आपले काहीही म्हणणे नसून संदर्भिय अर्जासमवेत जोडण्यात आलेल्या दस्ताऐवजाची तपासणी करुन जन्मची नोंद घेणेकामी आदेश देण्यास आपली काहीही हरकत नाही असे समजून नियमानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल याबाबत नोंद घ्यावी.

श्रीमती अपेक्षा रेच
नायब तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर शहर.

## नोटीस

तहसिलद्वार, नागपूर शहर यांचे कार्यालय, आकाशवाणी चौक, सिव्हील लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१
ई-मेल-आयडी-www.tahsildarngpcity@gmail.com
दुरध्वनी क्र. ०७१२-२५६११७५
क्र. प्रस्तु–२/नाय.तह./तह.नाग. (श.)/प्र.क्र. १०३/कावि-४९९/२०२४ दि :१४/८/२०२४

प्रति,
निबंधक, जन्म मृत्यू विभाग, नागपूर महानगर पालिका नागपूर

विषय :- जन्मची नोंद घेणेकामी जन्म मृत्यू अधिनियम कलम १३ (३) अन्वये प्राप्त अर्जावर सुनावणीस उपस्थित राहणेबाबत.

संदर्भ:-मुलगी हिना संजय बोराटकर हिचा जन्म दि. ४/१०/२००७ रोजी इंदिरा गांधी शासकिय वैद्यकिय महाविद्याल (मेयो हॉस्पीटल), नागपूर यांचा अर्ज दिनांक २९/०७/२०२४

उपरोक्त संदर्भीय पत्राचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भिय अर्जान्वये ज्या जन्माची किंवा मृत्यूची तो घडल्यानंतर एक वर्षाच्या आत नोंदणी करण्यात आली नसेल त्यांची नोंदणी जन्माचा किंवा मृत्यूचा तपशील बरोबर असल्याची खातरजमा करुन पाहिल्यानंतर प्रथम वर्ग दंडाधिकारी किंवा इलाखा शहर दंडाधिकारी यांनी दिलेल्या आदेशावरुन करण्यात येते. सबब जन्म मृत्यू अधिनियम कलम १३ (३) अन्वये संदर्भिय अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर अर्जावर दिनांक ३०/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता नायब तहसिलदार, तथा कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर शहर यांचे कक्षात सुनावणी घेण्यात येणार असून उक्त अर्जावर आपले म्हणने सादर करणेकामी उक्त नमूद दिनांकास न चुकता उपस्थित राहावे. अन्यथा आपले काहीही म्हणणे नसून संदर्भिय अर्जासमवेत जोडण्यात आलेल्या दस्ताऐवजाची तपासणी करुन जन्मची नोंद घेणेकामी आदेश देण्यास आपली काहीही हरकत नाही असे समजून नियमानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल याबाबत नोंद घ्यावी.

श्रीमती अपेक्षा रेच
नायब तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर शहर.

## नोटीस

कोर्ट विद्यमान सुनिल साळवे, नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर शहर यांचे कार्यालय, जिल्हा नागपूर
(तहसिल कार्यालय इमारत खोली क्र. ५, आकाशवाणी चौक, सिव्हिल लाइन्स, नागपूर- ०१)
ई-मेल-आयडी-www.tahsildarngpcity@gmail.
दुरध्वनी क्र. ०७१२-२५६११७५
क.ली/प्रस्तु-२/तह.नाग (शहर) / प्र.क्र.६०/ कावि ३१३/२०२४ दि. : ३१/०७/२०२४

प्रति,
निबंधक, जन्म मृत्यू विभाग, नागपूर महानगर पालिका नागपूर

विषय :- मृत्यूची नोंद घेणेकामी जन्म मृत्यू अधिनियम कलम १३ (३) अन्वये प्राप्त अर्जावर सुनावणीस उपस्थित राहणेबाबत.

संदर्भ :- श्री नरेश बापुराव पडवार, वय-६१, धंदा -मजुरी रा. कश्मीरी गल्ली, फुटाळा, नागपूर यांचा अर्ज दिनांक २६/०६/२०२४

उपरोक्त संदर्भीय पत्राचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भिय अर्जान्वये ज्या जन्माची किंवा मृत्यूची तो घडल्यानंतर एक वर्षाच्या आत नोंदणी करण्यात आली नसेल त्यांची नोंदणी जन्माचा किंवा मृत्यूचा तपशील बरोबर असल्याची खातरजमा करुन पाहिल्यानंतर प्रथम वर्ग दंडाधिकारी किंवा इलाखा शहर दंडाधिकारी यांनी दिलेल्या आदेशावरुन करण्यात येते. सबब जन्म मृत्यू अधिनियम कलम १३ (३) अन्वये संदर्भिय अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर अर्जावर दिनांक २६/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता कार्यकारी दंडाधिकारी, तथा नायब तहसिलदार, नागपूर शहर यांचे कक्षात सुनावणी घेण्यात येणार असून उक्त अर्जावर आपले म्हणने सादर करणेकामी उक्त नमूद दिनांकास न चुकता उपस्थित राहावे. अन्यथा आपले काहीही म्हणणे नसून संदर्भिय अर्जासमवेत जोडण्यात आलेल्या दस्ताऐवजाची तपासणी करुन मृत्यूची नोंद घेणेकामी आदेश देण्यास आपली काहीही हरकत नाही असे समजून नियमानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल याबाबत नोंद घ्यावी.

सुनिल साळवे,
नायब तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर शहर.

# जलजीवन मिशन योजनेचा तालुक्यात बट्ट्याबोळ

■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. २० :



जल मिशन योजनेच्या माध्यमातून मौदा तालुक्यातील गावांगावांमध्ये नवीन विहिरी, पाण्याच्या टाक्या, बोरवेल, सोलर वॉटर टँक, तर प्रत्येक घरी नळ कनेक्शन देऊन काल मर्यादित प्रकल्पाला पूर्णत्वास नेण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी, अभियंते, कंत्राटदार व ग्रामस्थ यांच्या समन्वयातून 2024 पर्यंत तालुक्यात जल मिशन योजना ही लोक चळवळ होण्याच्या दृष्टीने मौदा तालुक्याला प्रत्येक गावात लाखो रुपये व कोटी रुपये अपेक्षित खर्च असुन सुध्दा या योजनेकडे प्रशासनाच्या कमिशन बाजीमुळे दुर्लक्ष होत आहे.

सन 2024 संपत असताना अनेक ग्रामीण भागामध्ये ना.. नल.. ना पाणी जलमिशन की अधुरी कहाणी अश्या रुपात जल मिशन योजनेची विदारक परिस्थिती तालुक्यात दिसून येत आहे. त्यामुळे नागपूर जिल्हयाचे पालकमंत्र्यांनी या जलमिशन योजने कडे लक्ष द्यावे अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांमधून होत आहे.

मौदा तालुक्यामध्ये गावां गावामध्ये जल मिशन योजना पूर्ण करण्याकरीता ग्रामिण भागामध्ये प्रत्येक गावातील लोकसंख्या व येणाऱ्या अडचणीसाठी पावसाळा वगळता कालावधी देण्यात आला. तालुक्यातील अनेक गावांत जलजीवन मिशन योजनेंतर्गत कामे सुरू आहेत. कुठे संथगतीने, तर कुठे कामे अजूनही बंद आहेत. स्थानिक व वरिष्ठ पाणीपुरवठा अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे या योजनेचा तालुक्यात बट्टयाबोळ झाला आहे. वरिष्ठांनी तालुक्यात झालेल्या या योजनेच्या कामांची चौकशी करून सबंधित अधिकारी यांच्यावर कार्यवाही करून स्थानिक पाणी पुरवठा अधिकारी यांची तात्काळ हकालपट्टी करावी अशी मागणी सुद्धा जनतेमधून जोर धरत आहे.

तालुक्यामध्ये एकूण १२४ गावे असून, ६३ ग्रामपंचायतींमध्ये विभागली गेली आहेत. बहुतांश गावे पाणीटंचाईग्रस्त आहेत. पाणीटंचाईग्रस्त गावांना मुबलक व तसेच शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे याकरिता जलजीवन मिशनच्या माध्यमातून विविध ठिकाणी नळयोजनेची कामे सुरू आहेत. पाणीपुरवठा पाण्याची टाकी, पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईन सह विहिरींचे खोलीकरण, विहिरी तयार करून देण्यापासून तर टंचाईग्रस्त गावांतील नागरिकांच्या घरांपर्यंत पाणी पोहोचविण्याची जबाबदारी या महत्त्वाकांक्षी योजनेच्या माध्यमातून करण्यात येत आहेत.

या योजनेच्या माध्यमातून सुरू असलेली कामे १५ महिन्यांच्या कालावधीत पूर्णत्वास नेण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदारांची आहे. असे असताना टंचाईग्रस्त गावांमध्ये कामाची गती संथ असून, पंधरा महिन्यांपैकी कुठे बारा महिने, तर कुठे ११ महिन्यांचा कालावधी उलटला आहे. तालुक्यात पावसाळा असल्यामुळे कामे बंद अवस्थेत आहेत तर काही काही ठिकाणी विकास कामे हे सुरू आहेत. तर काही ठिकाणी बंद आहे. काही ठिकाणी पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरींचे खोलीकरण बरोबर करण्यात आलेले नाही तर अजूनही पूर्ण करणे झालेले नाही. पावसाळा संपण्याच्या मार्गावर आहे. तालुक्यात विहिरी खोलीकरणाची कामे आपसूकच लांबणीवर पडणार आहेत. अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षित धोरणामुळे टंचाईग्रस्त गावांना पाण्याच्या संकटाचा सामना करावा लागत आहे. परिणामी या महत्त्वाकांक्षी योजनेचा बट्ट्याबोळ झाल्याचे दिसून येत आहे. संथ गतीने सुरू असलेल्या तसेच बंद असलेल्या कामांचा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आढावा घेऊन दोषींवर कारवाई करून त्यांची ताबडतोब हकालपट्टी करावी.

# बेसामध्ये 'स्वच्छता हीच सेवा : आईच्या नावाने एक झाड' मोहिम

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २० :



नगर पंचायत बेसा-पिपळा प्रशासक अधिकारी भरत नंदनवार यांच्या मार्गदर्शनाखाली पद्मावती पार्क येथे 'स्वच्छता हीच सेवा : आईच्या नावाने एक झाड' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा उद्देश स्वच्छता आणि पर्यावरण रक्षणाला प्रोत्साहन देणे हा होता, त्याअंतर्गत वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली. स्थानिक रहिवाशांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन रोपे लावली.

रहिवाशांनी केवळ झाडे लावली नाहीत, तर ती झाडे दत्तक घेऊन त्यांच्या संगोपनाची आणि संवर्धनाची जबाबदारी आपण उचलू, असा संकल्प केला. यावेळी संबोधित करताना नगर पंचायत बेसा पिपलाचे प्रशासक अधिकारी भरत नंदनवार आणि फीडबॅक फाउंडेशनच्या सीओओ ज्योती प्रकाश म्हणाले की, प्रत्येक व्यक्तीने एक झाड लावलेच पाहिजे.

त्याची गरज आणि काळजी घेतली पाहिजे, जेणेकरून पर्यावरणाचे रक्षण होऊन भावी पिढ्यांना हरित वातावरण मिळू शकेल. कार्यक्रमाच्या शेवटी, फीडबॅक फाऊंडेशनच्या टीमने सर्व उपस्थितांना स्वच्छतेची शपथ दिली आणि एक पेड माँ के नाम मोहिमेत सक्रिय सहभागासाठी प्रेरित केले. या कार्यक्रमात किरण खोडके, वीणा जामगडे, स्वाती मोरे,विशाखा राऊत, वनिता धकाते, शीला रोहणे, विद्या चौधरी, माधवी राजूरकर आर्दींनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन पर्यावरण रक्षणाची जबाबदारी पार पाडण्याचा संकल्प केला. नगर पंचायत बेसा प्रशासक अधिकारी भरत नंदनवार यांच्या या अनोख्या उपक्रमाचे संकुलातील नागरिकांनी स्वागत केले.

यावेळी प्रशासक मोहित राजनकर, कर निरीक्षक अजय वाघमारे, लेखाधिकारी मनोज कावळे, आरोग्य अभियंता पूजा जाधव, दिव्यांशी लोणेरे, मंगेश माहुलकर, शीतल गुजरकर, प्रियांका पर्वतकर, स्वप्नील पाटील व न.प.चे कर्मचारी उपस्थित होते.

# बुद्ध धर्म हा सन्मानजनक जीवन जगण्याचा मार्ग : डी.डी. गजभिये




■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २० :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९५६ मध्ये बुद्ध धम्म स्वीकारल्यानंतर आपण सर्वांनी बुद्ध धम्म या नावाने ओळखले जाणे आवश्यक आहे. बुद्ध धर्म हा एक सन्मानजनक तसेच स्वाभिमानी जीवन जगण्याचा एक मार्ग आहे, असे प्रतिपादन डि.डी. गजभिये यांनी केले. लाव्हा ग्रामपंचायत अंतर्गत असणाऱ्या सोनबानगर येथील सम्राट अशोक बुद्धविहारात भारतीय बौद्ध महासभा, नागपूर जिल्हा ग्रामीणच्या वतीने आयोजीत धम्मदीक्षा कार्यक्रमात उपासक-उपासिकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी नागपूर ग्रामीणचे अध्यक्ष सुरेश उके तर प्रमुख अतिथी म्हणून भा.बौ.म.स.चे उपाध्यक्ष चंद्रशेखर गणवीर, कोषाध्यक्ष रणजीत राऊत, योगेंद्र भालाधरे, प्रेम मानवटकर उपस्थित होते. संस्थेचे सचिव शैलेंद्र लामसोंगे यांनी बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या उपक्रमाचे उद्दिष्टे सांगीतले. कार्यक्रमात १५० नागरिकांनी बुद्ध धम्माची दीक्षा घेतली. या सर्वांना मान्यवरांच्या हस्ते बुद्ध धम्माचे प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

अध्यक्ष सुरेश उके यांनी सर्वांकडून त्रिशरण पंचशील प्रदान करुन २२ प्रतिज्ञांचे पालन करण्याचे आवाहन केले. संचालन मुकुंद हाडके यांनी केले. यावेळी शुक्राचार्य मेश्राम, सुनीता मेश्राम, हरिदास नंदागवळी, सिद्धार्थ घोडेस्वार, वामनराव वाडेकर, ज्योती भौतकर यांचेसह उपासक-उपासिका आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १२ कृत्रिम तलाव आणि कलशांमध्ये विसर्जन

■ महासागर प्रतिनिधी,
हिंगणा, दि. २० :



बेसा नगर पंचायत आवारात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला व गणेशमूर्तींचे विसर्जन अश्रूंनी पार पडले. बेसा संकुलात 10,000 हून अधिक घरगुती गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. गणेश विसर्जनासाठी 12 कृत्रिम तलाव तयार करण्यात आले होते. याशिवाय निर्माल्य संकलनासाठी कलशाचीही व्यवस्था करण्यात आली होती. बेसा नगरपंचायतीची स्थापना होताच विकासाबरोबरच प्रत्येक सणासुदीत नागरिकांना सुविधा देण्याचे काम नगर पंचायत प्रशासनाकडून केले जात आहे. या गणेशोत्सवादरम्यान गणेशभक्तांना मूर्तीचे विसर्जन करताना कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये, यासाठी प्रांगणातील 12 प्रमुख ठिकाणी निर्माल्य संकलनासाठी विसर्जन कुंड आणि कलश कुंड्यांची स्थापना करण्यात आली आहे.

व्यवस्था करण्यात आली. कर्मचारी व सुविधा पाहून गणेशभक्तांनी घरगुती गणेशमूर्तींचे आनंदमय वातावरणात विसर्जन करताना नगर पंचायत बेसा प्रशासक भरत नंदनवार यांचे आपापसात कौतुक केले.

गणेश विसर्जनासाठी हौद फुलांनी सजविण्यात आला असून परिसरात विद्युत सजावट करण्यात आली आहे. मुख्य म्हणजे बहुतेक मातीच्या गणेशमूर्तींचे विसर्जन होते. रात्री 7 वाजेपर्यंत 10,000 च्या वर गणेशमूर्तींचे विसर्जन होत असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. प्रशासक भरत नंदनवार, प्रशासकीय अधिकारी मोहित राजनकर, कर निरीक्षक अजय वाघमारे, लेखाधिकारी मनोज कावळे, आरोग्य अभियंता पूजा जाधव, मंगेश माहुलकर, नितीन इमले, शीतल गुजरकर, प्रियंका पर्वतकर, स्वप्नील पाटील, एनपीए कर्मचारी आदींनी आपली जबाबदारी स्वीकारली.

# संभाजी ब्रिगेडचे ज्ञानेश महाराव यांच्यावर गुन्हा दाखल करा

## ठाणेदारांना विश्व हिंदू शौर्य संघटनेचे निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २० :

संभाजी ब्रिगेडच्या मेळाव्यात ज्ञानेश महाराव यांनी प्रभू श्री राम व श्री स्वामी समर्थ यांच्यावर अतिशय खालच्या स्तराला जाऊन वक्तव्य केले आहे. समाजाला व समाजाच्या भावना दुखावणाऱ्या ज्ञानेश महारावा यांच्या विरोधात गुन्हा नोंदवून त्यांना अटक करून कठोरातील कठोर कारवाई पोलीस प्रशासनाने करावी अशा आशयाचे निवेदन वाडीतील विश्व हिंदू शौर्य संघटना व सर्व हिंदू समाजाच्या वतीने वाडी पोलीस ठाणेचे ठाणेदार राजेश तटकरे यांना देण्यात आले. यावेळी संघटनेचे संस्थापक शिवम राजे, प्रज्वल अतकरी, धनराज लांडगे, गौरव उगले पाटील,मुकेश पाल,वैभव राजे, सचिन पाटील, चंद्रकांत येवले, आदित्य हेमबाडे, श्रावण नेवारे, राजेश कटरे, शिवा राऊत, राजेश कटरे, रंजित उईके, अंकेश उईके, उमेश वरखेडे,समीर शेंडे,सक्षम ठाक उपस्थित होते.

# हैदोस घालताना गुंडास अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

शाळेजवळ शस्त्रासह हैदोस घालत असलेल्या गुंडाला पारडी पोलिसांनी अटक केली. सचिन रुपचंद वासनिक (35) रा. डायमंडनगर, नंदनवन असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. मंगळवारी दुपारी चंद्रनगर परिसरातील सेंटर पॉइंट शाळेजवळ एक तरुण हातात शस्त्र घेऊन हैदोस घालत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीवरून तत्काळ पोलिस पथक घटनास्थळी पोहोचले. घेराबंदी करून सचिनला ताब्यात घेतले.

# वर्धमान सैनिकी शाळेतील मुली खो -खो व कबड्डीत जिल्हास्तरावर



■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. २० :

वडधामना येथील वर्धमान सैनिकी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील १७ वर्ष वयोगटातील मुलींच्या खो -खो स्पर्धेत तालुकास्तरीय प्रथम क्रमांक प्राप्त केला तर १४ वर्ष, १७ वर्ष आणि १९ वर्ष वयोगटातील मुलींच्या कब्बडी स्पर्धेत तालुकास्तरीय प्रथम क्रमांकाचे विजेतेपद मिळवित खो -खो आणि कबड्डीचे संघ जिल्हास्तरासाठी पात्र झाले. विद्यार्थ्यार्चे तालुका क्रिडा संयोजक देविदास लांबट, स्पर्धेर्चे परीक्षक शुभम चौधरी, राहुल काळबांडे, सागर पुडके, संस्थाध्यक्ष प्रकाश सावळकर संस्था सचिव निरंजना सावळकर, मुख्याध्यापिका शारदा व्यास, क्रिडा शिक्षक महेश येलुरे, मार्गदर्शक तिर्थराज गव्हाळे, सैनिकी प्रशिक्षक संदिप हिवराळे, राष्ट्रीय कब्बडी पंच दिनेश पवार आदींनी अभिनंदन केले.

# देशाचे भविष्य महिलांच्या हाती : संघमित्रा ढोके

## कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयात "महिला सुरक्षा व शिष्यवृत्ती" कार्यशाळा संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २० :



महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महिला कक्ष व अंतर्गत तक्रार निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २० सप्टेंबर २०२४ रोजी आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पूर्वकुलगुरू प्रो. मधुसूदन पेन्ना होते. व्यासपीठावर मुख्य अतिथी या नात्याने श्रीमती संघमित्रा ढोके, सहायक आयुक्त, नागपूर तसेच रामटेकचे पोलीस निरीक्षक प्रशांत काळे उपस्थित होते. वित्त व लेखा अधिकारी प्रो. कविता होले, शिक्षणशास्त्र अधिष्ठाता प्रो. ललिता चंद्रात्रे, महिला कक्ष समन्वयक डॉ. राजश्री मेश्राम, रामटेक परिसर संचालक प्रो. हरेकृष्ण अगस्ती उपस्थित होते. रामटेक पोलीस निरीक्षक प्रशांत काळे यांनीही महिलांच्या सुरक्षितेबद्दल शासन संवेदनशील असून, महिलांनी घ्यावयाच्या काळजी आणि सुरक्षा उपायांची माहिती दिली.

मुख्य अतिथी संघमित्रा ढोके म्हणाल्या, सर्व प्राण्यांमध्ये मनुष्य हा सर्वात हुशार प्राणी आहे. पण आजची परिस्थिती अशी आहे की, स्त्री व पुरुष हे मानव असूनही स्त्रियांना पुरुषांपासून सावध राहण्याची वेळ आली आहे. मनुष्याचे मनुष्याला भय वाटावे असे होणे ही समाजाची शोकांतिका आहे. महिलांनी कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन सहन करू नये तसेच असा प्रसंग आल्यास खंबीर राहून तक्रार दाखल करावी तसेच पोलीस व अन्य यंत्रणांची मदत घ्यावी असा सल्लाही त्यांनी दिला. अध्यक्षीय भाषणात पूर्व कुलगुरू प्रो. पेन्ना म्हणाले, समाजात घडणा-या या घृणास्पद कुरये निषेधार्ह आहेत. राज्यशासनाने या कार्यशाळेच्या माध्यमातून महिला व मुलींसाठी जनजागृतीचा केलेला हा उपक्रम आवश्यकच आहे. आमच्या विश्वविद्यालयातील वातावरण हे सुरक्षित असून, येथे महिला सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य आहे. या सुरक्षित वातारणामुळेच निर्भयपणे येथे महिला कार्य करू शकतात व विद्यार्थिनी शिकू शकतात.

कार्यकमाचे संचालन सहायक प्राध्यापिका श्रीवरदा माळगे यांनी केले तर आभार सहायक कुलसचिव कल्याणी देशकर यांनी मानले. कार्यक्रमाला विश्व विद्यालयातील महिला वर्ग, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, अधिकारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# पत्रकार हा शेवटचा आशेचा किरण आहे : प्रमोद काळबांडे

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. २० :




लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणजे पत्रकारिता...! आजच्या अस्थिर वातावरणात तळागाळातील लोकांच्या समस्यांना उजेडात आणून शासन, प्रशासन त्या शेवटच्या घटका पर्यंत पोहोचविण्याचे काम पत्रकार वार्ताहरकरत असतो. हा स्तंभ डगमगला तर मग सुलतानी माजेल. म्हणूनच आज खरी गरज आहे समाजात सजग जागरूक लेखणी उभी राहण्याची...त्यासाठीच समाजातूनच चांगले पत्रकार उभे राहावेत, त्याची सजग दृष्टी विकसित व्हावी, चांगल्या पत्रकारितेची योग्य दिशा सापडावी म्हणून विशेष कार्यशाळा आयोजित करणे गरजेचे आहे, असे मत सकाळचे संपादकपदी नियुक्ती करण्यात आलेले संपादक प्रमोद काळबांडे (पी के) यांनी २० सप्टेंबर रोजी काटोल येथील हॉटेल पंगत येथे काटोल,नरखेड तालुका पत्रकार संघाचे वतीने आयोजित केलेल्या संपादक म्हणून निवड करण्यात आलेले प्रमोद काळबांडे यांचे सत्काराला उत्तर देताना बोलत होते.

या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार यांचे प्रदेश उपाध्यक्ष, जिप नागपूरचे माजी जिप सदस्य सतीश शिंदे यांचे सहकायार्तून काटोल, नरखेड तालुका पत्रकार संघाचे वतीने आयोजित कार्यक्रम प्रसंगी बोलत होते. या प्रसंगी काटोल, नरखेड तालुक्यातील सर्व पत्रकार उपस्थित होते.

या प्रसंगी सत्कार मुर्ती संपादक प्रमोद काळबांडे यांनी सांगितले की पत्रकारानी जन समस्या तर मांडव्यात सोबतच स्वतःच्या ही समस्या मांडा. यातून तालुका, नगरपरिषद भागात पत्रकार भावनांची उभारणी करून पत्रकारांच्या कार्यशाळा व विविध प्रकारचे कार्यक्रम घ्यावे. ज्यांना पत्रकार होण्याची इच्छा आहे आणि पत्रकारितेतील नवे प्रवाह समजून घ्यायचेत त्यांनी ही कार्यशाळा जरूर करावी. विद्यार्थी, शिक्षक, लेखक, महिला अशा सर्वांसाठीच ही कार्यशाळा उपयुक्त आहे. या कार्यशाळेत दोन्ही तालुक्यातील उपस्थित पत्रकारितेची मूळ तत्वे, आजचे नवे प्रवाह, नव्या संधी, डिजिटल माध्यमे, पोर्टल्स या सर्वांची माहिती त्या त्या क्षेत्रातील अनुभवी मार्गदर्शक मार्गदर्शन करतील. या प्रसंगी दोन्ही पत्रकार संघाचे अध्यक्ष तसेच ज्येष्ठ पत्रकारांनी ही मार्गदर्शन केले. या प्रसंगी आगामी विधानसभा निवडणुक व पत्रकाराची भुमीका यावर साधक बाधक चर्चा करण्यात आली.

# अभियंता दिन उत्साहात साजरा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

अभियंता दिनानिमित्त दक्षिण पूर्व मध्य रेल्वे मोतीबाग कार्यशाळा, नागपूर येथील माँ अनुसया सभागृह, जगनाडे चौक, नागपूर येथे अभियंता दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला, यावेळी उपमुख्य यांत्रिकी अभियंता गुंजनकुमार वासनिक होते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमात कारखान्याचे व्यवस्थापक बी. आर. मेश्राम, विभागीय सहाय्यक विद्युत अभियंता अजय सिंग, अभियंता संघटनेचे अध्यक्ष इंजि. अभियंता संघटनेचे सचिव विवेक धापोडकर, इंजि. कार्यक्रमात मोतीबाग फॅक्टरी, नागपूरचे सर्व अभियंते आणि त्यांच्या कुटुंबियांनी उपस्थिती लावली, ज्यामध्ये लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनी उत्साहाने सहभाग घेतला.

रणजित कर्ण यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे संचालन, अभियंता. मारोती पिसे, इंजि. अनुप चव्हाण आणि इंजि. भानु प्रताप सिंह यांनी केले.सर्व विजेत्यांना पुरस्कार वितरण श्रीमती वासनिक मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. कृतज्ञता व्यक्त करताना इंजि. नागेश यांनी केले.

# आदिवासी गोंड गोवारी समाजाचे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. २० :



आदिवासी गोंडगोवारी जमात संविधानीक हक्क संघर्ष कृती समीती, महाराष्ट्र राज्य शाखा काटोल च्या वतीने दि. १७ सप्टेंबर २०२४ रोजी आपल्या न्याय, हक्कांच्या रक्षणासाठी महाराष्ट्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी उपविभागीय कार्यालयावर भव्य निषेध आंदोलन करण्यात आले. यात न्यायमूर्ती वडणे समितीला महाराज्य राज्य शासनाने दिलेली दोन महिन्यांची मुदतवाढ तात्काळ रद्द करण्यात यावी, अशी मागणी आदिवासी गोंडगोवारी समाजबांधवांनी केली आहे.

या निषेधार्थ आंदोलनात न्यायमूर्ती के. एल. वडणे समिती म. रा. मुंबई यांचेकडून सकारात्मक चौकशी अहवाल विनाविलंब हस्तगत करावा व आदिवासी विभाग शासन निर्णय क्र.सी.बी. सी.१६८४/३०९/का. ११ मंत्रालय विस्तार भवन मुंबई ३२ दि. २४ एप्रिल १९८५ मधील गोंड गोवारी जमाती बद्दलची चुकीची माहिती वगळून त्याठिकाणी सुप्रिम कोर्टाच्या दि. १८.१२.२०२० च्या निकालातील मुद्दा क्र. ८३ मधील सांस्कृतिक माहिती व इतर संदर्भ ग्रंथाप्रमाणे दुरुस्ती करून संविधानिक गोंड गोवारी जमातीला त्यांचे सन १९५० महसुली पुरावे जरी गोवारी असे असले तरी त्यांना संविधानिक तरतुदीनुसार विनाविलंब गोंड गोवारी अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र निर्गमीत करावे, मागण्या मांडण्यात आले. यावेळी कृती समितीचे कार्यकारी संयोजक मारोतराव नेहारे,अनिल नेहारे, सुमित बोरजे, मुकुंदजी नेहारे, शंकर शेंदरे, विलास राऊत, विनोद ठाकरे,मारोती चौधरी, बाबुराव बोरजे, रोशन वाघाडे, अमोल नेहारे, नरेशजी दूधकवळे, ममता नेहारे, विना शेंदरे, जयश्री राऊत, संगीता शेंदरे,ललिता राऊत, अर्चना नेहारे, प्रतिभा बोरजे उपस्थित होते.

# 'क्रिएटिव्हिटी' मध्ये रंगले रसिक...

## 'फ्यूजन ऑफ क्रिएटिव्हिटी' चित्रकला प्रदर्शनीचा समारोप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

अब्दुल गफ्फार यांनी आपल्या कुंचल्याने चितारलेले व्यक्तिचित्र, प्रा. मौक्तिक काटे यांनी आपल्या बोटांच्या जादूने मातीतून साकारलेले शिल्प आणि राजु दुशेट्टीवार यांच्या अमूर्त चित्रकलेत रसिक रंगले, दंगले. फ्यूजन ऑफ क्रिएटिव्हीटी प्रदर्शनाला रसिकांची झालेली गर्दी सर्वांनाच सुखावून गेली.



रंगायन कलादालनात चिटणवीस सेंटर व महाकल्प आर्टिस्ट अकादमी (मा), यांच्या संयुक्त विद्यमाने चार दिवसीय प्रदर्शन फ्यूजन ऑफ क्रिएटिव्हीटीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात व्यक्तिचित्र, शिल्पकला आणि अमूर्त चित्रकेलेचे प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते. या क्रियेटिव्हिटी आणि क्रिएशनच्या फ्यूजनला रसिकांनी भरभरून दाद दिली. या चित्रप्रदर्शनाचा गुरुवारी रसिकांच्या भरघोस गर्दीत समारोप झाला. या प्रदर्शनात देशभरातील 60 कलावंतांच्या कलाकृती सादर केल्या जातील. त्यात पेंटिंग, शिल्प, ग्राफिक व छायाचित्रणांचा समावेश आहे. समारोपीय कार्यक्रमाला जे जे स्कूल ऑफ आर्ट मुंबईचे अधिष्ठाता प्रो. विश्वनाथ साबळे, प्रसिद्ध चित्रकार चंद्रकांत चन्ने, चित्रकार राजू दुशेट्टीवार, माचे अध्यक्ष रवींद्र दूरुगकर, सदानंद बाकरे ट्रस्टचे मिलिंद लिंबेकर यांची मंचावर उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते शीतल भोतमांगे



यांना सदानंद बाकरे ट्रस्टतर्फे मोस्ट इनोव्हेटिव्ह आर्टिस्ट म्हणून सन्मानित करण्यात आले तर राजू डबली, विजय कारू, योगिता खंडालकर यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

चंद्रकांत चन्ने या क्रिएटिव्हिटीच्या प्रयत्नाचे विशेष कौतुक केले तर डॉ. सांबळे यांना माच्या माध्यमातून नागपुरातील कलाकारांचा चांगले व्यासपीठ उपलब्ध झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले. आशिष बोडदे यांनी सूत्र संचालन केले तर नीता देशपांडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला दीनानाथ पडोळे, माचे उपाध्यक्ष शरद सहारे, कोषाध्यक्ष प्रो. नंदकिशोर मानकर यारंच्यासह कला क्षेत्रातील दिग्गज व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

## तरुणीशी मैत्री पडली महागात : ८८ लाखांचा चुना

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २० :

चार्टर्ड अकाऊंटन्ट असल्याची बतावणी करून तरुणीने तरुणाशी मैत्री गाठली. वडिलांना गंभीर आजार असल्याचे सांगून मदत मागितली. तरुणाने कुटुंब आणि मित्रांना अंधारात ठेवून कागदपत्रांद्वारे बँकेतून ८८ लाख रुपयांचे कर्ज घेतले. बँक आणि फायनांस कंपनीने पीडितांशी संपर्क केला तेव्हा ही फसवणूक पुढे आली.

या प्रकरणी हुडकेश्वर पोलिसांनी आरोपी तरुणीविरुद्ध विविध कलमान्वये फसवणुकीचा गुन्हा नोंदविला आहे. सेजल अजय साधवानी (२५) रा. कुकरेजानगर, जरीपटका, असे आरोपी तरुणीचे नाव आहे. फिर्यादी प्रणय अरुण पंडित (२५) हा मिहान येथे एका कंपनीत सिस्टम इंजीनिअर आहे. या वर्षाच्या सुरुवातीला प्रणय मित्रांसोबत डीनर पार्टीला गेला होता. सोबत काम करणाऱ्या तरुणीसोबत सेजलही तेथे आली होती. सेजलने सीए असून मुंबईत एका फायनांस कंपनीत कामाला असल्याची बतावणी करून प्रणयशी मैत्री केली. दोघांनीही एकमेकांचे मोबाईल नंबर घेतले आणि बोलचाल सुरू झाली. मैत्री गाढ झाली आणि सेजलचे प्रणयच्या घरी येणे-जाणेही होते.

फेब्रुवारी महिन्यात सेजलने तिच्या वडीलांना ब्रेन कॅन्सर असून उपचारासाठी खूप पैसे लागत आहेत. काही आर्थिक संस्थांकडून मदत मिळू शकते, मात्र त्यासाठी तिला तिच्या खात्यात मोठा आर्थिक व्यवहार दाखवावा लागेल. अशी प्रणयकडे बतावणी केली.

तिने प्रणयचे आधार कार्ड, पॅन कार्ड, ऑफिस आयडी आणि सॅलरी स्टेटमेंट घेतले. प्रणयच्या मोबाईलवर ओटीपी आले जे त्याने सेजलला सांगितले. बँक आणि फायनांस कंपनीकडून त्याच्या खात्यात २९.२५ लाख रुपये जमा करण्यात आले.

संपूर्ण रक्कम प्रणयने सेजलच्या खात्यात वळती केली. त्यानंतर सेजलने प्रणयचे वडील आणि बहिणीचे कागदपत्र घेतले. त्यांच्या खात्यांमध्येही २७.२१ लाख रुपये जमा झाले. ही रक्कमही सेजलच्या खात्यांत वळती केली गेली.

सेजलने अशाच प्रकारे प्रणयचे मित्र कार्तिक कुऱ्हेवार, हर्षल भिवगडे आणि ऋतिक शिंदेच्या खात्यात जमा झालेली एकूण 32 लाख रुपयांची रक्कम स्वतःच्या खात्यात वळती करून घेतली. दोन महिने तिने बँकेतून घेतलेल्या कर्जाचे हफ्ते भरले. त्यानंतर हफ्ते भरणे बंद झाल्याने बँक व फायनांस कंपन्यांनी प्रणय, त्याचे कुटुंबीय आणि मित्रांशी संपर्क केला. तेव्हा त्यांना सेजलने फसवणूक केल्याचे पुढे आले.

प्रकरणाची तक्रार हुडकेश्वर पोलिसात करण्यात आली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. तपासात सेजल ही सीए नाही.

मात्र ती लोकांना सीए असल्याची खोटी माहिती देते. तिने अशाच प्रकारे अनेकांना चुना लावल्याचा अंदाज आहे. तिच्या खात्यांतील व्यवहार तपासले असता सेजलने शेअर आणि फॉरेक्स ट्रेडिंगमध्ये पैसे गुंतविले असल्याची माहिती मिळाली.

## दिव्यांग आणि ज्येष्ठांसाठी मनपाची ४ फिजिओथेरपी केंद्र

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

नागपूर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागातर्फे दिव्यांग आणि ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांसाठी ४ फिजिओथेरपी केंद्र लवकरच कार्यान्वित होणार आहेत. या केंद्रामध्ये दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना सर्व सेवा माफक दरात उपलब्ध करण्यात येईल.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी यांच्या निदेर्शानुसार, इंदिरा गांधी रुग्णालय गांधीनगर, पाचपावली सूतिकागृह ,सदर रोग निदान केंद्र आणि महाल रोग निदान केंद्र येथे फिजिओथेरपी केंद्र सुरु करण्यात येणार आहे.

फिजिओथेरपी केंद्र कार्यान्वित करणेबाबत आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या नेतृत्वात आणि अतिरिक्त आयुक्त(शहर) श्रीमती आंचल गोयल सूद यांचे मार्गदर्शनात आरोग्य विभाग कामकाज करीत आहेत. फिजिओथेरपी केंद्र सामान्य नागरिकांकरिता लाभदायक ठरतील असे प्रतिपादन आयुक्त डॉ. चौधरी यांनी केले आहे. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन अतिरिक्त आयुक्त (शहर) श्रीमती आंचल गोयल सूद यांनी केले आहे. याकरिता वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर व अति. वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार यांचे चमू कार्य करीत आहेत.

मुख्य वैधकीय आरोग्य अधिकारी डॉ.दीपक सेलोकर यांनी सांगितले की,फिजिओथेरपी ही एक विज्ञान-आधारित आरोग्य सेवा आहे जी लोकांना सामान्यपणे हलण्यास आणि कार्य करण्यास मदत करते. यात अनेक प्रकारच्या उपचारांचा समावेश असू शकतो. दिव्यांग व्यक्तीप्रमाणे वृध्द व्यक्ती,गरोदर स्त्रिया.गंभीर आजार असलेले रुग्ण यांना देखील शारीरिक दृष्ट्या सक्षम होण्यासाठी फिजिओथेरपी सेवेची आवश्यकता भासते.

## स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत इतवारी स्टेशनवर विभागीय रेल्वे व्यवस्थापक नमिता त्रिपाठी यांनी केले श्रमदान

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

स्वच्छता ही सेवा अंतर्गत, आज 19-09-2024 रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी स्टेशनवर, नमिता त्रिपाठी, विभागीय रेल्वे व्यवस्थापक- डी.पी. नागपूर, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक- एस.पी. चंद्रिकापुरे आणि व्ही. जगताप यांच्यासह विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांनी एकजुटीने श्रमदान करून स्वच्छता मोहीम राबवली व कचरा न टाकण्याचा संदेश देत प्रवासी व पाहुण्यांना स्वच्छतेची जाणीव करून दिली. रेल्वेच्या आवारात व रेल्वे रुळांवर खाद्यपदार्थ व कचरा फेकू नये तसेच रेल्वे ट्रॅक स्वच्छ ठेवण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. स्वच्छतेची पातळी आणखी सुधारण्यासाठी रेल्वे आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांना सतत स्वच्छता राखण्याचा सल्ला देण्यात आला.

तत्पूर्वी, सकाळी 07.00 वाजता दक्षिण पूर्व मध्य रेल्वे स्पोर्ट्स असोसिएशन नागपूरच्या वतीने स्पोर्ट्स ग्राऊंड मोतीबाग येथून वरिष्ठ विभागीय कमर्शियल मॅनेजर व वरिष्ठ दिलीप सिंग यांच्या नेतृत्वाखाली सायकल रॅली काढण्यात आली.

क्रीडांगण मोतीबाग येथून सायकल रॅलीला सुरुवात होऊन रॅलीची विभागीय कार्यालयावर सांगता झाली. लोकांना स्वच्छता अभियानाशी जोडणे हा या रॅलीचा मुख्य उद्देश होता, तर या रॅलीच्या माध्यमातून लोकांना शारीरिक आणि



मानसिक आरोग्याचा संदेश देण्यात आला. रोज सकाळी सायकल चालवल्याने तुमचे आरोग्य तर चांगले राहतेच शिवाय शरीर तंदुरुस्त राहते. विभागातील इतर स्थानक आणि रेल्वे परिसरात, स्थानक परिसरात आणि रेल्वे रुळ आणि रुळांच्या सभोवताली रेल्वे कर्मचारी, स्काऊट-गाईड टीम आणि अशासकीय संस्थांच्या मदतीने नियुक्त अधिकाऱ्यांकडून स्वच्छता करण्यात आली. ट्रेनमध्ये बायो-टॉयलेटचा योग्य वापर करणे, रुळांवर कचरा न टाकणे आणि रेल्वे परिसर स्वच्छ ठेवणे यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## 'एक पेड माँ के नाम' उपक्रमाची सोमवारी सुरुवात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

नाागपूर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते सोमवार २३ सप्टेंबर रोजी एयर फोर्स, सेमिनर हिल्स येथून एक पेड माँ के नाम उपक्रमाची सुरुवात केली जाणार आहे. याप्रसंगी मनपा अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल, अतिरिक्त आयुक्त श्री. अजय चारठाणकर यांच्यासह उपायुक्त, सहायक आयुक्त, अधिकारी व कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित राहतील.

केंद्र सरकारच्या स्वच्छता पंधरवाडा अंतर्गत 'स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता' या संकल्पनेस अनुसरून राबविण्यात येणाऱ्या 'स्वच्छता ही सेवा 2024' या अभियानातील एक पेड माँ के नाम हा उपक्रम आहे. नागपूर शहराला स्वच्छ, सुंदर हरित शहर म्हणून साकारण्यासाठी अधिकाधिक संख्येत उपक्रमात सहभागी व्हा असे आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी केले आहे.

नागपूर महानगरपालिकेतर्फे सोमवार २३ सप्टेंबर रोजी दहाही झोनच्या विविध ठिकाणी एक पेड माँ के नाम उपक्रमांतर्गत वृक्षारोपण करण्यात येणार आहे. नागपूर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी आणि अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल या स्वतः एयर फोर्स, सेमिनर हिल्स येथे वृक्षारोपण करणार आहेत.

तसेच मनपाद्वारे वर्धा रोड येथील ऑफिसर मेस एयर फोर्स, आरपीटीएस रोड लक्ष्मी नगर येथील पोलीस प्रशिक्षण केंद्र, दाभा परिसर, मनीष नगर सिमेंट रोड व भांडेवाडी येथे वृक्षारोपण केले जाणार आहे. नागरिकांनी देखील मोठ्या संख्येत उपक्रमात सहभागी होऊन वृक्षारोपण करावे असे आवाहन मनपाद्वारे करण्यात आले आहे.

## रक्तदान शिबिराला उत्स्फुर्त प्रतिसाद

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २० :

नागपूर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी आणि जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांनी केलेल्या रक्तदानाच्या आवाहनाला उत्सफूर्त प्रतिसाद मिळाला.



नागपूर शहरात रक्ताचा तुडवडा जाणवू नये याकरीता नागपूर महानगरपालिका आाणि जिल्हा प्रशासन यांनी गणेशोत्सवा दरम्यान रक्तदान शिबिर आयोजित करण्याचे आवाहन केले होते. मनपा मुख्यालयात आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात 102, व्ही.आय.पी.एल. गणेशोत्सव मंडळात 126 , तसेच उर्वरीत नागपूर शहराच्या 10 झोन मध्ये असे एकुण 73 रक्तदान शिबिरात 2234 युनिट रक्त संकलित करण्यात आले. ईद-ए-मिलाद च्या निमित्तयाने जमाते ए इस्लामी हिंद नागपूर व युथ मुव्हमेंट ऑफ महाराष्ट्र या समाज सेवी संस्थेच्या पुढाकाराने रक्तदान शिबिरात 878 युनिट रक्त संकलित करण्यात आले. नागपूर महानगरपालिका आाणि जिल्हा प्रशासनाव्दारे शासकिय रक्तपेढया व खाजगी रक्तपेढया यांच्या उत्सफूर्त पुढाकार व सहकायार्ने गणेशोत्सवानिमित्त रक्तदान जनजागृती करण्याकरीता रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आलेले होते.

## जलयुक्त शिवार योजनेची कामे प्राधान्याने पूर्ण करा

### मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २० :

जलयुक्त शिवार शासनाची महत्वपूर्ण योजना असून योजनेची प्रलंबित कामे प्राधान्याने पूर्ण करा, अशा सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी संबंधित विभागांना दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या छत्रपती सभागृहात जलयुक्त शिवार अभियान 2.0 कार्यकारी समितीची आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र मनोहरे, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या वरिष्ठ भूवैज्ञानिक डॉ. वर्षा पी माने, जिल्हा परिषद लघुपाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. सयाम तसेच समितीचे सदस्य व शेतकरी उत्पादक कंपनीचे सदस्य यावेळी उपस्थित होते.

जलयुक्त शिवार योजनेसाठी विभागांना दिलेले उद्दिष्ट व निधी यांचा आढावा मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सहअध्यक्ष विनायक महामुनी यांनी घेतला. ज्या विभागांना तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता मिळाली आहे,

### जिल्हास्तरीय अटल भूजल प्रशिक्षण संपन्न



त्यांनी गतीने योजनेची काम करावे, असेही ते म्हणाले.

यावेळी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, भूजल सर्वेक्षण आणि विकास विभागाने जिल्हास्तरीय अटल भूजल प्रशिक्षणाचे आयोजन केले होते. शेतकरी उत्पादक कंपन्यांनी नोंदणी कशी करावी. त्यांच्या संचालकांनी सी.ए. कडून यासाठी लागणाऱ्या बाबींची माहिती करुन घ्यावी असे सांगण्यात आले.

यावेळी शेतकरी उत्पादक कंपनी व्यवस्थापन व उद्योगाबाबत माहिती देण्यात आली. त्यामुळे वेळेची व पैशाची बचत होईल, शेतकरी उत्पादक कंपन्यांनी नियमित तुलनात्मक अहवाल सादर करावा, असे त्यांनी सांगितले.

## पारंपरिक जीवनशैली व कौटुंबिक शिस्त महत्वाची : डॉ. प्रभाकर देशपांडे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

आधुनिक काळात जीवनशैली, घरातील शिस्त, सर्वांवर असलेली सामाजिक नजर या बाबी लुप्त पावत चाललेल्या दिसत असून त्याचे दुष्परिणाम आरोग्य आणि मानसिकतेवर झाल्याने तरुण पिढी विकारग्रस्त होण्याकडे वाटचाल करीत आहे. ही धोक्याची घंटा समजून माता-पित्यांनी पारंपरिक जीवनशैली व कौटुंबिक शिस्त कायम राखण्यावर भर द्यावा, असा सल्ला प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. प्रभाकर देशपांडे यांनी उपस्थितांशी संवाद साधताना दिला.



कमलाबाई देशपांडे मेमोरिअल ट्रस्टच्या सौजन्याने आणि ऋतुराज प्रस्तुत आनुवंशिकता आणि मी या कार्यक्रमाला उपस्थित श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमात हृदयविकार, मधुमेह कोलेस्ट्रॉल, उच्च रक्तदाब आदी आनुवंशिक आजारांवर संगीतमय चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचा शुभारंभ कमलाबाई मेमोरियल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. पी.के. देशपांडे, ऋतुराजच्या मुग्धा तापस यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाला.

डॉ. देशपांडे म्हणाले, सध्या पार्टी आणि व्यावसायिक संबंध यासाठी वेगवेगळ्या स्वरूपात मद्यपान, धूम्रपान आणि तंबाखू आदी व्यसनांचे प्रकार वापर वाढले आहेत. तो धोकादायक असून त्यात शाळकरी आणि कॉलेजवयीन युवकांचा सहभाग वाढतो आहे. यावर देखील नियंत्रण आणण्याची गरज आहे.

या कार्यक्रमात अनुवंशिकता आणि मी या दरम्यानचा प्रवास उलगडून दाखविणारी समयोचित गाणी ऋतुराजच्या कलावंतांनी सादर केली.

त्यात मंजिरी वैद्य (अय्यर) यांनी ह्यदेव जरी मज, आओ हुजूर तुमको, गुणवंत घटवाई यांनी देह देवाचे मंदिर, याद पिया की आए, मुकुल पांडे यांनी या जन्मावर व मैने तेरे लिए ही, तसेच छलकाए जाम, काटा रूते कुणाला, जिंदगी एक सफर है सुहाना, कशी तुज समजावू, दिल चिज क्या है, जब कोई बात बिगड जाए, उठे सब के कदम आदी गाण्यांमधून गायक कलाकारांनी जीवनाचा प्रवास मांडला. कार्यक्रमाच्या शेवटी चलते चलते मेरे ये गीत याद रखना हे गीत सामूहिकरित्या कलाकारांनी प्रस्तुत केले.

कार्यक्रमाची संकल्पना ऋतुराजच्या संचालिका मुग्धा तापस यांची होती. गायक कलाकारांना गोविंद गडीकर, परिमल जोशी, मोरेश्वर दहासहस्त्र, विशाल दहासहस्त्र यांनी वाद्यसंगत केली. कार्यक्रमाचे उत्कृष्ट निवेदन आसावरी गलांडे-देशपांडे यांनी केले.

## दिघोरी उड्डान पूल : 'ए भाई जरा देख के चलो'!

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

एकीकडे शहरात उड्डाणपुलाचे जाळे निर्माण केले जात असतांनाच दुसरीकडे वाहतुकीचे ओझे जुने उड्डाणपूल वाहून नेत आहेत. आता नव्यानेच कळमन्यात उड्डाणपूल निर्माण करण्यात आला तर इंदोरा ते दिघोरी अशा उड्डाणपूलाचे कार्यही प्रगतीपथावर आहे.

मात्र त्यात दिघोरीत असलेला म्हाळगी नगर ते खरबी हा जुना उड्डाणपूल समस्येच्या विळख्यात सापडलेला आहे. गणेशोत्सवापूर्वी खड्डे मुक्त नागपूरचा गाजावाजा करीत असलेल्या प्रशासनाच्या नजरेतून या उड्डाणपूलावरील खड्डे कसे सुटले? हा प्रश्न निर्माण होत आहे.



शहरात अपघातांमुळे मृत्यू होत असलेल्यांची संख्या चिंतेचा विषय ठरत असले तरी दिघोरी उड्डाणपुलावरून प्रवास करीत असतांना हे खड्डे नक्कीच जीवघेणे ठरणारे आहे. त्यामुळे या उड्डाणपुलावरून प्रवास करतांना 'ऐ भाई जरा देखके' असे म्हणण्याची वेळ आलेली आहे.